रायगड, नवी मुंबई, ठाणे, रत्नागिरी, सिंधुदुर्ग ▌आर. एन. आय. रजि. क्र. ४९९६३/७७ ▌वर्ष ८९▌अंक २०२ ▌पृष्ठे ८▌ MH-MR-RGD-RNP/16/2022-23 (31-12-2025)  www.krushival.in

## पवारांची ठाकरें बंधूंना साथ

**मुंबई :** महानगरपालिका निवडणुकीसाठी ठाकरे बंधुंची युती झाल्यानंतर आता राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पक्षानेही ठाकरे बंधुंबरोबर युती केली आहे. राष्ट्रवादी शरदचंद्र पवार पक्षाला उबाठा-मनसे युतीकडून दहा जागा देण्यात आल्या आहेत. कोणत्याही क्षणी राष्ट्रवादीच्या उमेदवारांची यादी जाहीर होण्याची शक्यता आहे. सुरुवातील राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाकडून ५२ जागांची मागणी करण्यात आली होती. अखेर दहा जागा पवारांच्या राष्ट्रीवादीला देण्यात आल्या आहेत. त्यामुळं आता मुंबईत ठाकरे बंधूबरोबर पवारांचा पक्षदेखील सहभागी असणार आहे.


# कृषीवल

रायगड, सोमवार, दि. २९ डिसेंबर २०२५

किंमत ४ ₹


## भीमाशंकर मंदिर तीन महिने बंद

**पुणे :** राज्यातील प्रसिद्ध श्रीक्षेत्र भीमाशंकर मंदिरातील सभामंडप व पायरी मार्गाच्या बांधकामासह सर्व कामे पूर्ण होण्यासाठी मंदिर तीन महिने बंद ठेवण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. श्रीक्षेत्र भीमाशंकर मंदिरातील अनेक कामे सुरू आहेत. भाविकांना त्याचा त्रास होऊ नये म्हणून हे मंदिर बंद ठेवण्याचा निर्णय घेण्यात आला. ९ जानेवारी २०२६ पासून त्याची अंमलबजावणी होणार आहे. १२ ते १८ फेब्रुवारीदरम्यान महाशिवरात्रीचा कालावधी वगळता मंदिर दर्शनासाठी बंद राहील, अशी माहिती जिल्हाधिकारी जितेंद्र डुडी यांनी दिली.

# महापालिकेवर फडकणार लाल बावटा

- माजी आ. बाळाराम पाटील यांचा विश्वास
- इनामपुरीमधील असंख्य भाजपा कार्यकर्त्यांचा शेकापमध्ये प्रवेश







**। पनवेल । प्रतिनिधी ।**

पनवेल महानगरपालिकेवर शेतकरी कामगार पक्षाचा लाल बावटा फडकरणार, असा विश्वास माजी आ. बाळाराम पाटील यांनी व्यक्त केला. पालिकेतील भाजपाच्या कार्यपद्धतीवर नाराजी व्यक्त करीत इनामपुरी गावातील तुषार पाटील आणि त्यांच्या असंख्य सहकाऱ्यांनी नुकताच शेतकरी कामगार पक्षात प्रवेश केला. यावेळी आयोजित पक्षप्रवेशाच्या कार्यक्रमात उपस्थितांना मार्गदर्शन करताना बाळाराम पाटील बोलत होते. आगामी महापालिका निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर शेकापने जोरदार तयारी सुरू केली असून, जनतेच्या प्रश्नांवर आक्रमक भूमिका घेत निवडणुकीत उतरायचे संकेत यावेळी पाटील यांनी दिले.

पनवेल महानगरपालिका हद्दीतील इनामपुरी गावातील संतोष पाटील, मनोज पाटील पेठ, यज्ञेश्वर पाटील मुर्बी आणि पनवेल कृषी उत्पन्न बाजार समितीचे संचालक देवा मढवी यांच्या मार्गदर्शनाखाली इनामपुरी गावातील तुषार पाटील आणि त्यांच्या सहकाऱ्यांनी माजी आ. बाळाराम पाटील यांच्या हस्ते शेतकरी कामगार पक्षात जाहीर पक्षप्रवेश केला. यावेळी आपले मनोगत व्यक्त करताना बाळाराम पाटील यांनी सांगितले की, रायगड जिल्ह्यातील शेतकरी कामगार पक्ष हा लढवय्या पक्ष म्हणून ओळखला जातो. आणि आज या पक्षप्रवेशाने इनामपुरी गाव हे शेकापमय झाल्याचे पाहावयास मिळत आहे. तसेच पनवेल महानगरपालिकेमधील जनता ही भाजपच्या कार्यपद्धतीवर नाराज असून, पनवेल महानगरपालिकेतील नागरिकांना बदल हवा आहे आणि तो बदल आपण या पनवेल महानगरपालिकेच्या निवडणुकीत दाखवून देऊ, असेही सांगितले.

या पक्षप्रशाच्या वेळेस आपले मनोगत व्यक्त करताना काशिनाथ पाटील यांनी सांगितले की, होऊ घातलेल्या पनवेल महानगरपालिकेच्या निवडणुकीमध्ये आपण •> पान २ वर

## वे|ध|क

### एका पिस्टलसह सहा जिवंत काडतुसे जप्त

**पनवेल :** महानगरपालिका निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर पनवेल शहर पोलिसांनी शहरातून एका पिस्टलसह सहा जिवंत काडतुसे जप्त करून एकाला अटक केली आहे. पनवेल शहर पोलीस ठाणे हद्दीत महानगरपालिका निवडणुकीच्या अनुषंगाने गोपनीय बातमीदाराच्या बातमीच्या आधारे पनवेल रेल्वे स्टेशन परिसरात सापळा लावून एकास पिस्टल व सहा जिवंत काडतुसांसह ताब्यात घेतले. अनंथ अधिमुलम पाडायची (३६, रा. सानपाडा) असे या इसमाचे नाव असून, त्याच्यावर पनवेल शहर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. ही कामगिरी वपोनि नितीन ठाकरे यांच्या मार्गदर्शनाखाली सपोनि सचिन पोवार, सपोनि सुनील वाघ, पोउपनि किरण राऊत, पोहवा प्रवीण पवार, पोना भोसले, पोशि काकडे, पोशि कराड, पोशि लोखंडे यांनी केली

### राज्य गारठणार

**मुंबई :** उत्तर भारतात शीत लहर सुरु असल्याने महाराष्ट्रातही थंडीचा कडाका वाढला आहे. विशेषतः सकाळी आणि संध्याकाळी गारठा अधिक वाढत आहे. पुढील दोन दिवस वाऱ्यांच्या दिशेत बदल होण्याची शक्यता असून, याचा थेट परिणाम तापमानावर होऊ शकतो. थंडीचा जोर राज्याच्या अनेक भागांत कायम राहणार असल्याचा हवामान विभागाचा अंदाज आहे. उत्तर आणि मध्य महाराष्ट्रातील अनेक जिल्ह्यांमध्ये किमान तापमान १० अंश सेल्सिअसच्या खाली घसरले आहे. नाशिक, पुण्यात काल ९ अंशांची नोंद झाली. मराठवाड्यात बहुतांश ठिकाणी १० ते १२ अंशांच्या दरम्यान तापमान होते. उर्वरित महाराष्ट्रातही तापमानात पहाटे आणि संध्याकाळी मोठी घट होत आहे. त्यामुळे पुढील पाच दिवस राज्यात गारठा कायम राहणार आहे.

### आज उमेदवारी दाखल करणार

**पनवेल :** प्रभाग २ मधील आघाडीच्या उमेदवारांकडून उद्या सोमवारी (दि. २९) उमेदवारी अर्ज दाखल करण्यात येणार आहेत. कळंबोली वसाहतीमधील विजय दुर्ग या प्रभाग कार्यालयात मिरवणुकीद्वारे हे अर्ज दाखल करण्यात येणार असल्याची माहिती शेतकरी कामगार पक्षाचे माजी नगरसेवक अरविंद म्हात्रे यांनी दिली असून, स्वतः अरविंद म्हात्रे यांच्यासोबत प्रभाग क्रमांक २ मधून निवडणूक रिंगणात पुरुष सर्वसाधारण प्रवर्गातून उतरलेले राम पाटील, तसेच सर्वसाधारण महिला प्रवर्गातून योगिता फडके आणि अर्चना भोईर यांचा अर्ज दाखल केला जाणार आहे. १५ जानेवारी रोजी होणाऱ्या निवडणुकीसाठी ३० डिसेंबर ही अर्ज दाखल करण्याची शेवटची तारीख आहे.

# जिल्ह्यात समुद्रकिनारे, महामार्ग हाऊसफुल्ल



● (छायाचित्र : समीर मालोदे)

**। अलिबाग । प्रतिनिधी ।**

वर्षअखेर व नववर्षाचे स्वागत करण्यासाइी राज्यासह परराज्यातून पर्यटकांनी रायगड जिल्ह्याकडे मोठ्या प्रमाणात धाव घेतली असून, किल्ले, समुद्रकिनारे, पर्यटनस्थळे पर्यटकांनी फुलून गेले आहेत. अलिबाग, मुरुड-जंजिरा, काशिद, हरिहरेश्वर, माथेरान तसेच रायगड किल्ला परिसरात हॉटेल्स व कॉटेजेस जवळपास हाऊसफुल्ल झाली असून, शेवटच्या क्षणी आलेल्या पर्यटकांना मुक्कामासाठी अडचणीचा सामना करावा लागत आहे. दरम्यान, वर्षअखेरीच्या सुट्ट्यांमुळे पर्यटनाला मोठी चालना मिळाली आहे. मात्र, वाढलेल्या गर्दीमुळे वाहतूक कोंडी, कायदा-सुव्यवस्थेचा प्रश्न आणि सुरक्षिततेसाठी प्रशासनाकडून विशेष दक्षता घेण्यात येत आहे.

मुंबई-पुणे व उपनगरांतून मोठ्या प्रमाणावर वाहनांची गर्दी झाल्याने महामार्गांवर आणि अंतर्गत रस्त्यांवर वाहतूक कोंडी निर्माण झाली आहे. दरम्यान, चौल, नागाव सहाण बायपास मार्गावर एमएसआडीसीकडून रस्त्याचे रुंदीकरण करण्यासाठी रस्ते खोदल्याने त्याचा फटका बसून वाहतूक कोंडीचा सामना पर्यटकांना करावा लागत आहे. समुद्रकिनाऱ्यांवर रात्री उशिरापर्यंत पर्यटकांचा जल्लोष सुरू असून, पर्यटन व्यवसायाला मोठी चालना मिळाली आहे. नववर्षाच्या जल्लोषात रायगड जिल्हा पर्यटनाने बहरला असला, तरी गर्दीचे नियोजन व सुरक्षित पर्यटन हेच यंदाचे मोठे आव्हान ठरत आहे.

### नववर्षाचा उत्साह शिगेला



> हॉटेल्स हाऊसफुल्ल असल्यामुळे मुक्कामासाठी जागा मिळवताना त्रास झाला. पण, समुद्रकिनारे आणि किल्ल्यांवरील अनुभव अविस्मरणीय आहे.
>
> – कुणाल देवकर, पर्यटक, पुणे

> नववर्ष साजरं करण्यासाठी रायगडसारखी निसर्गरम्य जागा दुसरी नाही. दरवर्षी कुटुंबासह येतो. यंदा गर्दी आहे, पण वातावरण खूप उत्साही आहे.
>
> – अभिजीत साने, पर्यटक, मुंबई

### सुरक्षेवर दृष्टिक्षेप

- पोलीस बंदोबस्त वाढवला : समुद्रकिनारे, हॉटेल परिसर, महामार्ग व अंतर्गत रस्त्यांवर विशेष पथकांची नियुक्ती.
- आपत्कालीन यंत्रणा सज्ज : रुग्णवाहिका, समुद्रकिनारी लाईफगार्ड तैनात.
- वाहतूक नियंत्रण : जिल्हा वाहतूक शाखेचे पोलीस निरीक्षक अभिजीत भुजबळ यांच्या मार्गदर्शनाखाली प्रमुख पर्यटन मार्गांवर बंदोबस्त

> वर्षअखेरच्या गर्दीमुळे व्यवसायाला मोठा फायदा झाला आहे. मागील काही वर्षांपेक्षा यंदाची गर्दी सर्वाधिक आहे. वाढलेल्या गर्दीमुळे तारांबळ उडत आहे. परंतु, उत्साहसुद्धा आहे.
>
> – रमेश खोत, हॉटेल व्यावसायिक, मुरुड

मंगेश काळोखे हत्या प्रकरण

# आरोपींना चार जानेवारीपर्यंत कोठडी

**। खोपोली । प्रतिनिधी ।**

खोपोली शहरासह संपूर्ण रायगड जिल्हा हादरवून टाकणाऱ्या मंगेश काळोखे यांची हत्या करून फरार झालेल्या आरोपींच्या २४ तासांत पोलिसांनी मुसक्या आवळल्या आहेत. अटक करण्यात आलेल्या आरोपींना पोलीस बंदोबस्तात रविवार, दि.२८ डिसेंबर रोजी सायंकाळी ४.३० वाजता खालापूर न्यायालयात हजर केले असता, न्यायालयाने त्यांना ४ जानेवारीपर्यंत पोलीस कोठडी सुनावली आहे.

दरम्यान, हत्या केल्यानंतर आरोपी मोबाइल बंद ठेवून अंडरग्राऊंड झाल्याने त्यांचा ठावठिकाणा लागत नव्हता, त्यामुळे तांत्रिकदृष्ट्या कोणतीही उपलब्ध नसल्याने आरोपी शोधण्यासाठी पोलिसांसमोर मोठे आव्हान होते. जिल्हा पोलीस अधीक्षक आचल दलाल यांच्या मार्गदर्शनाखाली पोलिसांची पाच पथके तयार करून मुख्य सूत्रधार रवींद्र देवकर, त्याची पत्नी उर्मिला देवकर, दोन मुले दर्शन, धनेश तसेच मेहुण्यासह अन्य चार संशयित आरोपींना अवघ्या २४ तासांत पकडण्यात पोलिसांना मोठे यश आले आहे.

प्रभारी विशेष पोलीस महानिरीक्षक कोकण परिक्षेत्र प्रवीण पडवळ, पोलीस अधीक्षक आचल दलाल, अपर पोलीस अधीक्षक अभिजीत शिवथरे, उपविभागीय पोलीस अधिकारी, विशाल नेहुल यांच्या मार्गदर्शनाखाली सपोनि सुजित गडदे व पथक, सपोनि मनोज ठाकरे व पथक, पोलीस उपनिरीक्षक अशोक जगताप व पथक, सपोनि संतोष आवटी व पथक, पोलीस उपनिरीक्षक मंगेश बाचकर व पथक, पोनि मिलिंद खोपडे व पथक, सपोनि भास्कर जाधव व पथक सपोनी वरोटे व पथक या पोलिस पथकांनी विशेष कामगिरी बजावत आरोपी पकडले आहेत.

## अंबा नदी पात्रात अनोळखी मृतदेह

**। पाली/बेणसे । प्रतिनिधी ।**

सुधागड तालुक्यातील पाली-खोपोली राज्य महामार्गालगत वऱ्हाड जांभुळपाडा नदीच्या लहान पुलाच्या नदी पात्रात एका इसमाचा मृतदेह आढळून आला. त्यामुळे तालुक्यात एकच खळबळ उडाली. हा मृतदेह कुणाचा ही ओळख अद्याप पटली नाही. काही दिवसांपूर्वी सुधागडात एका वृद्ध महिलेचा मृतदेह सापडला होता. त्यानंतर नदी पात्रात हा मृतदेह सापडल्याने नागरिकांत चर्चेचा विषय ठरला आहे.सकाळी नागरिकांनी पाली •> पान २ वर

## खुनाच्या गुन्ह्यातील आरोपींना २४ तासांत अटक

**। बोर्लीपंचतन । प्रतिनिधी ।**

दिगी सगरी पोलीस ठाणे हद्दीतील गोंडगर गावचे हद्दीत एक अनोळखी पुरुष जातीचे प्रेत कुजलेल्या स्थितीत मिळून आले होते. त्याबाबत दिघी सागरी पोलीस ठाण्यामध्ये अकस्मात मृत्यूची नोंद करीत गुन्हा दाखल करण्यात आला होता.

दरम्यान, मयताचे ओळख पटवण्याकरिता प्रभारी अधिकारी हनुमंत शिंदे यांनी गोपनीय बातमीदारामार्फत तसेच बोर्ली पंचतन, गोंडघर ,वडवली भागातील सीसीटीव्ही फुटेजची पडताळणी करून सदर इसमाचे नाव शशांक शरद कुडाळकर, वय ५१ असून, तो बोर्ली पंचतन, तालुका श्रीवर्धन येथील राहणार असल्याचे तपासात निष्पन्न झाले होते.

तपासामध्ये मयताची प्रामाणिक माहिती प्राप्त केल्यानंतर त्याचे नातेवाईक भाऊ अजित शरद कुडाळकर यांना मयताची ओळख पटवण्याकरता आणले होते. त्यांनी पाहणी करुन तो आपला भाऊ शशांक शरद कुडाळकर हाच असल्याचे सांगून त्याचा घटस्फोट होऊन तो •> पान २ वर

# बीच महोत्सवात स्थानिकांना डावलले

### सांस्कृतिक कार्य विभागाविरोधात संताप व्यक्त



**। रेवदंडा । प्रतिनिधी ।**

रायगड जिल्ह्यातील पर्यटनाला चालना मिळावी या उद्देशाने महाराष्ट्र शासनाच्या सांस्कृतिक कार्य विभागामार्फत आयोजित करण्यात आलेल्या 'रेवदंडा बीच महोत्सव' या उपक्रमावर स्थानिक ग्रामस्थांनी तीव्र नाराजी व्यक्त केली आहे. स्थानिकांना विश्वासात न घेता, कोणतीही पूर्वसूचना व नियोजन न करता कार्यक्रम राबविण्यात आल्याचा आरोप ग्रामस्थ, स्थानिक नेते व विविध घटकांकडून करण्यात येत आहे.

दि. २७ व २८ डिसेंबर रोजी सायंकाळी ५ ते रात्री १० या वेळेत रेवदंडा समुद्रकिनारी हा महोत्सव आयोजित करण्यात आला. मात्र, कार्यक्रमाच्या केवळ एक दिवस आधी बॅनरबाजी करण्यात आल्याने बहुसंख्य ग्रामस्थांना या महोत्सवाची माहितीच नव्हती. परिणामी, उद्घाटनप्रसंगी स्थानिक ग्रामस्थांची उपस्थिती अत्यल्प होती.

या कार्यक्रमाचे उद्घाटन स्थानिक आमदारांच्या हस्ते झाले. मात्र, उद्घाटनावेळी स्थानिक पंचक्रोशीतील मान्यवर, विविध राजकीय पक्षांचे प्रतिनिधी, पत्रकार, महिला बचत गट तसेच ग्रामस्थांना •> पान २ वर

कार्यकर्ते, इच्छुकांमध्ये संभ्रम कायम | युती-आघाडीचे जागावाटप रखडले

# उमेदवारांच्या जनसंपर्क कार्यालयात शुकशुकाट

**। पनवेल । विशेष प्रतिनिधी ।**

आपली उमेदवारी निश्चित समजून पनवेल पालिका हद्दीतील अनेक इच्छुकांनी प्रभागा-प्रभागात जनसंपर्क कार्यालये सुरु केली आहेत. मात्र, युती-आघाडीतील जागावाटपाचे सूत्र अद्यापही ठरलेले नाही. यामुळे पक्षश्रेष्ठी आपल्यालाच उमेदवारी देतील या अपेक्षेत असलेल्या इच्छुकांची चांगलीच गोची झाली असून, मोठ्या अपेक्षेने सुरु केलेल्या जनसंपर्क कार्यालयातदेखील शुकशुकाट असल्याचे पाहायला मिळत आहे.

पनवेल पालिकेसाठी १५ जानेवारी रोजी मतदान प्रक्रिया पार पडणार आहे. नामनिर्देशनपत्र दाखल करण्यासाठी ३० डिसेंबरपर्यंतची मुदत देण्यात आली आहे. नामनिर्देश पत्र दाखल करण्यासाठी दोनच दिवसांचा अवधी बाकी असूनसुद्धा रविवारी (दि. २८) दुपारपर्यंत एकही नामनिर्देश पत्र दाखल करण्यात आलेला नव्हता. त्यातच भर म्हणून युती होणार की नाही, या संभ्रमावस्थेत शिवसेना, भाजपा आणि अजित पवार यांच्या नेतृत्वाखालील अजित पवार गटातील उमेदवार आहेत. काँग्रेस, राष्ट्रवादी काँग्रेस, शिवसेना उबाठा गट आण मनसे आघाडीतील घटक पक्षांकडून जागावाटप करण्यात आल्याचे सांगण्यात येत असले तरी कुठला पक्ष कोणत्या जागेवर उमेदवार देणार हे निश्चित नसल्याने आघाडीतील इच्छुकदेखील संभ्रमात आहेत. एक एका प्रभागात एकापेक्षा जास्त इच्छुक उमेदवारी मिळवण्यासाठी प्रयत्न करत आहेत. याकरिता सगळेच इच्छुक पक्षश्रेष्ठींच्या कार्यालयात तळ ठोकून आहेत. यामुळे जनसंपर्क कार्यालयात बसण्यासाठी वेळ नसल्याने इच्छुकांचे समर्थकदेखील कार्यालयात बसणे टाळत असून, इच्छुकांनी सुरु केलेल्या जनसंपर्क कार्यालयात शुकशुकाट असल्याचे पाहायला मिळत आहेत.

### तिकीट न मिळाल्यास कार्यालयांचे काय?

पक्षाकडून निवडणूक लढवण्यासाठी संधी मिळेल या अपेक्षेने प्रभागात जनसंपर्क सुरु केलेल्या इच्छुकाला पक्षाने संधी न दिल्यास जनसंपर्काकरिता सुरु केलेले कार्यालय सुरु राहणार की बंद होणार, असा प्रश्न सामान्य मतदार उपस्थित करत आहेत.

### पक्ष एकच, कार्यालय मात्र वेगवेगळे

आगामी पालिका निवडणूक लढवण्यासाठी भारतीय जनता पार्टीत इच्छुकांची संख्या सर्वात जास्त आहे. यापैकी अनेकांना पक्षनेतृत्व आपल्यालाच संधी देईल हे अपेक्षित पकडून प्रत्येक इच्छुकाने कार्यालय सुरु केली असल्याने पक्ष एकच, कार्यालयांची संख्या मात्र जास्त झाली आहे. काही भागात तर एकाच रस्त्यावर फक्त काही मीटर अंतरावर एकाच पक्षाची तीन-तीन कार्यालये सुरु आहेत.




# काँग्रेस-वंचितची युती




**। मुंबई । प्रतिनिधी ।**

आगामी मुंबई महानगरपालिका निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर काँग्रेस आणि वंचित बहुजन आघाडी यांनी मुंबईत युतीची अधिकृत घोषणा केली आहे. या नव्या समीकरणामुळे मुंबई महापालिकेच्या रणांगणात आता तिरंगी किंवा चौरंगी लढत होणार असल्याचे पाहायला मिळत आहे.

नुकतंच वंचित बहुजन आघाडीने एक प्रसिद्ध पत्रक जारी केले आहे. या अधिकृत पत्रानुसार, मुंबई महापालिकेच्या एकूण २२७ जागांपैकी ६२ जागांवर वंचित बहुजन आघाडी आपले उमेदवार उभे करणार आहे. तर उर्वरित जागांवर काँग्रेस आपले उमेदवार रिंगणात उतरवणार आहे. विशेष म्हणजे, या ६२ जागांच्या यादीवर दोन्ही पक्षांच्या प्रमुख नेत्यांच्या सही असल्याचे दिसत आहे. त्यामुळे यात आता कोणताही बदल केला जाणार नसल्याचे स्पष्ट करण्यात आले आहे. काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांनी या युतीचे स्वागत करताना सांगितले की, काँग्रेस आणि वंचित हे नैसर्गिक मित्र आहेत. १९९९ नंतर राजकीय कारणांमुळे हे दोन्ही पक्ष स्वतंत्र लढत होते, मात्र तब्बल २५ वर्षांनंतर पुन्हा एकदा हे दोन्ही पक्ष मुंबईच्या विकासासाठी आणि भाजपला रोखण्यासाठी एकत्र आले आहेत. ही आघाडी केवळ सत्तेसाठी नसून विचारांची आघाडी असल्याचे त्यांनी नमूद केले.

# धरण प्रकल्प धोरणाला हरताळ

| शैलेश पालकर |
| पोलादपूर |

पोलादपूर तालुक्यातील सर्वच धरणप्रकल्पांबाबत 'आधी भूसंपादन मोबदला, मग धरण प्रकल्प' या धोरणाला हरताळ फासला गेल्याने शेतकऱ्यांना धरणासाठी भूसंपादन झाल्यावर स्वत:च्याच जमिनीवर पाय ठेवण्याची चोरी झाली आहे. जमीन गेली, उत्पन्नाचे साधन गेले आणि मोबदल्यापासूनही वंचित राहावे लागले. आणखी वर दारिद्र्याचे दशावतार म्हणून शेतकरी उदरनिर्वाहासाठी रोजीरोटीच्या शोधात देशोधडीला लागल्याचे दिसून येत आहे.





महाराष्ट्र राज्याच्या ग्रामविकास आणि जलसंधारण लघुपाटबंधारे स्थानिक स्तर मंडळ ठाणे यांनी लघुपाटबंधारे स्थानिक स्तर उपविभाग माणगाव, जि. रायगडच्या माध्यमातून सन २००८-०९ दरम्यान तयार केलेल्या टिपणी अहवालानुसार, पोलादपूर तालुक्यातील विविध धरणांबाबत देवळे लघुपाटबंधारे योजना, लोहारे लघुपाटबंधारे योजना, तुर्भे खोंडा लघुपाटबंधारे योजना, किनेश्वरवाडी लघुपाटबंधारे योजना, चांभारगणी महाळुंगे लघुपाटबंधारे योजना, कोतवाल लघुपाटबंधारे योजना, कोंढवी साठवण तलाव आणि बोरघर लघुपाटबंधारे योजना सुरू होण्यासंदर्भात तपशीलवार अहवाल शासनाला सादर करण्यात आला होता.

**भाग-२**

देवपूर-गांजवणे तसेच ढवळे, कामथे, निवे या भागातील नियोजित धरण प्रकल्प पाटबंधारे विकासाचा अनुशेष नसल्याचा चुकीचा अहवाल राज्य सरकारकडे आल्याने प्रस्तावांच्या बासणातच बंद राहिले. माजी मुख्यमंत्री बॅ.ए.आर. अंतुले यांनी डॉ. एस. स्वामीनाथन समितीमार्फत केलेल्या पाहणीमध्ये शिवकालीन धरण व तलावासारखे जल व विद्युत प्रकल्प करण्याचा अहवाल तयार करण्यात आला. त्यावर अंमलबजावणी होण्यापूर्वीच पाटबंधारे विकासाचा अनुशेष नसल्याचा अहवाल तयार करून झारीतील शुक्राचार्यांनी कोकणाच्या विकासाचा मार्गच रोखून धरला. यासंदर्भात, महाड पोलादपूर विधानसभा मतदारसंघाचे तत्कालीन आमदार माणिक जगताप आणि तत्कालीन विधानपरिषद सदस्य जयंत पाटील यांनी तत्कालीन राज्यपाल डॉ. जमीर यांची भेट घेऊन अहवाल रद्द करण्याची विनंतीही केली होती. त्यानंतर या धरणांच्या कामांच्या निविदा अथवा कोणतीही कार्यवाही सुरू नसताना कथित ठेकेदार आणि त्यावर काम करण्यासाठी महसूल विभागातील सेवानिवृत्त कर्मचारी अशी यंत्रणा कागदोपत्री हलवाहलव करीत होती. मात्र, कोणत्याही योजनांचे प्रत्यक्षात काम सुरू झाले नसताना २०१८ मध्ये विधानसभा निवडणुकीपूर्वी जमिनी खरवडून माती काढण्यासोबतच दगडी आणि झाडे तोडून धरणाचे काम सुरू झाल्याचा दावा करण्याचा प्रकार सुरू झाला होता.

पोलादपूर तालुक्यातील जनतेचे प्रश्न सोडवायला विलेपार्ले, अंधेरी अथवा बांद्र्यातून कोणी येणार नसून, आम्ही आणि इथले कार्यकर्ते तत्परतेने येऊ. धरणासाठी जमिनी देणाऱ्यांच्या मनात मोबदल्याबाबत शंका असणे स्वाभाविक आहे. मात्र, जलसंपदा खात्याचे वाटप न झाल्याने राज्याचे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या माध्यमातून बाधितांच्या मागण्यांपेक्षाही अधिक मिळवून देण्याचा शब्द देत असल्याची ग्वाही महाड विधानसभा मतदार संघाचे सदस्य तत्कालीन बाळासाहेबांची शिवसेना पक्षाचे प्रतोद आ. भरत गोगावले यांनी पैठण गोळेगणी परसुले धरणाच्या भूमीपूजनप्रसंगी दिली होती. याप्रसंगी जिल्हा जलसंधारण अधिकारी मंगेश साठे, राजिपचे माजी सदस्य चंद्रकांत कळंबे, पैठणचे सरपंच संतोष मोरे, गोळेगणी सरपंच नितीन मोरे, परसुले सरपंच सुनंदा गो. कदम, प्रकल्प अधिकारी बाबासाहेब शिंदे आणि ठेकेदार प्रकाश मेंगाणे पाटील आदी सर्वपक्षीय उपस्थित होते. यावेळी देवपूरचे जगदीश महाडीक, प्रवीण महाडीक, गोळेगणीतील काँग्रेस तालुका सरचिटणीस सुरेश मोरे, उद्योजक शंकरराव येरूणकर, टीव्ही कलावंत संदीप जंगम, कर्नल किशोर मोरे तसेच असंख्य ग्रामस्थ व शेतकरी उपस्थित होते.

याप्रसंगी उद्योजक शंकरराव येरूणकर आणि टीव्ही कलावंत संदीप जंगम यांनी, धरणबाधितांच्या समस्यांची अभ्यासपूर्ण मांडणी करताना प्रकल्पग्रस्तांच्या मागण्यांचे निवेदन आ. गोगावले यांच्याकडे दिले. यावेळी पैठण सरपंच संतोष मोरे यांनीही परसुले गोळेगणी पैठणच्या शेतकऱ्यांच्या मागण्यांची रूपरेषा आ. गोगावले यांच्यासमोर मांडली. यावेळी धरणाबाबतच्या साशंकता दूर झाल्याखेरिज भूमीपूजन नको, अशी भूमिका घेऊन बाधित शेतकरी व ग्रामस्थांनी चर्चा घडवून आणली. यावेळी सर्वांचे शंकानिरसन करण्यात आ. गोगावले यांना यश आले.

पोलादपूर तालुक्यातील विविध धरणांची कामे वाजतगाजत सुरू होऊनही प्रत्यक्षात शेतकरी प्रकल्पग्रस्त होऊनही विनामोबदला भूसंपादन झाल्याने नाडला गेला असल्याची वस्तुस्थिति लक्षात घेता पैठण येथील टिव्ही अभिनेते संदीप जंगम यांनी रायगडचे तत्कालीन पालकमंत्री तथा उद्योगमंत्री उदय सामंत यांची भेट घेऊन केलेल्या चर्चे दरम्यान ना. सामंत यांनी सकारात्मक प्रतिसाद दिला. यानंतर रायगडचे तत्कालीन जिल्हाधिकारी डॉ. योगेश म्हसे यांच्यासोबतही टिव्ही अभिनेते संदीप जंगम यांनी केलेल्या चर्चेनंतर धरणग्रस्तांच्या आशा पल्लवित झाल्या.

## जन्मबंध ग्रुपची ऐतिहासिक वाटचाल




■ **सुवर्णकार समाजातील ७,000हून अधिक जुळले विवाह**

| अलिबाग | प्रतिनिधी |

जन्मबंध फाऊंडेशनच्या पुढाकारातून सुरू झालेल्या 'जन्मबंध व्हॉट्स्‌अ‍ॅप ग्रुप' या उपक्रमाने सुवर्णकार समाजासाठी एक आदर्श निर्माण केला आहे. केवळ व्हॉट्सअ‍ॅप या डिजिटल माध्यमाच्या सहाय्याने समाजातील विविध शाखांमधील सात हजारांहून अधिक मुला-मुलींची विवाह जुळवणी पूर्णतः विनामूल्य करण्यात येत आहे.

सन २०१२ मध्ये मुंबई येथे झालेल्या वरवधू परिचय मेळाव्यानंतर समाजोपयोगी, दीर्घकालीन उपक्रमाची संकल्पना आकाराला आली. त्यानंतर सन २०१३ मध्ये जन्मबंध व्हॉट्सअ‍ॅप ग्रुपची औपचारिक स्थापना करण्यात आली. सुरुवातीला शंका व्यक्त झाल्या असल्या तरी, समाजातील मान्यवरांच्या सहकार्यामुळे हा उपक्रम यशस्वी ठरला. घरबसल्या, पारदर्शक व सुलभ पद्धतीने अपेक्षित वरवधूंची माहिती उपलब्ध करून देण्याचे कार्य प्रभावीपणे सुरू आहे.

आजवर मुंबई, पुणे, नाशिक, धुळे, सटाणा, बदलापूर, उज्जैन, छत्रपती संभाजीनगर, बडोदा, इंदूर आदी ठिकाणी १८ विनामूल्य वरवधू परिचय मेळावे यशस्वीरित्या पार पडले असून, त्यामुळे समाजाचा कोट्यवधी रुपयांचा खर्च वाचला आहे. विधुर, विधवा व अपंग व्यक्तींनाही योग्य जोडीदार मिळवून देण्यात जन्मबंधने महत्त्वपूर्ण भूमिका बजावली आहे.

जन्मबंध फाऊंडेशनचे संस्थापक अध्यक्ष प्रभाकर मोरे यांच्या नेतृत्वाखाली अनेक निःस्वार्थ समाजबांधवांच्या सहकार्यामुळे हा उपक्रम वटवृक्षात रूपांतरित झाला आहे. समाजसेवेचा आदर्श ठेवणाऱ्या जन्मबंध व्हॉट्सएप ग्रुपने गाठलेला हा टप्पा नक्कीच प्रेरणादायी ठरत आहे.

# नवीन वर्षात 'चौफेर' प्रदर्शित होणार

| मुंबई | प्रतिनिधी |

गणेश माळी दिग्दर्शित, रत्नागिरी जिल्ह्यातील मंडणगड तालुक्यात चित्रीकरण सुरु असलेल्या चौफेर या मराठी वेबसिरीजची सध्या चौफेर हवा आहे. पहिल्या सीजनचे चित्रीकरण पूर्ण करून, लगेचच या वेबसिरीजच्या दुसऱ्या सीजनचे चित्रीकरण जानेवारीमध्ये सुरु होणार असून, नवीन वर्षात ही वेबसिरीज प्रेक्षकांना ''नटखट प्रॉडकशन्स ऑफिशिअल'' या यु ट्यूब चॅनलवर पाहता येईल, अशी माहिती वेब सिरीजचे मुख्य निर्माते सचिन वालम यांनी दिली. सदर वेब सिरीजमध्ये प्रेमाची गोष्टी सांगण्यात आली असून, ही वेबसिरीज चौफेर प्रेमाचे पैलू उलगडणार आहे.



नटखट प्रॉडक्शन्स, मुक्ता प्रॉडक्शन्स आणि रामा प्रॉडक्शन्सची निर्मिती असलेल्या या वेबसिरीजची कथा-पटकथा-संवाद गणेश सीताराम माळी यांनी लिहिलेले असून, दिग्दर्शनाची जबाबदारीदेखील त्यांनीच पार पाडली आहे. संपूर्ण चौफेर टीम या वेबसिरीजसाठी अपार मेहनत घेत आल्याचे दिग्दर्शक गणेश माळी यांनी सांगितले व पाहिलेले स्वप्न सत्यात उतरत असताना आनंद होत असल्याची भावना व्यक्त केली.

या वेबसिरीजसाठी निर्माता सचिन वालम, सहनिर्माता सुशील मोरे, सहदिग्दर्शक-प्रसिद्धी विधान पवार, छायांकन प्रितेश घडवले, संकलन-कलर अभिषेक पाडेकर, व्हीएफएक्स श्रेयस प्रेयस, लाईट्स वैभव माळी, सूरज माळी, अस्मिन हंबीर, रंगभूषा वेषभूषा प्रदीप जाधव, निर्मिती व्यवस्थापक अतुल पवार, पोस्टर अजय माळी, अनिकेत राहाटे, शीर्षक गीत सुशांत माळी, व्यवस्थापक सिकंदर हंबीर, आकाश पवार, श्रीकांत कासारे, साहिल जाधव, योगेश तांबे, दिनेश जाधव आपली जबाबदारी योग्य पद्धतीने पार पाडत असून, सेटवर हसतखेळत वातावरण असल्याचे टीम चौफेरकडून सांगण्यात आले.

या वेबसिरीजमध्ये संजित पेडणेकर, अतुल पवार, शुभम किजबिले, श्रेयस मोरे, श्रावणी आईनकर, साधना सुतार, श्वेता गणवे, अनोमा जाधव, आकांक्षा तांबडे, मंदार मुसळे, दिलीप मराठे, शांताराम पवार, सुभद्रा फुंदे, दीपांजली धाडवे, दीपाली काटकर, अनंत कोबनाक, हे कलाकार मुख्य भूमिकेत पाहायला मिळणार आहेत. चौफेरची रसिक प्रेक्षकांना आतुरता लागून राहिली आहे.

## विद्यार्थ्यांना दप्तरे, अनाथांना ब्लँकेट वाटप

**महाड :** राज्याचे कॅबिनेट मंत्री भरत गोगावले त्यांचे सुपुत्र विकास शेठ गोगावले यांचा दि. २७ डिसेंबर रोजी वाढदिवस मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. विकास गोगावले यांच्या वाढदिवसानिमित्त महाड विधानसभा मतदारसंघात वेगवेगळे उपक्रम राबवत साजरा करण्यात आला.

असाच एक उपक्रम ढालकाटी येथील विकास शेठ गोगावले मित्र मंडळ ढालकाठी राबवण्यात आला असून, या मंडळाच्यावतीने खरवली येथील जिल्हा परिषद प्राथमिक शाळेत विद्यार्थ्यांना दप्तर वाटप आणि राजेवाडी येथील स्वराज्य निवारा अनाथ आश्रमात ब्लँकेट वाटप करून वाढदिवस साजरा केला. स्वराज निवारा अनाथाश्रमात मंडळाच्यावतीने भोजनाची सोयदेखील करण्यात आली होती.

# ट्रेलर, ट्रकच्या रांगा

■ **प्रवाशांसह नागरिकांचा जीव धोक्यात**

| रसायनी | प्रतिनिधी |

पळस्पेफाटा ते शिरढोण गाव मार्गावरील कंटेनर फ्रेट स्टेशन आणि लॉजिस्टिक यार्डमुळे होणाऱ्या बेकायदेशीर वाहतूक कोंडीमुळे हजारो प्रवासी व स्थानिक ग्रामस्थ गेल्या अनेक वर्षांपासून त्रस्त आहेत. दळणवळण, वाहतूक व व्यवसायासाठी आवश्यक असलेल्या सुरक्षिततेच्या नियमांचे सर्रास उल्लंघन होत असल्याचे चित्र पुन्हा एकदा समोर आले आहे.लॉजिस्टिक यार्डमध्ये जाणाऱ्या शेकडो ट्रेलर, ट्रकांनी मुख्य रस्त्यापासून थेट उड्डाण पुलावर धोकादायक पद्धतीने पार्किंग केल्याचे निदर्शनास येत आहे. या प्रकारामुळे वाहतुकीचा खोळंबा होऊन प्रवाशांना जीव मुठीत धरून प्रवास करावा लागत आहे. यामुळे स्थानिक ग्रामस्थांच्या सुरक्षिततेलाही मोठा धोका निर्माण झाला आहे.



नियमांचे उल्लंघन करणाऱ्या बेजबाबदार लॉजिस्टिक यार्डमुळे दररोज होणाऱ्या वाहतूक कोंडीमुळे नागरिकांमध्ये तीव्र संताप व्यक्त होत आहे. या गंभीर घटनेची महाराष्ट्र राज्य पत्रकार संघाचे जिल्हाध्यक्ष राकेश खराडे यांच्या मार्गदर्शनाखाली खालापूर तालुका सदस्य साबीर शेख यांनी स्वतः दखल घेत लॉजिस्टिक पार्क विभागाशी संपर्क साधला. संबंधित ठिकाणी ट्रेलर चालकांना सूचना देत वाहतूक नियंत्रणाच्या दृष्टीने वाहतूक पोलीस व संबंधित नियंत्रण विभागास ही माहिती देण्यात आली. या प्रकारावर तातडीने अंकुश आणण्यासाठी व उपयोजना होण्यासाठी सूचना केल्या.

वाहतूक पोलीस व नियंत्रण विभागाने लॉजिस्टिक यार्डची पार्किंग क्षमता व नियमांची काटेकोर तपासणी करावी, वर्क ऑर्डर किंवा व्यावसायिक परवाने देताना कठोर अटी व शर्ती लागू कराव्यात, यार्डमध्ये पार्किंग, शौचालय, सांडपाणी व्यवस्थापन यांसारख्या मूलभूत सुविधा नसल्यास संबंधित उद्योग परवाने कायमस्वरूपी रद्द करावेत, अशी ठोस मागणीवजा सूचनाही करण्यात आली आहे.

यार्ड व्यवस्थापनाने या घटनेची तातडीने दखल घेतल्याचे दिसून आले असले, तरी भविष्यात उड्डाण पुलावर ओव्हरलोड व बेकायदेशीर ट्रक पार्किंगमुळे गंभीर अपघात होण्याची दाट शक्यता वर्तवली जात आहे. या पार्श्वभूमीवर प्रशासन कोणत्या ठोस उपाययोजना करणार, याकडे नागरिकांचे लक्ष लागून राहिले आहे.

## दिव्यांग संघटनेकडून नगराध्यक्षांना शुभेच्छा



| उरण | प्रतिनिधी |

उरण नगरपरिषद महाविकास आघाडीच्या नवनिर्वाचित नगराध्यक्ष भावना घाणेकर व नगरसेवकांना उरण दिव्यांग सामाजिक संस्थेच्यावतीने अभिनंदन करून शुभेच्छा दिल्या. यावेळी भूषण घरत, संतोष पवार, ओमकार घरत, महाविकास आघाडी कार्यकर्ते व दिव्यांग संस्थेचे सदस्य, सदस्या आदी उपस्थित होते.

# कृष्णामामा महाजन स्मृती पुरस्काराचे वितरण




| दापोली | प्रतिनिधी |

दापोलीच्या सामाजिक वर्तुळात ज्या पुरस्काराचे नाव मानाने घेतले जाते असा कै. कृष्णामामा महाजन स्मृतिपुरस्कार कोळथरेच्या कृष्णामामा महाजन स्मृतिप्रतिष्ठानतर्फे दिला जातो. कै. मामांच्या रुचीचे आणि अभ्यासाचे विषय असणारे आरोग्य, उद्योजकता, समाज प्रबोधन आणि शिक्षण यापैकी एक विषयात उत्तुंग कार्य करणाऱ्या एक अप्रकाशित व्यक्तीला या पुरस्काराने सन्मानित केले जाते.

यावर्षी हा पुरस्कार दाभोळचे सुप्रसिद्ध डॉ.कै.मधुकर लुकतुके यांना मरणोत्तर प्रदान करण्यात आला. यावर्षीचा पुरस्कार आयुष्मान भारत मिशन महाराष्ट्र अध्यक्ष डॉ. ओमप्रकाश शेटे यांच्या हस्ते प्रदान करण्यात आल्याने पुरस्काराचे महत्व अधिक अधोरेखित झाले, कारण २०१४ पासून डॉ.शेटे यांनी सरकारच्या माध्यमातून मुख्यमंत्री वैद्यकीय सहाय्यता कक्ष प्रमुख, केंद्रिय आरोग्य मंत्र्यांचे निजी सचिव आणि आता आयुष्मान भारत मिशनचे अध्यक्ष म्हणून हजारो गरजू गरीब रुग्णांचे मोफत उपचार, शस्त्रक्रिया करून दिल्या आहेत. संपूर्ण महाराष्ट्रात आज डॉ.शेटे हे आरोग्यदूत म्हणून ओळखले जातात. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन डॉ.मृणाल गोंधळेकर, स्वागत प्रतिष्ठानचे अध्यक्ष बिपिन दादा पाटणे प्रास्ताविक प्रतिष्ठान कार्यवाह गंगाराम इदाते, सन्मानपत्र वाचन कौस्तुभ दाबके , आभार प्रदर्शन मिहीर महाजन यांनी केले. कार्यक्रमाची सांगता संपूर्ण वंदे मातरम ने झाली असून यावेळी प्रतिष्ठान कोषाध्यक्ष दीपक महाजन यांच्यासह प्रतिष्ठानचे कार्यकर्ते , माजी आमदार डॉ.मोकल, दाभोळच्या सरपंच राखी तोडणकर यांच्यासह पंचक्रोशीतील अनेक गावांचे सरपंच उपसरपंच , अन्य प्रतिष्ठित नागरिक उपस्थित होते. कार्यक्रम संपताच डॉ.शेटे यांच्या समवेत आरोग्य विभागाचे कर्मचारी , उपस्थित डॉक्टर्स यांचे एक अनौपचारिक चर्चासत्र घेण्यात आले.

पान १ वरून

## महापालिकेवर फडकणार लाल बावटा

महाविकास आघाडी म्हणून शेतकरी कामगार पक्ष, शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे), काँग्रेस, राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष, महाराष्ट्र नवनिर्माण सेना, समाजवादी पक्ष, असे सर्व एकत्रितपणे निवडणूक लढवत आहोत आणि या वेळेस आपली सत्ता पनवेल महानगरपालिकेत निश्चितपणे येईल.यावेळी तुषार पाटील यांच्यासोबत परशुराम बाळाराम पाटील, तुषार परशुराम पाटील, रिना तुषार पाटील, अंगत मारुती पाटील, संदेश भरत म्हात्रे, कुणाल गजानन पाटील, अरविंद गजानन पाटील, अक्षय परशुराम पाटील, अमोल संतोष पाटील, दिपक नरेश भोईर, सचिन भरत म्हात्रे, जितेश जगन्नाथ म्हात्रे, किरण मदन म्हात्रे, मिलिंद जगन्नाथ म्हात्रे, उदय सुरेश म्हात्रे, राज रमेश म्हात्रे आदींनी पक्ष प्रवेश केला. या कार्यक्रमास बाळाराम पाटील, माजी सभापती काशिनाथ पाटील, भात गिरणीचे चेअरमन रवींद्र पाटील, ज्ञानेश्वर मोरे, ज्ञानेश्वर पाटील, माजी नगरसेवक गोपाळ भगत, अनंता पाटील आदी मान्यवर उपस्थित होते.

## खुनाच्या गुन्ह्यातील आरोपींना २४ तासांत अटक

एकटाच राहात असल्याचे सांगितले. तो म्हसाळा पंचायत समिती येथून सेवानिवृत्त झाला असल्याचे सांगितले. त्यांना मयताचे शरीरावर डोक्यास पाठीवर व हातापायांपी जखम असल्याचे दिसून आल्याने मयत याचा कोणत्याही अज्ञात कारणावरून कोणत्यातरी हत्याराने मारहाण करून जीवेठार केल्याचे दिसून आले. सदर खुनाचा संशयित आरोपी म्हणून संदीप चंद्रकांत पवार, राहणार खंनोलौशी, ता. श्रीवर्धन आदिवासी वाडी, प्रकाश लक्ष्मण वाघमारे सध्या राहणार खंनोलौशी, ता. श्रीवर्धन यांनी सदर गुन्हा केला असल्याचे कबूल केले आहे. या आरोपींना दिघी सागरी पोलिसांनी अटक केली आहे. अधिक तपास दिघी सागरी पोलीस करीत आहेत.

## अंबा नदी पात्रात अनोळखी मृतदेह

व जांभुळपाडा दूरक्षेत्रातील पोलिसांना या घटनेची माहिती देताच पोलीस तात्काळ घटनास्थळी पोहोचले व मृतदेह बाहेर काढून त्याची ओळख पटविण्यासाठी प्रयत्न करीत आहेत. यासंदर्भात पाली पोलीस निरीक्षक हेमलता शेरेकर यांनी सदर मृतदेह पुरुषाचा असून, त्याची ओळख अद्याप पटली नसल्याची माहिती दिली. पुढील पोलीस तपास सुरू असून, नागरिकांनी सहकार्य करावे, असे आवाहन पो.नि. शेरेकर यांनी केले.

## बीच महोत्सवात स्थानिकांना डावलले

आमंत्रण देण्यात आले नसल्याचे स्पष्ट झाले. विशेष म्हणजे, रेवदंडा ग्रामपंचायतीतील महायुतीतील भाजपचे उपसरपंच, काही ग्रामपंचायत सदस्य तसेच अनेक स्थानिक नेते उद्घाटनाला अनुपस्थित राहिले. या कार्यक्रमास सरपंच प्रफुल्ल मोरे व शिवसेना शिंदे गटाचे दोन ग्रा.पं. सदस्य यांचीच फक्त उपस्थिती होती. उद्घाटन कार्यक्रमास आमदार उपस्थित राहणार म्हणून शिवसेना शिंदे गटाचे कार्यकर्ते उपस्थित होते, यामुळे कार्यक्रम शिंदे गटाचा की शासनाचा, याबाबत चर्चा सुरू होती.

स्थानिकांचा आरोप आहे की, हा शासनाचा कार्यक्रम असतानाही पक्षनिरपेक्षता पाळण्यात आली नाही. उद्घाटनप्रसंगी प्रामुख्याने एका विशिष्ट राजकीय गटाचे कार्यकर्ते उपस्थित असल्याचे चित्र दिसून आले. त्यामुळे 'शासनाच्या सांस्कृतिक कार्य विभागाने राजकारणविरहित आणि सर्वसमावेशक कार्यक्रमाचे नियोजन केले नाही,' अशी कुजबूज संपूर्ण रेवदंडा परिसरात सुरू आहे.याशिवाय महोत्सवातील स्टॉल वाटपातही स्थानिक व्यावसायिक व महिला बचत गटांना अल्प संधी देण्यात आल्याने नाराजी व्यक्त करण्यात येत आहे. ग्रामस्थांच्या म्हणण्यानुसार, या उपक्रमातून स्थानिकांना आर्थिक लाभ मिळण्याऐवजी बाहेरील घटकांनाच प्राधान्य देण्यात आले.

महत्त्वाचे म्हणजे, या कार्यक्रमाची संकल्पना मांडणारे आर्यन देसाई यांनी यापूर्वी ग्रामसभेत कार्यक्रमाची माहिती दिली होती. त्यावेळी ग्रामस्थांनी कार्यक्रमाची रूपरेषा स्पष्ट करावी व स्थानिकांना विश्वासात घ्यावे, अशी मागणी केली होती. मात्र, ग्रामसभेतील सूचनांकडे दुर्लक्ष करून प्रशासनाने एकतर्फी निर्णय घेतल्याचा आरोप होत आहे.

एकूणच, रायगडच्या पर्यटन विकासाच्या नावाखाली स्थानिक ग्रामस्थ, लोकप्रतिनिधी, पत्रकार व सामाजिक घटकांना डावलण्यात आल्याने शासनाच्या सांस्कृतिक कार्य विभागाच्या या उपक्रमाविरोधात तीव्र प्रतिक्रिया उमटत आहेत. प्रशासनाने भविष्यात असे उपक्रम राबविताना स्थानिकांना विश्वासात घ्यावे, अन्यथा आंदोलनाचा मार्ग स्वीकारावा लागेल, असा इशाराही ग्रामस्थांकडून देण्यात येत आहे.


### जाहीर नोटीस

याद्वारे सर्व लोकांस कळिवण्यात येते की, मौजे लाडीवली, ता. कर्जत, जि. रायगड येथील खालील सविस्तरपणे नमूद केलेली जमिन मिळकत आमचे अशिल सौ. सुलभा गजानन खडे यांनी सदरहू मिळकतीचे विद्यमान मालक सौ. भारती भानुदास पालकर, श्रीम. मालती मधुकर भोईर व श्री. विजय शांताराम तवळे यांचे कडून विकत घेण्याचे ठरविले आहे.

**मिळकतीचे वर्णन**

| सर्व्हे नं. | हिस्सा नं. | क्षेत्रफळ हे. आर. पॉ. | आकार रुपये-पैसे |
|---|---|---|---|
| २ | ३ | ०.३९.००<br>पो.ख. ०.०३.००<br>एकुण ०.४२.०० | ७.४४ |
| यापैकी खरेदी देणार यांचे मालकीचे अविभक्त सामाईक हिश्श्याचे ०.२१.०० हे.आर.पॉ.इतके क्षेत्र. | | | |

वरील वर्णन केलेल्या जमिन मिळकतीचे बाबतीत कोणाचाही दान, गहाण, फरोक्त, अगर अन्य कोणत्याही प्रकारचा हक्क, कायदेशीर हितसंबंध, करार असल्यास त्यांनी ही नोटीस प्रसिध्द झाल्यापासून १४ दिवसांच्या आत योग्य त्या कायदेशीर लेखी पुराव्यासह खालील नमूद केलेल्या पत्यावर कळवावे.

वरील मुदतीत कोणाचीही काहीही हरकत न आल्यास सदर मिळकत निर्वेध, बोजारहीत असल्याचे समजून आमचे अशिल कायम स्वरूपी खरेदी करण्याचा व्यवहार पूर्ण करतील. मुदतीनंतर येणाऱ्या हरकतीचा विचार केला जाणार नाही याची नोंद घ्यावी.

कर्जत
ता. २८/१२/२०२५.

सही/-
**अ‍ॅड. पूजा गणेश म्हसे**
ऑफीस नं. ४, रिजेन्सी प्लाझा, निर्माण नगरी,
नेरळ (पू) ता. कर्जत, जि. रायगड
मो. ८०८७४३०४४७

### जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, आमचे अशिलांनी खालील वर्णनाची जमिन मिळकत तिचे मालक सीताबाई रामा मुने व इतर यांचेकडून खरेदी करण्याचे ठरविलेले आहे. तिचे तपशिलवार वर्णन पुढीलप्रमाणे :-

मौजे जांभिवली तालुका कर्जत जिल्हा रायगड येथील जमिन मिळकत

| सर्व्हे नंबर/ हिस्सा नंबर | क्षेत्र (हे. आर. पॉ.) | आकार (रु.पै.) |
|---|---|---|
| ५७/३ | एकुण क्षेत्र ०-३६-४० हे.आर.पॉ | ३-७५ |

या मिळकतीशी कोणत्याही इसमाचा अगर संस्थेचा कोणत्याही प्रकारचा हक्क हितसंबंध, बयाना-पावती, खरेदीखत, साठेकरार, गहाण, दान, बोजा, लीज, कब्जा, लोन, भाडेपट्टा, अगर फरोक्त वा इतर कोणताही कायदेशीर हक्कहितसंबंध असल्यास आणि किंवा त्यांची आमचे अशिलांच्या खरेदी-विक्रीच्या व्यवहारास हरकत असल्यास, त्यांनी तसे आम्हास ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १४ (चौदा) दिवसांत लेखी पुराव्यासह खालील सही करणार अ‍ॅडव्होकेट यांचेकडे कळवावे. वरील मुदतीत कोणीही हरकत न घेतल्यास, वरील मिळकतीशी कोणत्याही इसमाचा अगर संस्थेचा कसल्याही प्रकारचा हक्क हितसंबंध नाही, किंवा असल्यास, तो हक्क हितसंबंध त्यांनी आमचे अशिलांच्या लाभात सोडून दिलेला असून, त्यांची आमचे अशिलांच्या खरेदी-विक्रीच्या व्यवहारास कोणतीही हरकत नाही, असे समजण्यात येऊन आमचे अशिल खरेदी-विक्रीचा व्यवहार पूर्ण करतील. मागाहून कोणतीही तक्रार विचारात घेतली जाणार नाही.

दिनांक : २९/१२/२०२५

खरेदीदारातर्फे वकील **अ‍ॅड. वृषाली रघुनाथ मोरे**
मोबा. ८५३०१४६८५४
ऑफिस पत्ता- शॉप नं. २९, तळ मजला, हिरापन्ना शॉपिंग प्लाझा बिल्डींग, भारत गॅस समोर, अमराई रोड, कर्जत ता. कर्जत, जि. रायगड ४१०२०१

खरेदीदारातर्फे वकील **अ‍ॅड. निलेश कान्हु मोरे**
मोबा. ९८२२६९११०९
ऑफिस पत्ता-शॉप नं.२९. तळ मजला, हिरापन्ना शॉपिंग प्लाझा बिल्डींग, भारत गॅस समोर, अमराई रोड, कर्जत ता. कर्जत, जि. रायगड ४१०२०१

### जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, आमचे अशिलांनी खालील वर्णनाची जमिन मिळकत तिचे मालक वैशाली विष्णू काळण व पुनम साईनाथ मुने यांचेकडून खरेदी करण्याचे ठरविलेले आहे. तिचे तपशिलवार वर्णन पुढीलप्रमाणे :-

मौजे जांभिवली तालुका कर्जत जिल्हा रायगड येथील जमिन मिळकत

| सर्व्हे नंबर/ हिस्सा नंबर | क्षेत्र (हे. आर. पॉ.) | आकार (रु.पै.) |
|---|---|---|
| ७३/१/ड | एकुण क्षेत्र ०-५२-७० हे.आर.पॉ | ८-०० |

या मिळकतीशी कोणत्याही इसमाचा अगर संस्थेचा कोणत्याही प्रकारचा हक्क हितसंबंध, बयाना-पावती, खरेदीखत, साठेकरार, गहाण, दान, बोजा, लीज, कब्जा, लोन, भाडेपट्टा, अगर फरोक्त वा इतर कोणताही कायदेशीर हक्कहितसंबंध असल्यास आणि किंवा त्यांची आमचे अशिलांच्या खरेदी-विक्रीच्या व्यवहारास हरकत असल्यास, त्यांनी तसे आम्हास ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून ०७ (सात) दिवसांत लेखी पुराव्यासह खालील सही करणार अ‍ॅडव्होकेट यांचेकडे कळवावे. वरील मुदतीत कोणीही हरकत न घेतल्यास, वरील मिळकतीशी कोणत्याही इसमाचा अगर संस्थेचा कसल्याही प्रकारचा हक्क हितसंबंध नाही, किंवा असल्यास, तो हक्क हितसंबंध त्यांनी आमचे अशिलांच्या लाभात सोडून दिलेला असून, त्यांची आमचे अशिलांच्या खरेदी-विक्रीच्या व्यवहारास कोणतीही हरकत नाही, असे समजण्यात येऊन आमचे अशिल खरेदी-विक्रीचा व्यवहार पूर्ण करतील. मागाहून कोणतीही तक्रार विचारात घेतली जाणार नाही.

दिनांक : २९/१२/२०२५

खरेदीदारातर्फे वकील **अ‍ॅड. वृषाली रघुनाथ मोरे**
मोबा. ८५३०१४६८५४
ऑफिस पत्ता-शॉप नं.२९, तळ मजला, हिरापन्ना शॉपिंग प्लाझा बिल्डींग, भारत गॅस समोर. अमराई रोड, कर्जत ता. कर्जत, जि. रायगड ४१०२०१

खरेदीदारातर्फे वकील **अ‍ॅड. निलेश कान्हु मोरे**
मोबा. ९८२२६९११०९
ऑफिस पत्ता-शॉप नं.२९. तळ मजला, हिरापन्ना शॉपिंग प्लाझा बिल्डींग, भारत गॅस समोर अमराई रोड, कर्जत ता. कर्जत, जि. रायगड ४१०२०१

### जाहीर नोटीस

तारीख २९ डिसेम्बर २०२५

तमाम लोकांस या जाहीर नोटिशीने कळविण्यात येत आहे कि १) आदिती मिलिंद सावंत, २) प्रशाली सचिन सावंत, ३) सुनिता प्रभाकर सावंत, ४) मिलींद प्रभाकर सावंत, ५) नितीन प्रभाकर सावंत, आणि ६) सचिन प्रभाकर सावंत रा.मु. हुमगाव, तालुका कर्जत, जिल्हा रायगड (यास यापुढे 'मूळमालक' असा उल्लेख केला आहे) यांची मौजे हुमगाव, तालुका कर्जत, जिल्हा रायगड येथील खालील वर्णनाची सामायिक मालकीची 'शेतजमीन मिळकत' माझे अशीले सौ. मेघा अमित कसबे राहणार घाटकोपर मुंबई हे कायमस्वरूपी खरेदी करण्याचा विचार करत आहे. सदर शेतजमीन मिळकतीचे वर्णन खालील प्रमाणे

**शेत जमीन मिळकतीचा तपशील**
**मौजे हुमगाव, तालुका कर्जत, जिल्हा रायगड**

| गट/भूमापन क्रमांक व उपविभाग | लागवड योग्य क्षेत्र | क्षेत्र हे.आर.पॉ. | भू-धारणा पद्धती |
|---|---|---|---|
| | जिरायत | ०-१९-१० | भोगवटादार वर्ग १ |
| | वरकस | ०-०८-२० | |
| | पोटखराब क्षेत्र | ०-०३-३० | |
| | एकूण | ०-३०-६० | |

कोणाही व्यक्ती किंवा अनेक व्यक्ती कंपनी कार्यालय यांचा सदर शेतजमीन किंवा त्यावर त्याच्या भागावर विक्री, गहाणवट, लिअन, भेट किंवा अन्य कोणत्याही प्रकारे हक्क असेल तर त्याच्या पुष्ठ्यर्थ त्यांनी अशा हक्काबाबत/हरकतीबाबत सूचना त्यात हक्क/हरकतीचा स्वरूप यांची माहिती अन्य तपशीलसह कि जो पुरावा म्हणून पुरेशी ठरेल तसेच कागदोपत्री पुरावा खाली सही करणाऱ्या कडे त्यांच्या कार्यालयात हि नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १५ दिवसांच्या आत सादर करावी आणि जर तसे केले नाही तर असे गृहीत धरण्यात येईल कि, सदर शेतजमीन हि सर्व प्रकारच्या बंधनातून आणि अन्य हक्कापासून आणि अधिकारापासून किंवा अन्य प्रकारची या बंधनातून मुक्त असेल आणि तसे जर काही हक्क असतील तर ते सोडून देण्यात आले आहेत असे मानण्यात येईल आणि माझे अशील कोणतेही हक्क, हरकती आल्याच तर त्याचा विचार न करता सदर शेतजमीन खरेदी करण्याचा दृष्टीने दिलेली मुदत संपल्यानंतर कार्यवाही करेल.

निकिता शेलार ९८७०७१४५८३
वकील उच्च न्यायालय
ऑफिस रूम नंबर ००४ पी-९ नुपूर पॅलेस शीतल
नगर मीरा रोड ईस्ट डिस्ट्रिक्ट ठाणे ४०११०७

# रायगड जिल्हा पर्यटकांनी बहरला



नाताळच्या सुट्ट्यांचा पर्यटनासाठी पुरेपूर फायदा घेण्यासाठी व नव्या वर्षाच्या स्वागतासाठी पुणे-मुंबईसह महाराष्ट्रातील निरनिराळ्या ठिकाणच्या पर्यटकांची पावले रायगड जिल्ह्यातील पर्यटन स्थळांकडे स्थिरावली आहेत. त्यामुळे गुरुवार दि.२५ डिसेंबर पासुनच रायगड जिल्ह्यातील विविध समुद्रकिनारे, मंदिरे, ऐतिहासिक वास्तु, किल्ले, तीर्थक्षेत्र व इतर पर्यटन स्थळे पाहण्यासाठी पर्यटकांसह शाळकरी व महाविद्यालय सहलींचा ओघ वाढत आहे. त्यामुळे पर्यटनावर अवलंबून असलेले छोटे-मोठे व्यावसायिक, हॉटेल, खानावळी, दुकानदार यांची सध्या चलती आहे. रायगड व कोकणचे मनमोहक सौंदर्य पर्यटकांना नेहमीच खुणावत असून यंदा रायगड जिल्हा पर्यटकांनी हाऊसफुल्ल झाला आहे. दरम्यान, पर्यटकांना वाहतुक कोंडीचा देखील मोठ्या प्रमाणात सामना करावा लागत आहे.



● २०२५च्या शेवटच्या विकेण्डला अलिबाग समुद्किनारी पर्यटकांनी भरपूर गर्दी केली होती. मात्र, आलेल्या पर्यटकांना परतीच्या प्रवासावेळी अलिबाग-वडखळ मार्गावर वाहतूक कोंडीचा सामना करावा लागला. (छायाचित्र : समीर मालोदे)

## कर्नाळा पक्षी अभयारण्यात मोठी गर्दी






। पनवेल । प्रतिनिधी ।

मुंबई-गोवा महामार्गावर असलेल्या कर्नाळा पक्षी अभयारण्यात वर्षातील शेवटचा रविवार असल्याने दि.२८ डिसेंबर रोजी पर्यटकांची मोठी गर्दी पाहायला मिळाली. सुट्टीचा दिवस आणि आल्हाददायक हवामान याचा लाभ घेत लहान मुलांपासून ते ज्येष्ठ नागरिकांपर्यंत अनेक कुटुंबे कर्नाळा परिसरात दाखल झाली होती. महिला वर्गाचीही लक्षणीय उपस्थिती दिसून आली.

कर्नाळा येथील विविध जातींच्या पक्ष्यांचा किलबिलाट आणि निसर्गात घुमणारा पक्ष्यांचा मधुर आवाज पर्यटकांचे विशेष आकर्षण ठरत होता. पक्ष्यांचे आवाज ऐकत जंगलातून फेरफटका मारण्याचा अनुभव पर्यटकांसाठी अविस्मरणीय ठरला. यावेही कर्नाळा किल्ल्याच्या दर्शनासाठीही मोठ्या प्रमाणावर गर्दी झाली होती. देशांतर्गत पर्यटकांसोबतच परदेशी पर्यटकही मोठ्या संख्येने कर्नाळा अभयारण्यात येत असल्याचे दिसून आले. निसर्गसौंदर्य, शांतता आणि जैवविविधतेमुळे कर्नाळा पर्यटकांचे आवडते ठिकाण बनले आहे. वर्षाच्या शेवटच्या रविवारी कर्नाळा परिसर पर्यटनाने आणि पक्ष्यांच्या किलबिलाटाने अक्षरशः फुलून गेला होता.

## नेरळ-माथेरान घाटरस्ता सुरळीत

### पोलीस अधीक्षकांचे वाहतूक नियोजन

। नेरळ । प्रतिनिधी ।

नेरळ-माथेरान घाटरस्ता शनिवार-रविवार तसेच सलग सुट्ट्या लागून आल्यांनतर वाहतूक कोंडीत सापडत असतो. यावर्षी ख्रिसमस आणि सरत्या वर्षाला निरोप देण्यासाठी माथेरानमध्ये पर्यटकांची मोठ्या प्रमाणत गर्दी होत आहे. विशेष म्हणजे दरवेळेला वाहतूक कोंडीत सापडणारा हा घाटरस्ता यावेळी कोंडीत सापडला नाही. जिल्हा पोलीस अधीक्षक आंचल दलाल यांनी कोंडीचे नियोजन केल्याने ही समस्या उद्भवली नाही.



ख्रिसमस आणि सरत्या वर्षाला निरोप देण्यासाठी येणाऱ्या पर्यटकांमुळे दरवर्षी माथेरान फुल्ल होत असते. त्यात पर्यटकांच्या मोठ्या संख्येने येणाऱ्या वाहनांमुळे नेरळ-माथेरान घाट रस्ता वाहतूक कोंडीत अडकत असतो. त्यामुळे पर्यटकांना या वाहतूक कोंडीत दोन-तीन तास पर्यटकांची अडकून पडावे लागते. मागील शनिवार-रविवारी हिच परिस्थिती माथेरानमध्ये होती. त्यात नाताळच्या सलग सुट्ट्या लागून आल्यानंतर पर्यटकांसह त्यांच्या खासगी वाहनांचे प्रमाण वाढल्याने तासनतास कोंडीत अडकून पडण्याची वेळ पर्यटकांवर येत होती. त्यामुळे यावर ठोस उपाययोजना करण्यासाठी जिल्ह्याच्या पोलीस अधीक्षक आंचल दलाल भर दिला. त्यांनी जिल्ह्यातील सर्व पर्यटन स्थळांवरील रस्त्यांचा अभ्यास करून वाहतूक कोंडी होणारी स्थाने निश्चित केली. त्यानुसार या कालावधीत वाहतूक पोलिसांचे नियोजन करण्याच्या सूचना जिल्ह्याचे वाहतूक भुजबळ यांना सर्वाधिकार देत वाहतूक कोंडीत कोणी अडकणार नाही, यावर नियोजन करण्याचे धोरण निश्चित केले. त्यानुसार माथेरानकडे खासगी वाहने घेऊन जाणाऱ्या पर्यटकांची संख्या लक्षात घेऊन दस्तुरी नाका, तसेच नेरळ येथील हुतात्मा चौकात वाहतुकीचे नियोजन करणारे पॉईंट बनविण्यात आले. दरम्यान, माथेरान दस्तुरी नाका येथील वाहनतळ फुल्ल झाल्यावर खाली नेरळ येथे खासगी वाहनांना पार्किंग करण्याची सूचना केली जाते. तेथून टॅक्सी सेवेने माथेरान कडे पाठवण्यात येते. त्यामुळ शनिवारी (दि.२७) व रविवारी (दि.२८) नेरळ-माथेरान घाटरस्ता वाहतूक कोंडीत सापडला नाही.

## नववर्षाच्या स्वागतासाठी किनारे फुलले

। कोर्लई । प्रतिनिधी ।

सरत्या वर्षाला निरोप देऊन नववर्षाच्या स्वागतासाठी मुरुडसह काशिद समुद्रकिनारा व तालुक्यातील इतर किनारे पर्यटकांनी फुलले आहेत. यावेळी रस्त्याच्या दुतर्फा वाहनांच्या लांबचलांब रांगा लागलेल्याचे चित्र होते. तर, काही ठिकाणी पर्यटकांना वाहतूक कोंडीला सामोरे जावे लागत आहे.



मुरूड तालुक्यातील समुद्रकिनाऱ्यांपैकी काशीद समुद्रकिनारी भरतीच्या वेळेस फेसाळणारे पाणी, उसळणाऱ्या लाटा, शुभ्र वाळू पर्यटकांना आकर्षित करत असते. तसेच, या ठिकाणी पर्यटकांच्या सोयी-सुविधा देखील उपलब्ध आहेत. त्याचबरोबर या ठिकाणी असललेली स्पीडबोट, पॅरसेलिंगबोट, बनाना, बंफर तसेच घोडा व उंटावरील सफर पर्यटनाचा आनंद द्विगुणीत करते. पर्यटकांना विविध खाद्य-पेय, चहा-नाष्टा याची सोय देखील उपलब्ध आहेत. त्यामुळे शनिवार-रविवारी कोर्लई समुद्रकिनारी व सुट्टीच्या दिवशी मोठ्या प्रमाणात पर्यटक भेट देत असतात. दरम्यान, सरत्या वर्षाला निरोप देण्यासाठी व नव वर्षाचे स्वागत करण्यासाठी मुरुडसह काशिद समुद्रकिनारा फुलला असून थर्टीफस्टसाठी लॉंज बुकिंग फुल झाले आहेत. यावेळी पर्यटकांसह स्थानिकांना मोठ्या प्रमाणात वाहतुक कोंडीचा देखील सामना करावा लागत आहे.





● सलग सुट्टी आल्याने मुरुड समुद्रकिनारी पर्यटकांनी गर्दी केली. या ठिकाणी पार्किंगची योग्य सोय झाल्याने पर्यटकांच्या संख्येत वाढ झाली आहे. (छायाचित्र : सुधीर नाझरे)

## अष्टविनायक तीर्थक्षेत्री पर्यटकांची मांदियाळी

। पाली/बेणसे । प्रतिनिधी ।

अष्टविनायकांपैकी दोन गणपती हे रायगडमध्ये आहेत. एक खालापुर तालुक्यातील महडचा वरदविनायक आणि दुसरा सुधागड तालुक्यातील पालीचा बल्लाळेश्व. सध्या नाताळची सुट्टी आणि नव वर्षाच्या स्वागतासाठी येथे भाविक पर्यटकांची दर्शनासाठी रीघ लागलेली आहे. येथे आलेल्या भक्तांची राहण्याची सोय करण्यासाठी बल्लाळेश्वर देवस्थानच्यावतीने दोन भक्तनिवासांमध्ये अतिशय



अल्पदरात चांगली व्यवस्था करण्यात येत आहे. हे भक्तनिवास भरले तरी इतर खासगी लॉज देखील उपलब्ध आहेत. अनेक भक्त महडच्या वरदविनायकाचे दर्शन घेऊन पालीच्या बल्लाळेश्वराच्या दर्शनासाठी येतात. मंदिराच्या आसपास असलेली फुल, हार, नारळ, प्रसाद, पुजेचे साहित्याची दुकाने सजली आहेत. असे येथील व्यवसायिक राहुल मराठे यांनी सांगितले.

## खारघरमधील वाईन शॉपमध्ये राडा

। पनवेल । प्रतिनिधी ।

खारघरमधील गोल्ड कॉईन वाईन मार्टमध्ये मद्यधुंद तरुणाने धिंगाणा घालत भीषण राडा केल्याची घटना घडली आहे. दारूच्या नशेत असलेल्या एका तरुणाने रात्रीच्या सुमारास वाईनशॉपमध्ये घुसून लाकडी बांबूने नामफलक व इतर साहित्याची तोडफोड केली. अचानक झालेल्या या प्रकारामुळे परिसरात एकच गोंधळ उडाला होता. या घटनेच्या वेळी तरुणाने दुकानासमोर मोठा गदारोळ केला होता. यावेळी परिस्थिती नियंत्रणाबाहेर जात असल्याचे पाहून स्थानिक नागरिकांनी हस्तक्षेप करत संबंधित तरुणाला चोप देत ताब्यात घेतले. त्यानंतर खारघर पोलिसांना घटनेची माहिती देण्यात आली. खारघर पोलिसांनी तात्काळ घटनास्थळी धाव घेत मद्यधुंद तरुणाला ताब्यात घेतले. या प्रकरणी त्याच्यावर गुन्हा दाखल करण्यात आला असून पुढील चौकशी सुरू आहे. या घटनेमुळे परिसरातील व्यापारी व नागरिकांमध्ये संताप व्यक्त करण्यात येत आहे. पोलिसांनी अशा प्रकारच्या गैरप्रकारांवर कठोर कारवाईची मागणी स्थानिकांनी केली आहे.

## दिशादर्शक फलक नसल्याने पर्यटक संभ्रमात

। म्हसळा । प्रतिनिधी ।

दिघी-पुणे राष्ट्रीय महामार्गावर असलेला म्हसळा चेक पोस्ट हा म्हसळा तालुका शहराचा प्रमुख नाका आहे. या ठिकाणी माणगाव, श्रीवर्धन, दिवेआगर, हरिहरेश्वर व गोरेगावकडे जाणारे महत्त्वाचे राज्य मार्ग एकत्र येतात. तसेच, याच ठिकाणी म्हसळा पोलीस ठाण्याचा चेक पोस्ट देखील कार्यान्वित आहे. मात्र, या महत्त्वाच्या ठिकाणी आजतागायत दिशादर्शक फलक लावण्यात न आल्याने प्रवासी व पर्यटकांना मोठ्या अडचणींना सामोरे जावे लागत आहे. खासगी रस्ते विकासकांनी एमएसआरडीसीमार्फत रस्ता



विकसित केला असला तरी, म्हसळा चेक पोस्ट येथे दिशादर्शक फलक नसल्यामुळे वाहनचालकांना योग्य मार्ग ठरवताना संभ्रम निर्माण होतो. या ठिकाणी मार्गदर्शक फलकासाठी खांब उभारण्यात आले असले तरी गेल्या दहा वर्षांपासून त्या खांबांवर कुठला मार्ग कुठे जातो, याची माहिती देणाऱ्या पाट्या लावण्यात आलेल्या नाहीत.

काही वेळा चेक पोस्टवर पोलीस कर्मचारी उपलब्ध नसल्याने वाहनचालकांची कुचंबना अधिक वाढते. या पार्श्वभूमीवर संबंधित यंत्रणांनी तातडीने लक्ष देऊन म्हसळा चेक पोस्ट येथे स्पष्ट व योग्य दिशादर्शक फलक बसवावेत, अशी मागणी म्हसळा येथील निवासी ग्रामस्थ व स्वयंसेवक प्रसाद जवळे यांनी केली आहे.

## नववर्षाच्या उत्साहात वाहतूक कोंडीचे विघ्न

। माणगाव । प्रतिनिधी ।

नवीन वर्षाच्या स्वागतासाठी कोकण किनारपट्टीकडे जाणाऱ्या पर्यटकांची अभूतपूर्व गर्दी उसळल्याने मुंबई-गोवा महामार्गासह माणगाव-पुणे मार्गावर भीषण वाहतूक कोंडी निर्माण झाली आहे. थर्टी फर्स्ट, शनिवार-रविवारची सलग सुट्टी आणि हॉटेल्स, होमस्टे हाऊसफुल्ल झाल्यामुळे पहाटेपासूनच महामार्गांवर वाहनांच्या लांबच लांब रांगा लागत आहेत. मुंबई, पुणे, ठाणे, नवी मुंबईसह पश्चिम महाराष्ट्रातून मोठ्या संख्येने पर्यटक कोकणाकडे दाखल होत आहेत. परिणामी मुंबई -गोवा महामार्गावरील इंदापूर, माणगाव, कोलाड, नागोठणे परिसरात तसेच



माणगाव पुणे मार्गावर अनेक ठिकाणी संथगतीने वाहतूक सुरू असल्याचे चित्र दिसून आले.

माणगावपासून मुंबई बाजूकडे व महाड बाजूकडे सुमारे पाच किलोमीटरच्या रांगा लागल्या होत्या, नववर्षाच्या स्वागतासाठी रायगडात पर्यटकांचा महापूर लोटला होता. त्यामुळे महामार्ग जाम झाल्याने खाजगी वाहनातील तसेच महामंडळाच्या बसमधील प्रवासी नागरिकांचे पाणी, नाश्ता, जेवण व प्रसादनगृहासाठी प्रचंड हाल झाले.

सकाळपासून लागलेली वाहतूक कोंडी सोडवण्यासाठी माणगाव पोलीस, महामार्ग पोलीस व वाहतूक शाखेचे अधिकारी-कर्मचारी दिवसभर रस्त्यावर तैनात होते. मात्र, वाहनांची संख्या क्षमतेपेक्षा अनेक पटीने वाढल्याने ही वाहतूक कोंडी सोडवण्यासाठी पोलिसांनाही मोठी कसरत करावी लागत आहे. अवजड वाहने, खासगी बस, पर्यटकांच्या चारचाकी गाड्या आणि दुचाकी यांची सरमिसळ यामुळे कोंडीत आणखी भर पडत आहे. पुढील चार दिवस मुंबई-गोवा महामार्गावर वाहतूक ताणातच राहण्याची शक्यता असून प्रवाशांनी प्रवासाचे योग्य नियोजन करावे, पर्यायी मार्गांचा वापर करावा तसेच पोलिसांच्या सूचनांचे पालन करावे, असे आवाहन प्रशासनाकडून करण्यात आले आहे. अन्यथा थर्टी फर्स्टचा आनंद प्रवाशांसाठी वाहतूक कोंडीच्या त्रासातच अडकण्याची शक्यता नाकारता येत नाही.

## चिंध्रणमधील नव्या शाळेसाठी आर्थिक मदत

। पनवेल । प्रतिनिधी ।

ग्रामीण भागातील शैक्षणिक पायाभूत सुविधा बळकट करण्याच्या दिशेने महत्त्वपूर्ण पाऊल टाकत रेसोनिया लिमिटेडने पनवेल यांनी तालुक्यातील चिंध्रण गावात नव्या माध्यमिक शाळेच्या इमारतीसाठी ५० लाखांची आर्थिक मदत दिली आहे. ही मदत कंपनीच्या प्रमुख प्रकल्प मुंबई ऊर्जा मार्ग लिमिटेड अंतर्गत सुधागड एज्युकेशन सोसायटीला देण्यात आली आहे. या उपक्रमामुळे स्थानिक



विद्यार्थ्यांना आधुनिक शैक्षणिक सुविधा उपलब्ध होणार आहेत. या नव्या शाळा इमारतीचा भूमिपूजन सोहळा शुक्रवारी (दि.२६) पार पडला.

रेसोनिया लिमिटेड शाश्वत विकासाच्या दिशेनेही सक्रिय असून, गुजरातमधील खावडा येथून महाराष्ट्रातील पडघा येथे हरित ऊर्जा पोहोचवणारा खावडा वीज वहन प्रकल्प सध्या सुरू आहे. या प्रकल्पामुळे महाराष्ट्र स्वच्छ ऊर्जे कडे आणखी एक पाऊल पुढे टाकत आहे. त्यामुळे पायाभूत सुविधांपुरते मर्यादित न राहता रेसोनिया लिमिटेड स्थानिक नागरिकांच्या उपजीविकेलाही प्राधान्य देत आहेत. पालघर जिल्ह्यातील वाडा येथील गोवर्धन स्किल सेंटरमध्ये स्थानिक व आदिवासी भागातील ४० विद्यार्थ्यांना कौशल्य प्रशिक्षण देण्यात आले. प्रशिक्षण पूर्ण झाल्यानंतर सर्व विद्यार्थ्यांना तीन महिन्यांची सशुल्क इंटर्नशिप मिळाली असून त्यांना दरमहा रु. १४,००० स्टायपेंड दिले जात आहे. प्रकल्पाच्या अंमलबजावणीदरम्यान स्थानिक गरजा ओळखून, मुंबई ऊर्जा मार्ग लिमिटेडने पनवेलमधील चिंध्रण गावातील शिक्षण क्षेत्राला पाठबळ देण्याचा निर्णय घेतला. त्यांनी येथील नव्या शाळेच्या इमारतीसाठी ५० लाखांचा भरघोस निधी दिला आहे.

## संजय यादव बेपत्ता

। पनवेल । प्रतिनिधी ।

पनवेल परिसरातील संजय आत्माराम यादव (४९) हे हरवल्याची तक्रार पनवेल शहर पोलीस ठाण्यात करण्यात आली आहे. त्यांची उंची अंदाजे ५.१ फुट असून रंग गोरा, केस काळे, डोळे काळे, नाक सरळ, चेहरा उभट, बांधा सडपातळ, नेसून लाल



रंगाचा टिशर्ट व तपकिरी रंगाची पॅन्ट घातली असून त्याला मराठी व हिंदी भाषा अवगत आहे. संजय यादव बाबत कोणाला अधिक माहिती असल्यास त्यांनी पनवेल शहर पोलीस ठाणे किंवा पोलीस नाईक तानाजी खैरावकर यांच्याशी संपर्क साधावा, असे आवाहन करण्यात आले आहे.

# बांगलादेशातील आग

शेजारील बांगलादेश पुन्हा एकदा धुमसू लागला आहे. तेथील खुनाखुनीला मुस्लिम विरुध्द हिंदू असे रुप येऊ लागले आहे. त्याचा फायदा घेऊन इथले विश्व हिंदू परिषद व भाजपचे परिवारवाले रस्त्यावर उतरून आंदोलने करू लागले आहेत. हे अत्यंत गंभीर आहे. पश्चिमेला पाकिस्तान, उत्तरेला चीन आणि पूर्वेला बांगलादेश, नेपाळ हे सर्व देश भारताच्या विरोधात असावेत हे आपल्यासाठी चांगले नाही. त्यामुळे आगीत तेल न ओतता भारत सरकारने परिस्थिती नियंत्रणात आणण्यासाठी अधिक प्रयत्न करायला हवेत. बांगलादेशात एकूण लोकसंख्येच्या सुमारे सात टक्के म्हणजे एक कोटी तीस लाख इतके हिंदू राहतात. भारत आणि नेपाळनंतर इतक्या संख्येने हिंदू असणारा बांगलादेश हा जगातला तिसरा देश आहे. शिवाय त्याची भाषा बांगला असल्याने आपल्या पश्चिम बंगालशी त्याचे जिव्हाळ्याचे नाते आहे. एकेकाळी हा सर्व प्रदेश एकच होता. पश्चिमेकडच्या पंजाबप्रमाणेच, बंगालातील आपल्या अनेक नेत्यांचे व कलाकारांचे मूळ गाव हे आता बांगलादेशात गेले आहे. पण हा भाषेचा हा जिव्हाळा राजकीय व्यवहारात शिल्लक राहिलेला नाही. १९४७ च्या फाळणीनंतर पुन्हा एकवार बांगलादेशात मुस्लिम विरुध्द हिंदू अशी विभागणी होण्याची भीती निर्माण झाली आहे. अलिकडे एकापाठोपाठ काही हिंदू कामगारांच्या हत्या झाल्या. मंदिरांवर व हिंदू लोकांच्या कार्यालयांवर हल्ले करण्यात आले. भारतीय उच्चायुक्तालयावर दगडफेक झाली. भारताला अनुकूल असल्याचा आरोप करीत काही बांगलादेशी वृत्तपत्रांची कार्यालये जाळण्यात आली. हे विष त्या देशात पूर्वापार होतेच. पण तेथील स्वार्थी राजकारणी त्याला अधिकाधिक उकळी आणण्याचा प्रयत्न करीत आहेत. गेल्या वर्षी, २०२४ च्या ऑगस्टमध्ये तेथे बंडाळी झाली. तेव्हाच्या पंतप्रधान शेख हसिना यांची सत्ता उलथवण्यात आली. हसिना भारतात आश्रयाला आल्या व तेव्हापासून त्या इथे आहेत. हसिना यांनी आपल्या दहा वर्षांच्या राजवटीत कायमच भारताशी चांगले संबंध ठेवले व त्यांच्या अवामी लीग पक्षाने सेक्यूलर भूमिका घेऊन हिंदू व मुस्लिम यांच्यात सौहार्द राहील अशी पावले उचलली. मात्र त्यांची गच्छंती केल्यापासून जी निर्नायकी अवस्था आली आहे तिचा फायदा उचलून धर्मांध मुस्लिमांचे गट शिरजोर होऊ लागले आहेत.

## पाकिस्तान शिरजोर

पाकिस्तानच्या जोखडातून मुक्तता करण्यासाठी मदत केल्याने बांगलादेशात बराच काळ भारताविषयी चांगली भावना होती. त्या काळात पाकिस्तानधार्जिण्या जमाते इस्लामी या पक्षावर लोकांनी जवळपास बहिष्कार टाकला होता. मुस्लिम पाकिस्तानपेक्षा बंगाली भाषा बोलणाऱ्या भारताबद्दल बांगलादेशाने अधिक आस्था दाखवली. पण महागाई, बेकारी इत्यादींची अरिष्टे वाढली की, जनतेत असंतोष निर्माण होतो व त्यांचा फायदा घेऊन धर्मांध लोक डोके वर काढतात हा जगभरचा अनुभव आहे. भारतात हिंदू धर्मांधांनी ते वारंवार केले आहे. बांगलादेशातले जमाते इस्लामीवाले हे त्यांचेच भाऊबंद आहेत. हसिना यांनी पंतप्रधान असताना १९७१ च्या युध्दात पाकिस्तानला मदत करणाऱ्या अनेक धर्मांध मुस्लिम गटवाल्यांना फासावर चढवले होते. त्यामुळे कट्टर मुस्लिम संधीची वाट पाहत होते. हसिनांची सत्ता उलथवल्यावर या मुस्लिमांनी ती मिळाली व त्यांनी सर्व वातावरण उलट फिरवण्याचा प्रयत्न केला. त्यातून पाकिस्तान हाच बांगलादेशाचा नैसर्गिक मित्र आहे व भारत हा दादागिरी करणारा देश आहे हे नॅरेटिव्ह प्रबळ झाले. बांगलादेशातील व्यापार, उद्योग किंवा सरकारी नोकऱ्या वा न्यायालयांमध्ये उच्च स्थानावर असलेल्या हिंदूंविरुध्द पध्दतशीर नाराजी निर्माण करण्यात आली. हसिनांनंतर सूत्रे घेतलेले हंगामी नेते महंमद युनूस यांची यातली भूमिका संशयास्पद राहिली. त्यांनी आपले स्थान टिकवण्यासाठी या धर्मांधांच्या कारवायांकडे काणाडोळा केला. त्यामुळे आता जमाते इस्लामी हा पाकिस्तानवादी व कट्टर मुस्लिमांचा पक्ष तेथे पुन्हा लोकप्रिय ठरला आहे. येत्या फेब्रुवारीत तेथे सार्वत्रिक निवडणुका व्हायच्या आहेत. सध्याच्या अंदाजांप्रमाणे तेथे खलिदा झिया यांच्या बांगला नॅशनल पार्टीला बहुमत मिळेल. मात्र जमाते इस्लामी हा दोन क्रमांकाचा पक्ष होऊ शकेल. बांगलादेशासाठीच नव्हे तर भारतासाठी हा धोक्याचा इशारा आहे. कारण, हा पक्ष हिंदूंविरुध्दच नव्हे तर त्याच्या आडून भारताविरुध्दच विषारी वातावरण तयार करतो आहे. याच पक्षाच्या दबावामुळे हसिनांच्या काळात शिक्षा झालेल्या अनेक पाकिस्तानधार्जिण्या नेत्यांच्या सुटका झाल्या आहेत. पाकिस्तानसोबत पुन्हा एकवार मुक्त व्यापार सुरू झाला आहे. पाकिस्तानी लोकांना व्हिसा लागणार नाही अशी व्यवस्था झाली आहे.

## इथल्या हिंदू धर्मांधांना आवरा

इकडे पाकिस्तानचे दिवाळे वाजले आहे. पण भारताचा द्वेष करण्याच्या नावाखाली तेथील जनतेचे लक्ष दुसरीकडे वळवणे शक्य आहे. आता त्यांना बांगलादेशातून अनपेक्षित साथ मिळणार आहे. भारतात दहशतवादी कारवाया घडवून आणण्यासाठी बांगलादेशामार्फत माणसे घुसवणे हेही अधिक सहज करता येणार आहे. ऑपरेशन सिंदूरमध्ये आपण पाकिस्तानातील दहशतवाद्यांचे कंबरडे मोडले असे कितीही दावे नरेंद्र मोदींनी केले असले तरी ते खोटे आहेत. मोदीं व अमित शाहांच्या नाकाखाली ऐन दिल्लीत लाल किल्ल्याच्या इथे झालेला बॉंबस्फोट हा त्याचा पुरावा आहे. पाकिस्तानच्या लष्करे तैय्यबा किंवा तालिबानी संघटनांनी बांगलादेशाच्या भूमीवरून आपल्याविरुध्द आघाडी उघडली तर ते कठीण होईल. फेब्रुवारीत तेथे बहुदा बांगला नॅशनलिस्ट पार्टी किंवा बीएनपी सत्तेत येईल. या पक्षाचे संस्थापक जनरल झिया यांनी कायम भारतविरोधी राजकारण केले. त्यांच्यानंतर त्यांच्या कन्या बेगम खलिदा झिया यांनी त्यांचाच कित्ता पुढे चालवला. खलिदा यांनी दुसऱ्या कार्यकाळात तर जमाते इस्लामीच्या पाठिंब्यानेच सरकार चालवले होते. त्यांना विरोध करणाऱ्या शेख हसिनांच्या अवामी लीगवर आता निवडणुकीत भाग घेण्यास बंदी आहे. शेख हसिनांना देशद्रोहाबद्दल फाशीची शिक्षा सुनावली आहे. हसिना भारतात आहेत. भारत आणि हिंदूंविरुध्द वातावरण पेटवण्यासाठी बीएनपी व जमाते इस्लामीला हाही एक मुद्दा मिळाला आहे. मात्र निवडणुका जवळ येत असताना एक गोष्ट बरी झाली आहे की, बीएनपीने जमाते इस्लामीसोबतचे मैत्रीचे संबंध तोडले असून आपण स्वतंत्रपणे निवडणुका लढवणार असल्याचे जाहीर केले आहे. खलिदा झिया यांचे पुत्र व बाएनपीचे नेते तारिक रहमान झिया हे इंग्लंडमधील अज्ञातवासातून दोन दिवसांपूर्वी परतले. ते उच्चशिक्षित व परदेशात वावरलेले आहेत. अमेरिका व युरोपमधील कपडे, चपला इत्यादींच्या निर्यातीवर बांगलादेशाची अर्थव्यवस्था अवलंबून आहे हे त्यांना ठाऊक आहे. त्यामुळे ते जमाते इस्लामीचा जमातवाद फार वाढू नये हे पाहतील अशी आशा आहे. पण ते होईपर्यंत बांगलादेशातील वातावरण किती दूषित होईल हे कोणीच सांगू शकत नाही. मात्र असे असले तरी त्याचा निषेध करण्याच्या निमित्ताने भारतात विहिंप वगैरेंनी मुस्लिमांविरुध्द आग ओकणे व इथे पेटवापेटवी करणे हा काही त्यावरचा इलाज नाही. मोदी सरकारने त्यांनाही चाप लावायला हवा. दुर्दैवाने पश्चिम बंगालमध्येही याच काळात निवडणुका असल्याने तसे न करता मोदी आणि मंडळी प्रचारात याचा वापर करतील व मुस्लिमविरोधी भाषा करतील अशी शक्यता आहे. तसे झाले तर ते भयंकर धोकादायक असेल.

---

**विचार**

# धास्ती चीनच्या नौदलाची

***चीनच्या नौदलाची ताकद अमेरिकेपेक्षा जास्त झाली आहे. गेल्या काही वर्षांपासून जहाज बांधणी तसेच नौदलाच्या अन्य बाबींकडे अमेरिकेचे काहीसे दुर्लक्ष झाले. पुरेसा निधी मिळाला नाही. याउलट, चीनने नौदलाचे आधुनिकीकरण करण्यावर भर दिला. विमानवाहू युद्धनौका वाढवल्या. परिणामी चीनच्या नौदलाची ताकद टप्प्याटप्प्याने वाढत गेली. त्यामुळे आता अमेरिकेने चीनच्या नौदलाची धास्ती घेतली आहे.***



**प्रा. जयसिंग यादव**

गेल्या महिन्यात चीनने त्यांचे 'फुजियान' हे आतापर्यंतचे सर्वात प्रगत विमानवाहू जहाज लाँच केले. ते मागील दोन जहाजांपेक्षा खूपच प्रगत आहे. 'फुजियान' ही देशातील तिसरी अशी युद्धनौका आहे, जी इलेक्ट्रोमॅग्नेटिक कॅटापल्ट्सने सुसज्ज आहे. ती विमानांना जास्त वेगाने उड्डाण करण्यास सक्षम करते. तज्ज्ञांच्या मते, यामुळे चीन पश्चिम पॅसिफिक भागामध्ये अमेरिकेच्या वर्चस्वाला आव्हान देण्याच्या ध्येयाच्या जवळ येतो. हे जहाज ऐंशी हजार टन वजनाचे आहे. तैवानच्या सर्वात जवळ असलेल्या चीनी प्रांताच्या नावावरून त्याला 'फुजियान' असे नाव देण्यात आले. ते ७० विमाने वाहून नेऊ शकते. यामध्ये लढाऊ विमाने, हेलिकॉप्टर आणि पूर्वसूचना देणारी विमाने समाविष्ट आहेत. ती लांब पल्ल्याच्या धोक्यांचा शोध घेऊ शकतात. ते हवाई संरक्षण प्रणालींचे चांगले समन्वय साधण्यास आणि अचूक हल्ले करण्यास सक्षम आहे. 'फुजियान' हे जहाज चीनी नौदलाला नवीन पोहोच आणि लवचिकता प्रदान करते. हे 'फ्लॅट फ्लाइट डेक' आणि 'इलेक्ट्रोमॅग्नेटिक कॅटपल्ट' तंत्रज्ञानासह चीनचे पहिले विमानवाहू जहाज आहे. त्यामुळे ते जादा वजनाची विमाने लाँच करू शकते. अधिक इंधन आणि शस्त्रे वाहून नेऊ शकते. जगात फक्त अमेरिकेकडेच ही क्षमता आहे. यामुळे चीनच्या वाहक 'स्ट्राइक ग्रुप'ला एका नवीन पातळीवर नेण्यात आले आहे. ते लिओनिंग आणि शेडोंगला मागे टाकत आहे. चीनमध्ये बनवलेली ही युद्धनौका जड शस्त्रे आणि इंधनाने सुसज्ज विमाने लाँच करू शकते आणि लांब अंतरावरून शत्रूच्या लक्ष्यांना लक्ष्य करू शकते. हे चीनच्या दोन विद्यमान युद्धनौकांपेक्षा अधिक शक्तिशाली आहे. यापूर्वीच्या युद्धनौका लिओनिंग आणि शेडोंग या दोन्ही रशियन मदतीच्या बांधण्यात आल्या होत्या.

दखल घेण्याजोगी बाब म्हणजे या नौका 'फ्लॅट डेक' आणि 'इलेक्ट्रोमॅग्नेटिक कॅटपल्ट' विमानाच्या टेकऑफ आणि लँडिंग क्षमतांमध्ये लक्षणीय वाढ करतात. स्की-जंप प्लॅटफॉर्म असलेल्या डेकवर उड्डाण करताना, वैमानिकांना वजन कमी करण्यासाठी आपली शस्त्रे खाली करावी लागतात. त्यामुळे ऑपरेशनल लवचिकता मर्यादित होते. चीनी माध्यमांनी 'फुजियान'चे वर्णन चीनी नौदलाच्या विकासातला एक प्रमुख टप्पा असे केले आहे. चीनच्या तिन्ही विमानवाहू जहाजांवर डिझेल इंजिन चालतात. त्यामुळे त्यांना वेळोवेळी इंधन भरण्याची आवश्यकता असते; परंतु चीन आता अमेरिकेप्रमाणे 'गनबोट डिप्लोमसी' करू शकेल आणि 'न्यूयॉर्क टाईम्स'ने म्हटल्याप्रमाणे, हे चीनच्या 'बचावात्मक आधुनिकीकरण' वरून 'आक्रमक शक्ती प्रक्षेपण' कडे जाण्याचे संकेत देते. चीनचे अध्यक्ष शी जिनपिंग यांनी एक विधान केले. त्यात म्हटले होते, की पॅसिफिक महासागर इतका मोठा आहे, की अमेरिका आणि चीन दोघांसाठीही जागा आहे. हे विधान अमेरिकेशी स्पर्धा करण्याची चीनची महत्त्वाकांक्षा प्रतिबिंबित करते. शी जिनपिंग यांच्या नेतृत्वाखाली चीनने आपल्या नौदलाचा वेगाने विस्तार केला आहे आणि आता त्यांच्याकडे जगातील सर्वात जास्त जहाजे आहेत. त्यामुळे अमेरिका आणि मित्रराष्ट्रांवर दबाव वाढत आहे. सरकारी माध्यमांनुसार, शी जिनपिंग यांनी स्वतः 'फुजियान'मध्ये 'इलेक्ट्रोमॅग्नेटिक कॅटपल्ट' बसवण्याचा निर्णय घेतला. ऑस्ट्रेलियन 'स्ट्रॅटेजिक पॉलिसी इन्स्टिट्यूट'ने 'फुजियान'चे वर्णन जलद-प्रतिक्रिया प्रतिबंधक शक्ती असे केले आहे. ते लढाऊ विमाने तैनात करण्यास आणि जमीन आणि समुद्रातून हल्ले करण्यास सक्षम आहे.

शांततेच्या काळातही 'फुजियान'ची तैनाती अमेरिकन विमानवाहू जहाजांना समान प्रतिबंधक क्षमता प्रदान करेल. चीन तैवानला आपल्या भूभागाचा भाग मानतो आणि त्याने हा देश कधीही स्वत:शी जोडण्याचा हेतू व्यक्त केला आहे. त्यासाठी बळाचा वापर करावा लागला तरी त्याची तयारी आहे. 'फुजियान' तैवानच्या पूर्वेकडील संरक्षण रेषांना धोका निर्माण करू शकते. तथापि, ओकिनावा, दक्षिण कोरिया, गुआम आणि फिलीपिन्स हे अमेरिकन लष्करी तळ चीनच्या कोणत्याही हल्ल्याला प्रत्युत्तर देण्यास सक्षम आहेत. अमेरिकेची सर्व ११ विमानवाहू जहाजे अणुऊर्जेवर चालतात. याउलट, चीनची तीन विमानवाहू जहाजे डिझेल इंजिनवर चालतात. त्यांना वारंवार इंधन भरावे लागते. त्यामुळे त्यांची लढाऊ क्षमता मर्यादित होते. जपानच्या 'नॅशनल इन्स्टिट्यूट फॉर डिफेन्स स्टडीज'च्या इटा मोरिकी यांनी ऑक्टोबर २०२५ मध्ये केलेल्या मूल्यांकनात म्हटले आहे, की चीनला अजूनही अनेक तांत्रिक आणि मानवी संसाधन आव्हानांना तोंड द्यावे लागते. फुजियान आणि चीनच्या इतर विमानवाहू जहाजांची एकूण लढाऊ क्षमता आणि अनुभव अजूनही अमेरिकेपेक्षा खूप मागे आहे. अमेरिकेचे रिअर ॲडमिरल ब्रेट मियाटस यांनी 'वॉशिंग्टन पोस्ट'ला सांगितले, की चीनकडे तीन विमानवाहू जहाजे आहेत तर अमेरिकेकडे ११ आहेत. क्षेपणास्त्र तंत्रज्ञानाने विमानवाहू जहाजांचे धोरणात्मक महत्त्व काहीसे कमी केले असले आणि ड्रोन (मानवरहित विमान) साठी एआय तंत्रज्ञान पूर्णपणे विकसित झाले, तर विमानवाहू जहाजे आणखी प्रभावी होऊ शकतात.

सध्या चीन चौथे विमानवाहू जहाज बांधत असून भविष्यात अणुऊर्जेवर चालणारा वाहक सादर करण्याची योजना आखत आहे. येत्या काळात अमेरिका आणि चीनमधील नौदल शस्त्रास्त्रांची स्पर्धा आणखी तीव्र होईल अशी भीती तज्ज्ञांना आहे. चीनशी वाढत्या धोरणात्मक स्पर्धेच्या वेळी 'खूप जलद आणि लवकरच' अधिक जहाजे बांधण्याचे आवाहन ट्रम्प यांनी नुकतेच केले. 'आमचा जहाजबांधणी उद्योग सध्या अगदी कमी प्रमाणात आकुंचन पावला आहे,' असे 'मरीन कॉर्प्स'चे कमांडंट जनरल एरिक स्मिथ यांनी गेल्या वर्षीच्या अखेरीस पेंटागॉन येथे दिलेल्या विशेष मुलाखतीत सांगितले होते. ट्रम्प यांच्या घोषणेपूर्वी अनेक महिन्यांपर्यंत अमेरिकन लष्करी आणि उद्योग अधिकाऱ्यांच्या डझनभराहून अधिक मुलाखतींद्वारे अमेरिकन जहाजबांधणी आणि जहाज देखभालीची अशक्त स्थिती आणि त्यांच्यामुळे लष्कराला होणारे धोके पुढे आले होते. अमेरिकेचे नौदल अजूनही अण्वस्त्रशक्ती आणि टनेजच्या बाबतीत जगातील सर्वात शक्तिशाली मानले जाते; परंतु नौदलाच्या जहाजांची संख्या चीनपेक्षा कमी झाली आहे. अमेरिकेच्या ताफ्यात २९६ जहाजे आहेत, तर चीनच्या जहाजांची संख्या या वर्षी चारशे जहाजांच्या पुढे जाण्याची शक्यता आहे. अमेरिकन नौदलाने आपल्या ताफ्याचा आकार वाढवण्याचे उद्दिष्ट ठेवले असले, तरी अलिकडच्या वर्षांमध्ये त्यांच्या जहाजांची संख्या कमी होत चालली आहे. गेल्या वर्षीच्या अर्थसंकल्पात नौदलाच्या फक्त सहा नवीन जहाजांना निधी देण्यात आला होता, तर ताफ्यातून १५ जहाजे काढून टाकण्यात आली होती.

२०२५ च्या अर्थसंकल्पात सहा नवीन जहाजांना निधी देण्यात आला होता, तर १९ जहाजे काढून टाकण्यात आली होती. उद्योजकांच्या म्हणण्यानुसार त्यांच्याकडे अधिक जहाजे बांधण्यासाठी आणि दुरुस्त करण्यासाठी जागा आहे; परंतु नौदलाचे करार दुर्मिळ आहेत. 'आम्ही जवळजवळ अर्ध्या क्षमतेने काम करत आहोत,' असे 'बीएई सिस्टीम्स शिप रिपेअर'चे उपाध्यक्ष ब्रॅड मोयर म्हणाले. ही कंपनी अमेरिकेतील जहाज दुरुस्तीसाठी सर्वात मोठ्या कंपन्यांपैकी एक आहे. 'हजारो पुरवठादार व्यवसायाबाहेर गेले आहेत आणि हा एक खरा धोका आहे,' असे 'फेअरबँक्स मोर्स डिफेन्स'चे सीईओ जॉर्ज व्हिटियर यांनी सांगितले. ही कंपनी उत्तर आणि दक्षिण अमेरिकेतील सर्वात मोठी इंजिन उत्पादक असून लष्कराच्या उभयचर युद्धनौकांमध्ये वापरल्या जाणाऱ्या सर्वात मोठ्या इंजिनांचा पुरवठा करणारी एकमेव अमेरिकन कंपनी आहे. 'आपल्याकडे दोन इंजिन पुरवठादार असले पाहिजेत; पण वास्तव असे आहे, की नौदल वर्षाला फक्त सहा जहाजे बांधणार असेल, तर दोन तर सोडाच, एक इंजिन पुरवठादार व्यवसायात ठेवणेही एक संघर्षाची बाब आहे. आपल्याला यातून बाहेर पडण्याचा मार्ग काढावा लागेल,' असे एका अधिकाऱ्याचे मत अमेरिकेची हताशा दाखवते.

अमेरिकन सैन्य अधिकारी आणि इतर उद्योजकांच्या म्हणण्यानुसार अधिक उद्योग व्यवसाय बंद पडल्यास सुट्या भागांसाठी बॅक अप उपलब्ध होणार नाही, याची चिंता राहते. दरम्यान, टिकून राहिलेल्यांच्या मते व्यवसाय स्थिर नसतो, तेव्हा सुटे भाग पुरवण्यास जास्त वेळ लागतो आणि साहित्य खरेदी करण्यासाठी जास्त खर्च येतो. अमेरिकेच्या पूर्व किनाऱ्यावरील नॉरफोक शहरात दुरुस्तीच्या कामासाठी उपलब्ध असलेल्या नौदलाच्या जहाजांची संख्या सुमारे एक दशकापूर्वी ४४ जहाजांवरून आज तीसपेक्षा कमी झाली आहे. त्या काळात सुमारे ६० टक्के कर्मचाऱ्यांना सुट्टीवर पाठवण्यात आले होते, असे अधिकाऱ्यांनी सांगितले. एकंदरित ही स्थिती अमेरिकेची चिंता वाढवणारी आहे.

(लेखक राज्यशास्त्राचे अभ्यासक आहेत.)

---

# वाहतूक कोंडीला प्रशासनच जबाबदार

**वैष्णवी वाडकर**

रायगड जिल्ह्यात सध्या पर्यटन हंगाम जोरात सुरू आहे. नाताळ आणि थर्टी फर्स्टच्या पार्श्वभूमीवर हजारो पर्यटकांनी अलिबाग तालुक्याकडे आपला मोर्चा वळवला आहे. येथील समुद्रकिनारे, ऐतिहासिक वास्तू, किल्ले, निसर्गरम्य वातावरण, समुद्री मासे तसेच मुंबईपासून कमी अंतर यामुळे अलिबाग हे पर्यटकांचे आवडते ठिकाण बनले आहे. त्यामुळे तालुक्याच्या विविध भागांमध्ये मोठ्या प्रमाणात पर्यटकांची गर्दी पाहायला मिळत आहे. गुरुवार दि.२५ डिसेंबरपासून नाताळच्या सुट्टीला सुरुवात झाली. त्यानंतर सलग शनिवार-रविवार आल्याने नाताळ तसेच सरत्या वर्षाला निरोप देण्यासाठी पर्यटक मोठ्या संख्येने अलिबागमध्ये दाखल झाले आहेत. विशेषतः मुंबई, ठाणे, नवी मुंबई आणि पुणे येथून खासगी वाहने तसेच ट्रॅव्हलर बसमधून पर्यटक येत आहेत. त्यामुळे अलिबाग शहरासह तालुक्यातील प्रमुख रस्त्यांवर वाहनांची प्रचंड गर्दी झाली असून या वाहतूक कोंडीमुळे नागरिक त्रस्त झाले आहेत. या वाहतुक कोंडीला संबंधित प्रशासनच जबाबदार असल्याची चर्चा सध्या जोर धरत आहे.

पर्यटन हंगामामुळे स्थानिक व्यवसाय, हॉटेल, लॉज, रिसॉर्ट्स, रेस्टॉरंट्स, बीच कॅम्पिंगस, तसेच पर्यटनाशी संबंधित व्यवसायांना मोठा फायदा होत असला तरी दुसरीकडे स्थानिक नागरिकांना मात्र मोठ्या अडचणींना सामोरे जावे लागत आहे. पर्यटकांच्या वाहनांमुळे रस्ते अक्षरशः जाम झाले असून दैनंदिन कामांसाठी बाहेर पडणाऱ्या स्थानिक नागरिकांची मोठी गैरसोय होत आहे. शाळकरी विद्यार्थी, कार्यालयीन कर्मचारी, रुग्णवाहिका तसेच अत्यावश्यक सेवांच्या वाहनांनाही वाहतूक कोंडीचा चांगलाच फटका बसत आहे. दरम्यान, प्रमुख रस्त्यांवर प्रचंड वाहतूक कोंडी असल्यामुळे काही चालक शॉर्टकट रस्त्यांचा वापर करतात. मात्र, आता ते रस्ते देखील अपुरे पडत असल्याचे चित्र आहे. त्यामुळे वाहतूक नियोजनाचा अभाव स्पष्टपणे दिसून येत आहे.

अलिबाग तालुक्याला मोठ्या प्रमाणात पर्यटनासाठी पसंती आहे. त्यामुळे जिल्ह्यासह मुंबई, पुणेसह राज्यभरातून पर्यटक या ठिकाणी येत असतात. मात्र, येथील प्रमुख रस्ते अरूंद असल्यामुळे वाहनचालकांना तारेवरची कसरत करावी लागत आहे. तसेच, पर्किंगची योग्य व्यवस्था नसल्याने वाहनचालक रस्त्याच्या कडेला आपली वाहने उभी करतात. त्यामुळे वाहतुकीची समस्या आणखी गंभीर बनते. यादरम्यान, दोन मोठी वाहने पास करताना चालकांचा दमछाक होतो. तसेच, पर्यटकांकडून वाहतूक नियमांचे उल्लंघन होत असल्याने अपघातांची देखील शक्यता निर्माण होते. त्यातच ऐन पर्यटन हंगामात रस्त्यांच्या दुरूस्तीच्या कामांमुळे वाहतुक कोंडीत आणखीनच भर पडत आहे. या वाहतूक कोंडीत एसटी बसेसदेखील अडकून पडत आहेत. त्यामुळे एसटी देखील वेळेवर येत नाही. त्याचा सर्वाधिक फटका दररोज एसटीने प्रवास करणाऱ्या प्रवाशांसह विशेषतः कार्यालयीन कर्मचाऱ्यांना व विद्यार्थ्यांना बसत आहे. नाहिलाजास्तव त्यांना मिनिडोर, रिक्षा किंवा इतर खासगी वाहनाने प्रवास करावा लागतो. मात्र, हा प्रवास अधिक खर्चिक होतो. तसेच, हे खासगी वाहन देखील वाहतूक कोंडीत अडकत असल्यामुळे त्यांना त्यांच्या निश्चित स्थळापर्यंत पोहोचण्यास विलंब होतो.

अलिबाग-पनवेल मार्गासह अलिबाग-मुरुड मार्गावरील वाहतूक कोंडी देखील भयंकर स्वरूपाची झाली आहे. त्यातच या मार्गावर चौल परिसरात ठिकठिकाणी रस्त्याचे काम सुरू आहे. अनेक ठिकाणी रस्ता खोदून ठेवण्यात आल्यामुळे एकेरी वाहतूक सुरू करण्यात आली आहे. परिणामी वाहतूक कोंडीत आणखी भर पडत आहे. ३१ डिसेंबरपर्यंत या मार्गावरून मोठ्या प्रमाणात पर्यटकांच्या वाहनांची वर्दळ सुरू राहणार असल्याने, अशी रस्त्यांची कामे पर्यटन हंगाम संपल्यानंतरच हाती घ्यायला हवी होती, अशी संतप्त प्रतिक्रिया नागरिकांकडून व्यक्त होत आहे. सुट्टीच्या काळात पर्यटकांची संख्या मोठ्या प्रमाणात वाढलेली असताना रस्त्यांची झालेली दुरवस्था व प्रशासनाच्या नियोजनशून्य कारभाराचे स्पष्ट दर्शन घडवत आहे. अनेक ठिकाणी रस्त्यांची कामे सुरू असली तरी त्या ठिकाणी ठोस सूचना फलक लावण्यात आलेले नाहीत. त्यामुळे अपघाताची देखील दाट शक्यता वर्तविली जात आहे. तसेच, या खराब रस्त्यांमुळे वाहनांचे देखील मोठे नुकसान होत असल्याचे पर्यटकांकडून बोलले जात आहे. त्यामुळे पर्यटनाचा आनंद घेण्यासाठी आलेल्या पर्यटकांना मोठा मनस्ताप सहन करावा लागत आहे.

त्यामुळे नियोजनाअभावी निर्माण झालेल्या वाहतूक कोंडीचा फटका पर्यटकांसह स्थानिक नागरिकांनाही बसत आहे. पर्यटनामुळे तालुक्याच्या विकासाला चालना मिळत असली तरी स्थानिक नागरिकांचे जीवन विस्कळीत होत चालले आहे. त्यासाठी प्रशासनाने ठोस उपाययोजना करणे गरजेचे आहे. परंतु, तसे होताना दिसत नाही. नाहीतर ऐन पर्यटन हंगामात रस्ते दुरुस्तीची कामे प्रशासनाने काढली नसती. तसेच, वाहतूक व्यवस्थापन आणि पर्यायी मार्गांचे पूर्वनियोजन करताना देखील पोलीस प्रशासन दिसत नसल्याचे प्रवासी वर्गातून बोलले जात आहे. त्यामुळे अल्लड पर्यटकांकडून नियमांचे मोठ्या प्रमाणात उल्लंघन होत आहे. या सर्व घटनांमुळेचे भीषण वाहतूक कोंडीची समस्या उद्भवत आहे. त्यामुळे या सर्वाला संबंधित प्रशासनच जबाबदार असल्याचे प्रवासी वर्गातून बोलले जात आहे.

---

**लोकसंसद**

## धोकादायक ऊस वाहतूकीला शिस्त लावा

उसाच्या ट्रॅक्टरला धडकून अपघात झाला अशी बातमी हल्ली कोणत्या ना कोणत्या वर्तमानपत्रात वाचायला मिळतेच. यावर्षी अशा अपघातात जीवितहानी झाल्याची बातमी अद्याप वाचायला मिळाली नसली तरी या आधी अशा अपघातात अनेक जणांना जीव गमवावा लागला आहे. दोन वर्षापूर्वी दौंडमध्ये झालेल्या अपघातात तीन तरुण मुलांना अशा अपघातात आपला जीव गमवावा लागला आहे. काष्टी तालुका श्रीगोंदा येथील पंचविशीतील तीन तरुणांची दुचाकी उसाच्या ट्रॅक्टरला धडकली कारण उसाच्या ट्रॅक्टरला रिफ्लेक्टर बसविण्यात आले नव्हते. रिफ्लेक्टर नसल्याने या तरुणांना उसाचा ट्रॅक्टर दिसला नाही त्यामुळे अपघात झाला आणि त्यात निष्पाप तरुणांना आपला जीव गमवावा लागला होता. सातत्याने असे अपघात होऊनही ऊस वाहतूकदारांना शिस्त लागत नाही. सध्या राज्यात ऊस वाहतूक जोरात सुरू आहे. अनेक कारखान्यांचा गाळप हंगाम सुरू आहे. राज्यातील प्रत्येक तालुक्यात दोन ते तीन कारखाने आहेत. त्यामुळे ऊस तोड करून उसाची वाहतूक जोमात सुरू आहे मात्र त्यामुळे क्षमतेपेक्षा अधिक ऊस वाहतूक करणाऱ्या वाहनांचा धोका वाढला आहे. सुरक्षिततेच्या दृष्टीने वाहनांच्या पाठीमागे किंवा बाजूला कोणत्याही उपाययोजना नसल्याने अपघाताचे प्रकार घडत आहेत. ऊस वाहतूक करताना क्षमतेपेक्षा अधिक उसाची वाहतूक केली जात आहे. ट्रॅक्टर चालक दोन ट्रॉली एकमेकांना जोडून ऊस वाहतूक करतात त्यामुळे समोरून येणाऱ्या वाहनांना फक्त ट्रॅक्टर दिसतो परंतु त्या ट्रॅक्टरच्या मागे असलेल्या ट्रॉलीवर कोणतेच इंडिकेटर नसल्याने फसगत होते. बऱ्याचदा वाहनांच्या एकदम जवळ गेल्यावर त्या ट्रॉली दिसतात मग घाई गडबडीत वाहन चालकांची अपघात रोखणयासाठी धांदल उडते. ऊस वाहतूक करणाऱ्या अनेक वाहनांना रिफ्लेक्टर, रेडियम तसेच टेल लॅम्प नसल्याने रात्री अनेक वाहन चालकांना पुढे ऊस वाहतूक करणारे वाहन आहे याचा अंदाज येत नाही त्यामुळेही अपघात होतात. ऊस वाहतूक करणारे वाहन चालक वाहन रस्त्याच्या मध्येच थांबवतात त्यामुळे अपघातांना आयतेच निमंत्रण मिळते. अनेक वाहन चालकांकडे वाहन चालवण्याचा परवाना नसतो. काही वाहनांवर तर चक्क अल्पवयीन चालक असतात. ऊस वाहतूक करणारे सर्वच चालक मोठ्या आवाजात स्पीकरवर गाणी लावतात त्यामुळे लक्ष तर विचलित होतेच पण ट्रॅक्टरच्या पाठीमागे काय घडले याचा वाहन चालकाला अंदाज देखील येत नाही. मोठ्या आवाजातील गाण्यांमुळे इतर वाहनांच्या हॉर्नचा आवाज वाहन चालकांना येत नाही. उसाची वाहतूक रात्रभर चालू असते आणि स्पीकर मोठमोठ्याने चालूच असल्याने रस्त्याच्या कडेवरील गावातील लोकांची झोपमोड होते. अंधारात बैल गाडीने देखील ऊस कारखान्यात नेला जाते. उसाने भरलेली बैलगाडी अंधारात जात असताना समोरून आणि पाठीमागून येणाऱ्या वाहनांना दिसत नाही त्यामुळे देखील अपघात होतात. यापुढे तरी ऊस वाहतूक करणाऱ्या वाहनांमुळे अपघात होऊ नये यासाठी आरटीओ प्रशासनाने ऊस वाहतूक करणाऱ्या सर्वच वाहनांसाठी नियमावली तयार करुन त्याची काटेकोरपणे अंमलबजावणी व्हावी यासाठी प्रयत्न करावेत म्हणजे धोकेदायकपणे सुरू असलेल्या या ऊस वाहतुकीला शिस्त लागेल आणि लोकांच्या जिविताशी चालणारा खेळ थांबेल.

**– श्याम ठाणेदार, पुणे**

---

**दिनविशेष**

## सुपरस्टार राजेश खन्ना...

बॉलिवूडचे पहिले सुपरस्टार राजेश खन्ना यांचा आज जन्म. राजेश खन्ना यांचा जन्म २९ डिसेंबर १९४२ रोजी अमृतसर येथे झाला. राजेश खन्ना यांची हिंदी चित्रपटसृष्टीत एक वेगळीच ओळख होती. राजेश यांनी अनेक चित्रपटांमध्ये काम केले आहे. विशेष म्हणजे बॉलिवूडमध्ये एकाचवेळी तब्बल १७ ब्लॉकबस्टर चित्रपट देणारे पहिले सुपरस्टार होते.

राजेश खन्ना यांनी १९६९ ते १९७१ दरम्यान सलग १७ ब्लॉकबस्टर चित्रपट दिले, त्यानंतर त्यांना हिंदी चित्रपटसृष्टीचे पहिले सुपरस्टार म्हणून ओळख मिळाली. राजेश खन्ना यांना त्यांच्या काळात बरीच प्रसिद्धी मिळाली होती, अनेकदा त्यांना चाहत्यांसोबतचे असे काही प्रसंग आले की त्याची कल्पना करणेच कठीण आहे. चेतन आनंदच्या 'आखरी खत' (१९६६) मध्ये पदार्पण करणारे राजेश खन्ना हे बॉक्स ऑफिसवर सर्वात विश्वासार्ह अभिनेत्यांपैकी एक मानले जायचे. ४० व्या अकादमी पुरस्कारांमध्ये मआखरी खतफ हा भारतातील परदेशी भाषेतील 'सर्वोत्कृष्ट चित्रपट'चा मानकरी ठरला.

सोबत काकांनी म्हणजेच राजेश यांनी 'राज'(१९६७), 'औरत' (१९६७), 'बहारों के सपने' (१९६७), 'इत्तेफाक' (१९६९) आणि 'डोली' (१९७०) मध्ये काम केले. जर आपण राजेश खन्ना यांच्या प्रसिद्धी बद्दल चर्चा केली तर काका सर्वाधिक प्रकाशझोतात आराधना (१९६९) चित्रपटापासून आले. त्यांनी सलग १७ ब्लॉकबस्टर चित्रपट हिंदी चित्रपटसृष्टीला दिले होते. मआराधनाफला फिल्मफेअरमध्ये सर्वोत्कृष्ट चित्रपटाचा पुरस्कारही मिळाला होता. राज खोसला यांच्या 'दो रास्ते' (१९६९) या चित्रपटानेही राजेश यांचे लक्ष वेधून घेतले. यानंतर राजेश खन्ना यांनी मागे वळून पाहिले नाही. एकामागून एक हिट चित्रपट दिले. मनमोहन देसाईंच्या 'सच्चा झूठा' (१९७०) मध्ये राजेश खन्ना यांनी गावकऱ्याची भूमिका केली होती. मुमताजने त्याच्या प्रेयसीची भूमिका केली असताना, अभिनेत्री नाझने ममेरी प्यारी बहनिया बनेगा दुल्हनियाफ या गाण्याने प्रसिद्धी मिळवली, राजेशने तिच्यासाठी चित्रपटात हे गाणे गायले होते. १९६९ ते १९७३-७४ पर्यंत राजेश खन्नाची लोकप्रियता 'न भूतो न भविष्यती'अशी होती. त्याचं मोजमाप नाही. कुणीतरी म्हटलंय, 'उपर आका (परमेश्वर), नीचे काका,' हे अगदी खरं होतं. राजेश खन्ना हा हिंदी सिनेमाच्या पडद्यावरचा एक चमत्कार होता. खरंतर त्याचं आयुष्य हे एखाद्या हिंदी चित्रपटाच्या पटकथेसारखंच होतं. परमेश्वराच्या दरबारात कुणीतरी 'मनमोहन देसाई, सलीम-जावेद' वगैरे असले पाहिजेत. मनमोहन देसाईंच्या सिनेमात मुलं जन्मतः हरवायची किंवा जन्माला यायची एका ठिकाणी आणि वाढायची दुसरीकडं. राजेश हरवला नाही पण वाढला दुसरीकडं. त्याचं नाव जतिन. छान सुखवस्तू कुटुंब.

## अभिष्टचिंतन ज्येष्ठ नागरिकांचे

२९ डिसेंबर

१) श्री.भवान्या रामचंद्र पावशे
नवगाव, अलिबाग
२९-१२-१९३८

२) श्री. अशोककुमार चिंतामण
वैशंपायन, श्रीबाग-२, अलिबाग
२९-१२-१९४९

३) श्रीम. नमिता नथुराम तळकर
रामनाथ रोड, अलिबाग
२९-१२-१९६०

## कृषीवलच्या वाचकांना आवाहन




अलिबाग येथील श्री कच्छी जैन भवन चॅरिटेबल ट्रस्टच्या वतीने अन्नदानासाठी एक अभिनव योजना आखली आहे.जिल्हा रुग्णालयात दाखल असलेल्या रुग्णांच्या एका नातेवाईकाला जेवणाची सोय करण्यात आली आहे. या योजनेत दररोज किमान ७०/८० लोक जेवत असतात. या जेवणाचा खर्च प्रति दिवस रु. ३००० असून ही देणगी देणाऱ्याचा फोटो कृषीवलमध्ये छापला जाईल. तरी जास्तीत जास्त लोकांनी अन्नदान सेवेचा लाभ घेऊन या सामाजिक उपक्रमात सहभागी व्हावे असे आवाहन कृषीवल करीत आहे. **संपर्क-** ८०५५३२५६७८ (बीपीन राठवा) ९२२६०५५१५५

(अमित शहानंद)
- मुख्य संपादक, कृषीवल

# खड्डे भरण्याच्या कामामुळे वाहनचालक त्रस्त

### डांबर टाकण्यापूर्वी रस्त्यावर खडीचे साम्राज्य
### दुचाकीस्वार रस्त्यावर स्लिप होऊन पडताहेत

**| नेरळ | प्रतिनिधी |**

कर्जत तालुक्यातील माथेरान या पर्यटन स्थळी जाणारा एकमेव रस्त्यांचा काही भाग मोठ्या प्रमाणावर नित्कृष्ट बनला आहे. रस्त्यावर पावसाळा संपल्यानंतर खड्डे भरण्यासाठी डांबर टाकले जात आहे. मात्र रात्रीच्या अंधारात केलेल्या कामामुळे वाहनचालक त्रस्त झाले आहेत. नित्कृष्ट प्रकारचे डांबर टाकण्यात आल्याने रस्त्यावर खडी पसरली असून अनेक दुचाकी रस्त्यावर स्लिप होऊन पडत आहेत.

माथेरान नेरळ घाटरस्ता अवघड घाट समजला जातो. माथेरान या ठिकाणी मोठ्या प्रमाणावर पर्जन्य होत असल्याने माथेरान घाट रस्ता दरवर्षी खराब होत असतो. त्यामुळे माथेरान घाट रस्त्यात पावसाळा संपला की पावसाळ्यात पडलेले खड्डे भरून घ्यावे लागतात.मागील एक दीड महिना या खड्डेमय घाट रस्त्यामुळे वाहनचालक नाराज आहेत. त्यामुळे ऐन पर्यटन हंगाम आला असताना डांबर टाकून खड्डे भरण्याची कामे सार्वजनिक बांधकाम विभागाकडून सुरू करण्यात आली. त्यात रात्रीच्या वेळी डांबर टाकून खड्डे भरले जात असताना सकाळी आपली वाहने घेऊन जाणारे वाहनचालकांना मोठ्या कठीण प्रसंगाला सामोरे जावे लागत होते. रात्री डांबर टाकून खड्डे भरले जात असल्याने शेवटी ते डांबर रस्त्यावर चिकटले नाही आणि परिणामी डांबर तसेच



खडी वाहनांच्या चालण्यामुळे इतरास्त्र पसरत होती. त्यात नव्याने घाट रस्त्यात दुचाकी चालवणारे वाहन चालकांच्या गाड्या रस्त्यावर कोसळत आहेत. त्यात समोरून वाहने येत असताना दुचाकी कोसळून मोठे अपघात टळले आहेत. पण अनेक वाहने रस्त्यावर पडत होती आणि दुचाकी चालक यांच्या हातापायातून रक्त येत होते.

सार्वजनिक बांधकाम विभागाने घाट रस्त्यात खड्डे भरण्याची कामे करताना नित्कृष्ट दर्जाचे डांबर वापरले जात असल्याचा आरोप वाहनचालक यांनी केला आहे.माथेरान येथे येणारे पर्यटक ज्या प्रवासी वाहनाने नेरळ येथून माथेरान जात असतात त्या नेरळ माथेरान टॅक्सी संघटना यांच्याकडून तीव्र नाराजी व्यक्त केली. रात्री कुठेही डांबरीकरण केले जात नाही आणि त्यावेळी आवश्यक असलेले तापमान मिळत नसल्याने रस्त्यावर टाकलेले डांबर निघून जाते.त्यानंतर रस्ता आहे तसाच होत असल्याने टॅक्सी चालक यांनी बांधकाम खात्याच्या कारभारावर टीका केली.बांधकाम खात्याने रात्री रस्त्यावरील खड्डे भरल्याने सर्वत्र नाराजी पसरली आहे.

> घाट रस्ता नादुरुस्त झाल्याने केवळ खड्डे भरून काहीही होणार नाही तर रस्त्यावर अखंडपणे रस्ता नव्याने डांबरीकरण केला पाहिजे. रस्त्यावरील खड्डे डांबर टाकून भरल्यानंतर अपघात होत आहेत हे अपघात कोणाच्या जीवावर बेतू नये अशी प्रार्थना केली आहे.
> –नरेंद्र कराळे,अध्यक्ष टॅक्सी संघटना

## अंड्यांचे दराचा पाच वर्षांचा उच्चांकावर

**वाशी :** नवी मुंबई परिसरात अंड्यांचे दर पाच वर्षांतील उच्चांकी पातळीवर पोहोचले असून याचा थेट फटका सर्वसामान्य नागरिकांना बसत आहे. सध्या घाऊक बाजारात अंड्यांचा दर सात ते साडेसात रुपये प्रति अंडे असून किरकोळ विक्रीत एका अंड्यासाठी आठ ते साडेआठ रुपये मोजावे लागत आहेत. थंडीच्या हंगामात वाढलेली मागणी, कोंबडी पालनाच्या खर्चात झालेली वाढ, खाद्यधान्यांच्या दरातील चढउतार आणि वाहतूक खर्च यामुळे अंड्यांचे दर सातत्याने वाढत असल्याचे व्यापाऱ्यांकडून सांगण्यात येत आहे. दररोज मोठ्या प्रमाणावर अंड्यांची खरेदी-विक्री होते. हॉटेल्स, ढाबे, बेकरी, कॅन्टीन, तसेच जिम आणि प्रथिने आहार घेणाऱ्या नागरिकांकडून अंड्यांची मागणी मोठ्या प्रमाणात वाढली आहे; मात्र उत्पादन खर्च वाढल्याने अपेक्षित प्रमाणात पुरवठा होत नसल्याने मागणी आणि पुरवठ्यातील तफावत निर्माण झाली आहे. त्यामुळे दरही वाढले आहेत. गेल्या पाच वर्षांतील हे उच्चांकी दर आहेत.

## हवामान बदलाचा रब्बी पिकांवर परिणाम

**| कोलाड | प्रतिनिधी |**

सध्या हवामानात अनेक दिवसांपासून बदल झालेला जाणवत आहे. पहाटे धुक्याची चादर, त्यातून सूर्याचे डोकावणे, नंतर कोवळे ऊन, तर क्षणात आकाशात दाटून आलेले ढग असे विचित्र वातावरणमुळे सर्वजण अनुभवत आहेत. यामुळे यंदा खरिपाच्या शेतीचे नुकसान झाले आहे. वातावरणातील बदलामुळे शेतीवर परिणाम झाल्याचे चित्र आहे.



मात्र, मागील सहा महिन्यांपासून सतत ओलावा टिकून राहिल्याने फळझाडांना विशेषतः आंबे, शेवगा यांना आता मोहोर व फुलोरा येण्याची वेळ असताना चक्क नवी पालवी फुटू लागली आहे. तर लांबलेल्या पावसामुळे रब्बी हंगाम सुद्धा लांबला आहे.

दरसाल होणाऱ्या भाजीच्या वाडीलाही अद्याप असलेला ओलावा परिणामकारक ठरला आहे. यंदा अजून कांदा, मिरची, मुळा, टोमॅटो, चवळी, वांगी, भेंडी, गवार ही पिके लांबणीवर पडली आहेत. याचबरोबर वसईचा अत्यंत चवीचा हिरव्या भाजीतील पावटा, लाल वाल कमी अधिक प्रमाणात बाजारात यायचा त्याची रोपे आता बांधावर उगवू लागली आहेत. त्यामुळे कठवळ वर्गातील हरभरा, वाल, तूर, तीळ, उडीद, मूग हि पिके सुद्धा लांबणीवर पडली आहेत. त्यामुळे पुढील रब्बी हंगाम लागवड वेळेवर करता येईल का याची चिंता शेतकऱ्यांना लागली आहे.

## गणपतीपुळे किनारा पर्यटकांनी गजबजला

**| गणपतीपुळे | प्रतिनिधी |**

जागतिक दर्जाचे पर्यटनस्थळ व लाखो भाविकांचे श्रद्धास्थान असलेल्या गणपतीपुळे येथे सरत्या वर्षाला निरोप आणि नवीन वर्षाच्या पार्श्वभूमीवर पर्यटकांची मोठी गर्दी होऊ लागली आहे. या पार्श्वभूमीवर जयगड पोलीस ठाण्याकडून विशेष पोलीस बंदोबस्त तैनात करण्यात आला. मंदिर परिसर आणि समुद्र किनाऱ्यावर विशेष लक्ष केंद्रित करण्यात आले आहे. दरम्यान, किनाऱ्यावरील गर्दीच्या पार्श्वभूमीवर जिल्हा पोलीस दलाकडून जादा पोलीस कर्मचारी बंदोबस्तासाठी गणपतीपुळे येथे पाठविण्यात आले आहेत. त्यामुळे जयगड पोलीस ठाण्याचे कर्मचारी व रत्नागिरी जिल्हा पोलिस दलाच्या कर्मचाऱ्यांकडून पर्यटकांच्या गर्दीवर नियंत्रण ठेवले जाणार आहे.

सध्या या पर्यटनस्थळाच्या ठिकाणी नाताळ पर्यटन हंगाम सुरू असल्याने विविध ठिकाणचे पर्यटक दाखल होत असून, थर्टी फर्स्ट आणि नवीन वर्षाच्या सुरुवातीला पर्यटकांकडून मोठा प्रतिसाद मिळेल, असा अंदाज व्यक्त केला जात आहे. सध्या येथील किनाऱ्यावर दाखल झालेल्या पर्यटकांकडून येथील देवदर्शन आणि समुद्रस्नानाचा विशेष आनंद लुटला जात असून समुद्रकिनाऱ्यावरील वॉटर स्पोर्ट आणि उंच आकाशातील पॅराग्लायडिंगलाही पर्यटकांची विशेष पसंती मिळत आहे. विस्तीर्ण किनाऱ्यावरील वाळूमध्ये उंट, घोडे सफारी, एटीव्ही बाईक राईड आदींचा आनंद पर्यटक लुटत आहेत. एकूणच गणपतीपुळे तीर्थक्षेत्राकडे राज्यासह देश-विदेशातील पर्यटकांची पावले आता वळू लागली असून सरत्या वर्षाला निरोप देण्यासाठी आणि नवीन वर्षाचे स्वागत करण्यासाठी गणपतीपुळे पर्यटनस्थळ सज्ज झाले आहे. याच ठिकाणी सध्या जिल्हास्तरीय सरस महिला बचत गटांचे प्रदर्शन सुरू असल्याने या प्रदर्शनाला पर्यटकांचा वाढता प्रतिसाद मिळत आहे. दररोज मोठ्या संख्येने पर्यटक भेटी देत आहेत त्यामुळे थर्टी फर्स्ट आणि नवीन वर्षाच्या पार्श्वभूमीवर लाखो पर्यटक भेट देतील, असा अंदाज व्यक्त होत आहे.



## आवळा शाश्वत उत्पन्नाचा मार्ग

**| दापोली | प्रतिनिधी |**

रत्नागिरी जिल्ह्यात पारंपरिक फळपिकांबरोबरच आवळा या पिकाकडे शेतकऱ्याचा कल वाढल्यास शेतकऱ्यासाठी नव्या शेतीचे प्रतीक ठरेल. औषधी गुणधर्म, आयुर्वेदातील महत्त्व तसेच प्रक्रिया उद्योगातील वाढती मागणी यामुळे आवळा पीक शाश्वत उत्पन्नाचे साधन ठरत आहे. जिल्ह्यात अद्याप मोठ्या प्रमाणावर व्यापारी लागवड झालेली नसली तरी काही तालुक्यांमध्ये प्रायोगिक आणि बागायती स्वरूपात आवळ्याची लागवड वाढू लागली आहे. कमी पाण्यावर तग धरू शकणारे आणि विविध जमिनींमध्ये वाढणारे पीक म्हणून आवळ्याची ओळख आहे. कोकणातील हवामान आणि माती आवळ्यास पूरक आहे. योग्य तंत्रज्ञानाचा वापर केल्यास चांगले उत्पादन मिळू शकते. कृषी तज्ज्ञांच्या मते, एकदा स्थिरावल्यानंतर आवळ्याचे झाड ३० ते ४० वर्षे उत्पादन देते. साधारणपणे ७ ते ८ वर्षांनंतर झाड पूर्ण उत्पादनात येते आणि एका झाडापासून दरवर्षी ४० ते ८० किलोपर्यंत उत्पादन मिळू शकते.

जिल्ह्यात आवळा प्रक्रिया उद्योगांची संख्या मात्र अत्यल्प आहे. त्यामुळे शेतकऱ्यांना योग्य दर मिळण्यात अडचणी येतात. प्रक्रिया उद्योग, साठवणूक सुविधा आणि थेट बाजारपेठ उपलब्ध झाल्यास आवळा पीक जिल्ह्यातील शेतकऱ्यासाठी आर्थिकदृष्ट्या फायदेशीर ठरू शकते, असे मत कृषी क्षेत्रातील जाणकार व्यक्त करतात.

जिल्हास्तरावर आवळा लागवडीची स्वतंत्र व अद्ययावत आकडेवारी उपलब्ध नसणे ही मोठी अडचण आहे. कृषी व फलोत्पादन विभागाने तालुकानिहाय लागवड क्षेत्र, उत्पादन आणि जातींची नोंद घेऊन माहिती जाहीर केल्यास शेतकरी तसेच



उद्योजकांना नियोजन करणे सोपे होईल. शासनाच्या विविध फलोत्पादन योजनांतून रोपे, तांत्रिक मार्गदर्शन आणि अनुदान मिळाल्यास जिल्ह्यात आवळा पीक नव्या संधी निर्माण करू शकते. एकूणच, बदलत्या शेती पद्धतीत आणि वाढत्या खर्चाच्या पार्श्वभूमीवर दीर्घकालीन आणि टिकाऊ उत्पन्न देणारे पीक म्हणून आवळ्याकडे पाहिले जात आहे.

## बनावट वेबसाईटमुळे १८ जणांची फसवणूक

**पनवेल :** कॉलगर्ल पुरवण्याच्या नावाखाली फेक वेबसाईटच्या माध्यमातून तामिळनाडू परिसरातील १८ नागरिकांची हजारो रुपयांची फसवणूक करणाऱ्या १३ जणांना पनवेल तालुका पोलिसांनी तिरुपुर सायबर अटक केली आहे. तामिळनाडूमधील तिरुपुर सायबर पोलीस विभागाकडे काही जणांनी फेक वेबसाईटच्या माध्यमातून आपली फसवणूक झाल्याची तक्रार केली होती. यामध्ये एकूण १८ तक्रारदारांनी ५३ हजार रुपये लुबाडल्याची तक्रार दाखल केली होती. या तक्रारीच्या आधारे तिरुपुर सायबर पोलीस ठाण्याचे सय्यद रफिक सिकंदन व महिला उपनिरीक्षक कनक वल्ली व त्यांचे पथक तांत्रिक तपासाच्या आधारे शोध घेत असताना एका फ्लॅटमध्ये छापा टाकला असता तामिळनाडू परिसरात वास्तव्यास असलेले १३ जण येथे एकत्रितपणे राहत असल्याचे आढळून आले. त्यांच्याकडे मोबाइलफोन, लॅपटॉप व इतर साहित्य आढळून आल्याने त्यांना ताब्यात घेऊन अधिक चौकशी केली असता, गुन्ह्यातील मुख्य आरोपी प्रदीप अशा प्रकारे नियमित लोकांची फसवणूक करत असल्याचे आढळून आले.

## जिल्ह्यात कडधान्यासह भाजीपाला फुलणार

**| रत्नागिरी | प्रतिनिधी |**

भाताचे कोठार म्हणून ओळख असणारे रत्नागिरी जिल्ह्यात यंदा पावसाने शेतीचे मोठे नुकसान केले आहे. त्यामुळे खरीप हंगाम शेतकऱ्यांसाठी नुकसानीचा ठरला असून रब्बी हंगाम उशिराने सुरुवात झाली. यंदा ५ हजार ४०५ हेक्टर क्षेत्रावर कडधान्य आणि भाजीपाला लागवड करण्यात येणार आहे. आतापर्यंत तीन हजारहून अधिक हेक्टरवर



पेरण्यापूर्ण झाल्या आहेत. एकूण ६० ते ६५ टक्के पेरण्या झालेल्या आहेत. रब्बी पिकाची लागवड पूर्ण झाली आहे.

जिल्ह्यात पावसाळी खरीप हंगाम संपल्यानंतर रब्बी हंगाम उशिराने सुरुवात झाली. जिल्ह्यात सरासरी ६ हजार हेक्टरवर रब्बी पिकांचे लागवड क्षेत्र आहे. जिल्ह्यात रब्बी हंगामात प्रामुख्याने वांगी, टोमॅटो, मिरचा, मुळा, पडवळ, वाल, दोडके, कारली, भेंडी, दुधी, घोसाळी, तोंडली, दोडक, काकडी इत्यादी भाज्यांची पेरणी केली. कडधान्य कुळीथ, पावटा, हरभरा, कडवा, पावटासह इतर कडधान्यांची पेरणी करण्यात आली आहे. भात कापणी, मळणी झाल्यानंतर रब्बी हंगामाला सुरूवात होते.

> रत्नागिरी जिल्ह्यात रब्बी हंगाम उशिराने सुरू झाल्यामुळे पेरण्याचे उद्दिष्ट अद्याप पूर्ण झाले नाही. ५ हजार ४०५ हेक्टरवर रब्बी हंगामचे उद्दिष्ट आहे. तीन हजारहून अधिक हेक्टरवर पेरण्या पूर्ण झाल्या आहेत. –शिवकुमार सदाफुले, जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी, रत्नागिरी.

### आरटीओच्या हस्तक्षेपाऐवजी मानवी एटीसी कार्यान्वित | ताडदेवमध्ये स्वयंचलित चाचणी केंद्राचे काम सुरू

# वाहनांचे फिटनेस आता मशीन तपासणार

**मुंबई | प्रतिनिधी |**

रस्ते अपघातांचे प्रमाण कमी करण्यासाठी वाहन तपासणीत पारदर्शकता आणण्यासाठी परिवहन विभागाने कंबर कसली आहे. प्रवासी, मालवाहतूक वाहनांच्या फिटनेससाठी आता आरटीओ कार्यालयात हस्तक्षेपाऐवजी मानवी एटीसी कार्यान्वित होणार आहेत. मुंबईत ताडदेव आरटीओ स्वयंचलित चाचणी केंद्राचे काम सुरू करण्यात आले आहे. तर अंधेरी येथे लवकरच स्वयंचलित चाचणी केंद्राचे काम केले जाणार आहे.

मार्चअखेरपर्यंत दोन्ही केंद्र सुरू होतील, अशी माहिती परिवहन विभागाच्या अधिकाऱ्याने दिली.

पारंपरिक तपासणीसाठी आरटीओंना मोठ्या धावपट्टीची (ट्रॅक) गरज भासते. मात्र एटीसी यंत्रणा एका विशिष्ट शेडमध्ये कार्यान्वित होते. वाहन एका जागीच असताना किंवा रोलर्सवर फिरत असताना मशीनद्वारे रीडिंग घेतील.

प्रवासी व मालवाहू वाहनांसाठी सध्या आरटीओ निरीक्षक वाहनाचा हँडब्रेक, इंडिकेटर्स, वायपर्स आणि ब्रेक लावून पाहतात. नवीन व्यावसायिक वाहनांना सुरुवातीची दोन वर्षे फिटनेसची गरज नसते. त्यानंतर दर दोन वर्षांनी फिटनेस प्रमाणपत्र नूतनीकरण करावे लागते.

### गैरव्यवहारांचे प्रकार होणार कमी

**स्वयंचलित यंत्रणेमुळे भ्रष्टाचाराला वाव उरणार नाही. यंत्राद्वारे जनरेट होणाऱ्या रिपोर्ट थेट सर्व्हरवर अपलोड होईल. त्यामुळे नापास वाहन पास करणे कोणाच्याही हातात राहणार नाही. त्यामुळे गैरप्रकार कमी होणार आहेत.**



> वाहनांच्या फिटनेस तपासणीत मानवी हस्तक्षेप पूर्णपणे दूर करून आता अत्याधुनिक स्वयंचलित चाचणी केंद्रांद्वारे (एटीसी) पारदर्शक आणि अचूक प्रक्रिया राबवली जाणार आहे.
> – भरत कळसकर, सह परिवहन आयुक्त

आठ वर्षांवरील वाहनांना दरवर्षी फिटनेस चाचणी करणे अनिवार्य आहे. फिटनेस प्रमाणपत्र संपल्यास दररोज ५० रुपये अतिरिक्त दंड आकारला जातो. एटीसीत सहा मिनिटांतच प्रक्रिया पूर्ण होणार सध्या आरटीओमध्ये एका वाहनाच्या फिटनेससाठी तासन्तास थांबावे लागते.

एटीसी यंत्रणेत अवघ्या सहा मिनिटांत सर्व तांत्रिक चाचण्या पूर्ण होतील. राज्यात ५४ एटीसी उभारण्याचे काम सुरूमहाराष्ट्र सरकारने राज्यात एकूण ५४ स्वयंचलित चाचणी केंद्र उभारण्यास मान्यता दिली आहे. त्यापैकी अनेक ठिकाणी बांधकाम आणि यंत्रसामग्री बसवण्याचे काम वेगाने सुरू आहे. ही सार्वजनिक-खासगी भागीदारी तत्त्वावर चालवली जाणार आहेत.

## निवडक

### म्हसोबा यात्रेसाठी प्रशासन सज्ज

**मुरबाड :** मुरबाडची ओळख असलेल्या आणि तब्बल २२६ वर्षांची ऐतिहासिक परंपरा लाभलेल्या म्हसोबा यात्रेसाठी प्रशासन पूर्ण ताकदीने सज्ज झाले आहे. ३ जानेवारीपासून सुरू होणाऱ्या या यात्रेसाठी मुरबाडचे तहसीलदार अभिजित देशमुख यांनी सर्व विभागांची संयुक्त बैठक घेत सविस्तर योजना तयार केली आहे. भाविकांची गैरसोय होऊ नये, यासाठी विविध विभागांना लेखी आदेश देऊन कडक सूचना देण्यात आल्या आहेत. यात्रेत भाविकांना शुद्ध पाणी मिळावे, यासाठी पाणीपुरवठा विभागाने परिसरातील विहिरी आणि बोअरवेलची साफसफाई करून दुरुस्ती केली आहे. भाविकांच्या पिण्याच्या पाण्यासाठी चोख व्यवस्था करण्यात आली आहे. यात्रेच्या कालावधीत वीजपुरवठा खंडित होऊ नये आणि दिवाबत्तीची व्यवस्था चोख राहावी, यासाठी महावितरणने विशेष पथके तैनात केली आहेत. भाविकांच्या वाहतुकीसाठी मुरबाड बस आगाराने जादा बस सोडण्याचे नियोजन केले असून, बस सुस्थितीत ठेवण्यासाठी कंबर कसली आहे. यात्रेत तातडीच्या वैद्यकीय मदतीसाठी आरोग्य विभाग सतर्क करण्यात आला आहे. तसेच सार्वजनिक बांधकाम विभागाने रस्त्यांच्या दुरुस्तीकडे लक्ष दिले आहे.

### रानवली शाळेच्या परसबागेचे कौतुक

**श्रीवर्धन :** प्रधानमंत्री पोषण शक्ती निर्माण योजनेअंतर्गत शासनाच्या निर्णयानुसार शालेय परसबाग जिल्हास्तरीय मूल्यमापन समितीने रानवली येथील रायगड जिल्हा परिषद शाळेला भेट देऊन उपक्रमांचे मूल्यमापन केले. या वेळी शालेय परसबागेत करण्यात आलेल्या कामाची तपशीलवार पाहणी झाली तसेच स्पर्धात्मक परीक्षकांकडून शाळेच्या उपक्रमाचे कौतुक करण्यात आले.रायगड जिल्ह्यातील प्रत्येक तालुक्यातून एक शाळा स्पर्धेत सहभागी होण्यासाठी निवडण्यात आली होती. शाळेच्या परिसरात भाजीपाला आणि फळझाडांची लागवड करण्यात आली आहे. भाजीपाल्यांमध्ये मुळा, माठ, पालक, बीट, गाजर, मेथी, कोथिंबीर, वांगी, मिरची, टोमॅटो, कोबी, फ्लॉवर, तूर, मटकी, पावटा आदींचा समावेश आहे. शाळा सलग तीन वर्षे शालेय परसबाग उपक्रमात प्रथम क्रमांक प्राप्त करीत आहे. त्यामुळे त्या परबागेचे सर्वत्र कौतुक केले जात आहे.

### तिसे येथे हरिनाम सप्ताहाचे आयोजन

**कोलाड :** रोहा तालुक्यातील मौजे तिसे येथे सामुदायिक ग्रंथराज ज्ञानेश्वरी पारायण व अखंड हरीनाम जप यज्ञ सप्ताह शुक्रवार २६ ते २९ डिसेंबर या कालावधीत संपन्न होणाऱ्या सप्ताहात धार्मिक तथा आध्यात्मिक कार्यक्रम तसेच महाराष्ट्रातील नामवंत कीर्तनकारांची किर्तन सेवा आणि प्रवचन मार्गदर्शन सेवा लाभणार असून सर्व सांप्रदायिक भाविकांनी या भक्तीचा लाभ घ्यावा असे आवाहन ग्रामस्थ मंडळी तिसे यांच्या वतीने करण्यात आले आहे,तर सदरच्या कार्यक्रमासाठी मंदिर परिसर आणि गाव विविध कणा रांगोळी आणि विद्युत रोषणाईने उजळून निघाले असून यासाठी ग्रामस्थ नागरिकांची जय्यत तयारी सुरू आहे. श्री सोमजाई मातेच्या तेहतीसाव्या प्राणप्रतिष्ठापना वर्षा निमित्ताने तसेच श्री हनुमान मूर्ती प्राणप्रतिष्ठापना सहाव्या वर्षानिमित्ताने तिसे ग्रामस्थांच्या वतीने रामकृष्ण हरि दिव्य मंत्र जपानुष्ठान व अखंड नामयज्ञ सप्ताह साजरा होणार आहे.श्री समर्थ भजन मंडळ, उणेगांव ग्रामस्थ मंडळ वरसगांव, श्री. राम खेडेकर व सामुदायिक जागर तर कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी ग्रामस्थ मंडळ, महिला मंडळ, व युवक मंडळ तिसे हे अथक परिश्रम घेत आहेत.

### अच्युत जोशी यांचे निधन



**सोगाव :** अलिबाग तालुक्यातील बहिरोळे येथील मापगाव ग्रामपंचायतीचे माजी तंटामुक्ती अध्यक्ष विवेक जोशी यांचे वडील तथा मापगाव ग्रामपंचायतीचे माजी सदस्य अच्युत विष्णु जोशी(वय ८९) यांचे मंगळवार (दि. १६) डिसेंबर रोजी वृद्धापकाळाने निधन झाले. त्यांच्या निधनाची माहिती मिळताच अंत्यदर्शनासाठी व अंत्यसंस्कारावेळी राजकीय व सामाजिक क्षेत्रातील मान्यवर व पंचक्रोशीतील ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित उपस्थित होते. त्यांच्या पश्चात दोन भाऊ, एक बहीण, पत्नी, तीन विवाहित मुली व एक विवाहित मुलगा, नातवंडे असा मोठा परिवार आहे.

### बाबीबाई गायकवाड यांचे निधन

**रसायनी :** कुंभिवली येथील बाबीबाई काशिनाथ गायकवाड यांचे वयाच्या ९४ व्या वर्षी निधन झाले. त्यांनी आळंदी पंढरपूर वारी न चुकता त्यांनी नियमाने केल्या. एक दानशूर महिला म्हणून त्यांच्याकडे पाहिले जायचे. त्यांचा दशक्रिया विधी बुधवार (दि.३१) डिसेंबर रोजी श्रीक्षेत्र धाकटी पंढरी, साजगाव खालापूर येथे व उत्तरकार्य शनिवार (दि.३) जानेवारी रोजी कुंभिवली येथील राहत्या घरी होणार आहेत. त्यांच्या अंतिम यात्रेस वारकरी संप्रदाय, सामाजिक क्षेत्रातील मान्यवर मोठ्या संख्येने उपस्थित होते.



### श्री स्वामी समर्थांच्या पादुकांचे आगमन

**बोर्लीपंचतन :** श्री स्वामी समर्थ महाराज, अक्कलकोट यांच्या पावन चरणपादुकांचे दिवेआगर येथील ओझा बंधूंच्या पुण्याई हॉलिडे होम येथे रविवार (दि.२१) डिसेंबर रोजी भक्तिमय वातावरणात आगमन झाले. याप्रसंगी परिसरातील भाविकांनी चरणपादुकांचे पूजन केले. यावेळी अक्कलकोट समाधी मठ येथे सेवा करणारे पंडित योगेंद्र गुरुजी यांची प्रमुख उपस्थिती लाभली. श्री स्वामी समर्थ महाराजांच्या चरणपादुकांचे दिवेआगर येथे आगमन झाल्याने परिसरात भक्तिभावाचे वातावरण निर्माण झाले असून भाविकांना दर्शनाचा लाभ मिळाल्याने समाधान व्यक्त करण्यात येत आहे.



### वांगणीत बिबट्याची दहशत

बदलापूर : बदलापूर जवळच्या आंबेशिव, काराव पाठोपाठ आता वांगणी गावातही बिबट्याची दहशत पसरली आहे. इथल्या शिवाजीनगर जुना भेंडी पाडा परिसरात बिबट्यानं दोन श्वानांची शिकार केल्याच समोर आले आहे. भर लोकवस्तीत बिबट्याने श्वानांवर हल्ला केल्यामुळे इथले नागरिक धास्तावले आहेत. बिबट्याने श्वानांवर हल्ला केल्याची बातमी समजतात वन विभागाचे पथक वांगणी गावात दाखल झाले. त्यांनी नागरिकांना सतर्क राहण्याचा आवाहन वनविभागाकडून करण्यात आले आहे. गेल्या काही दिवसांपासून आंबेशीव आणि काराव या दोन गावात बिबट्याचं दर्शन घडल्याचं समोर आल्या होते. त्यानंतर आता बिबट्याने थेट वांगणीत प्रवेश केल्यामुळे नागरिकांमध्ये भीतीची लाट पसरली आहे. गेल्या काही दिवसांत वांगणी आणि परिसरात एक मादी बिबट्या आणि दोन बछडे दिसल्याचे स्थानिकांचे म्हणणे आहे. या बिबट्यांचा लवकरात लवकर बंदोबस्त करावा अशी मागणी स्थानिकांकडून केली जाती आहे.

# निवडक



## प्राथमिक विद्यामंदिरचे वार्षिक स्नेहसंमेलन

**सुधागड :** सुधागड एज्युकेशन सोसायटीचे मातोश्री जानकीबाई केशव लिमये प्राथमिक विद्यामंदिर पाली येथे शनिवारी (दि.२७)वार्षिक स्नेहसंमेलन मोठ्या उत्साहात संपन्न झाले. या स्नेहसंमेलनात चिमुकल्यांनी मोठ्या उत्साहात गणेश मानवंदना, कोळीगीते, लोकगीते, पंजाबी नृत्य, आदिवासी नृत्य, रिमिक्स डान्स असे अनेक नृत्यआविष्कार सादर केले. या बालकलाकारांनी आपल्या नृत्य सादरीकरणातून उपस्थित पालकवर्ग आणि प्रेक्षकांची मने जिंकली. यावेळी मुख्याध्यापिका जोत्स्ना तांडेल, वैभवी अधिकारी, रोहिणी वरंडे, सुप्रिया झोलगे, वंदना गायकर, सुचिता वरंडे, सुचिता नाईक, निता मोरे, नकुल दोरे, सविता म्हात्रे व अनुराधा लखिमळे आदी मान्यवर उपस्थित होते.




## विद्यार्थ्यांना मोफत करिअर मार्गदर्शन

**पाली/बेणसे :** सुधागड तालुका मराठा समाजातर्फे मराठा समाजाच्या स.स. साजेकर सभागृहामध्ये करिअर मार्गदर्शन शिबीर नुकतेच आयोजीत करण्यात आले होते. या कार्यक्रमाचे अध्यक्षस्थान सुधागड तालुका मराठा समाजाचे विद्यमान अध्यक्ष धनंजय साजेकर यांनी भूषवले होते. या शिबिरात लेखक, आरटीआय कार्यकर्ते, सजग नागरिक मंचाचे अध्यक्ष व प्रसिद्ध करिअर मार्गदर्शक व्याख्याते विवेक वेलणकर यांनी मार्गदर्शन केले. दहावी आणि बारावीच्या विद्यार्थ्यांसाठी विविध क्षेत्रातील संधी जसे की, हॉटेल मॅनेजमेंट, नर्सिंग, मेहंदी, फोटोग्राफी, विज्ञानाच्या विविध शाखा, व्यावसायिक कोर्स, आयटीआय सह एंट्रन्स शिप, स्वयंरोजगार संधी त्यांच्या मोफत शिक्षण देणाऱ्या विविध संस्थांची माहिती त्यांनी दिली. यावेळी कार्याध्यक्ष बळीराम निंबाळकर, सरचिटणीस सुचित बारस्कर, शिक्षण समिती प्रमुख भोईर सर, विशाखा वेलणकर, विद्यार्थी व पालक उपस्थित होते.




## चालक-वाहकांसाठी विश्रांतीगृह

**कर्जत :** तालुक्यातील ओलमन गावातील आदिवासी सेवाभावी सामाजिक संस्था अध्यक्ष व आदिवासी समाज संघटना कर्जतचे सल्लागार दादा पादीर यांच्या वाढदिवसानिमित्ताने व कै. माजी आमदार मनोहर पादीर यांच्या स्मरणार्थ बस चालक-वाहकांसाठी विश्रांतीगृह बांधून देण्यात आला आहे. या स्तुत्य उपक्रमाचे कौतुक सर्वत्र केले जात आहे. बऱ्याच वर्षांपासून नेरळ ते ओलमन एसटी बस सेवा सुरू आहे. परंतु, वस्तीला येणाऱ्या बसमधील चालक-वाहकांना राहण्याची व्यवस्था नव्हती. पुर्वी बसमधील मागची व पुढची सीट मोठी असायची. त्यामुळे त्यांना त्यावर रात्री निट झोपता येत होते. परंतु, आता बसमधील सीट छोटी असल्याने त्यांना झोपण्यासाठी मोठी गैरसोय होऊ लागली. त्यामुळे त्यांच्या सोयीसाठी दादा पादीर यांनी नऊ बाय दहाची रूम तयार करून आपल्या वाढदिवसानिमित्त त्यांना भेट दिली. त्यांच्या या स्तुत्य उपक्रमाचे सर्वत्र कौतुक होत आहे.

## क्लासिफाईड
जाहिरात छोटी, उपयुक्तता मोठी

- कुरुळ ता. अलिबाग येथे दोन तीन गुंठे प्लॉट त्वरीत देणे आहे. ७७२०८४३९९९, ८०८७४७३९९९
- अलिबागमधील ऑफिस करीता खालील जागा भरणे आहे. ऑफिस क्लार्क व ऑटोकैड ड्राफ्ट्समन मोबाईल नंबर ९९७०३९१६९७
- पाहिजेत -अलिबाग येथे ऑफिसमध्ये कॉम्पुटर ऑपरेटर/ऑफिस असिस्टंट पाहिजे. संपर्क - श्री.मधुकर पाटील ९२७३२८९०१५/९४२०३२५१०६
- मंगल ग्रेन स्टोअर्स, बाजारपेठ अलिबागमध्ये कामासाठी मूले व मुली पाहिजेत संपर्क - ७८७५९९००९२
- अलिबागमध्ये एका ऑफिसमध्ये कार्यालयीन सहाय्यक पाहिजे. पगार ८०००/- ते १२,०००/- कार ड्राइव्हींग येत असल्यास उत्तम वयोमर्यादा. २५ ते ४५ संपर्क : ८००७८९७८६६
- अलिबागमधील सुपर मार्केटमध्ये कामासाठी मुली/स्त्रिया पाहिजेत. मो. ९३२२८२३४०४
- श्री सिद्धीविनायक ज्योतिष सर्व समस्यांचे शीघ्र निवारण, नोकरी धंदा, गृहक्लेश, व्यापारवृद्धी, प्रेमसमस्या, लग्नामधली अडचण फोन नं. ९९६०४५६९८६ अलिबाग
- कामासाठी माणसे पाहिजेत – अलिबाग परिसरातील गरजुंनी वयोगट २८ ते ४० १) एस.टी. ने डिलेवरी २) मोटारसायकल डिलेवरी लायसन्स गरजेचे ३) पार्ट किंवा फूल टाईम ४) मोबाईल सेल्समन (बुकींगसाठी) मो.८८८८२२०२२१

जाहिरातीसाठी संपर्क : (०२१४१) २२२२९०/ २२२७६१

# सिद्धगड बलिदान दिन अभिवादन सभा

## नेरळमध्ये हुतात्मा स्मारकाचे लोकार्पण

## व्यक्ती, संस्थेचा पुरस्काराने सन्मान

**| नेरळ | प्रतिनिधी |**

नेरळमधील हुतात्मा स्मारक समिती या समाजसेवी संघटनेच्यावतीने हुतात्मा भाई कोतवाल आणि हिराजी पाटील यांचा बलिदान दिन दरवर्षी साजरा केला जातो. यावर्षी सिद्धगड बलिदान दिनी वांगणी-बदलापूर येथे पाणवठा संस्था तसेच मुरबाड येथील लेखक गिरीश कंटे यांना हुतात्मा गौरव पुरस्कार देऊन गौरवण्यात येणार आहे. दरम्यान, मुंबईतील हुतात्मा चौक येथे असलेल्या संयुक्त महाराष्ट्र लढ्याच्या शिल्पाची हुबेहूब प्रतिकृती नेरळ येथील हुतात्मा चौकात उभारण्यात आली आहे. त्या स्मारकाचे लोकार्पण देखील बलिदान दिनी होणार असल्याचे आयोजकांकडून सांगण्यात आले आहे.

कर्जत तालुक्यातील पत्रकारांनी २००५ साली नेरळ येथे हुतात्मा स्मारक समितीची स्थापना केली होती. तालुक्यातील



हुतात्मा भाई कोतवाल व हिराजी पाटील यांच्यासह १९४२ मध्ये ब्रिटिश सरकारला देशातून चले जावं करण्यासाठी पुकारलेल्या लढ्यात अनेक स्वातंत्र्यसैनिक सहभागी झाले होते. त्या सर्वांच्या प्रचार आणि प्रसाराचे कार्य ही समिती करीत आली आहे. या समितीच्यावतीने दरवर्षी २ जानेवारी रोजी हुतात्मा भाई कोतवाल आणि हिराजी पाटील यांचा बलिदान दिनानिमित्त सिद्धगड बलिदान दिवस साजरा केला जातो. या कार्यक्रमात समाजातील देशहिताचे कार्य करणाऱ्या व्यक्ती व संस्थांचा सन्मान केला जातो. यंदा वांगणी-बदलापूरमध्ये मुक्या प्राण्यांवर उपचार करून त्यांच्यासाठी गेली २० वर्षे अनाथाश्रम चालवणारी पाणवठा संस्था आणि त्यांचे प्रमुख गजराज जैन यांना हुतात्मा गौरव पुरस्कार देऊन सन्मानित केले जाणार आहे. तसेच, आझाद दस्त्यातील क्रांतिकारक आणि हुतात्म्यांचा इतिहास पुस्तक रूपाने सर्वांसमोर आणणारे मुरबाड तालुक्यातील लेखक गिरीश कंटे यांना देखील मान्यवरांच्या हस्ते सन्मानित केले जाणार आहे.

तसेच, हुतात्मा स्मारक समितीने घेतलेल्या पाठपुराव्यानंतर रायगड जिल्हा नियोजन मंडळाच्या माध्यमातून निधी प्राप्त झाला होता. त्या निधीमधून हुतात्मा चौक येथे संयुक्त महाराष्ट्र लढ्याचे प्रतीक समजले जाणारे हुतात्मा शिल्प उभारले आहे. या स्मारकाचे लोकार्पण खासदार सुनील तटकरे यांचे हस्ते केले जाणार आहे. या सिद्धगड बलिदान दिन अभिवादन सभेला माजी आमदार सुरेश लाड, सुरेश टोकरे, सुधाकर घारे यांच्यासह तालुक्याचे तहसीलदार डॉ. धनंजय जाधव, तालुका पोलीस उप अधीक्षक राहुल गायकवाड, कर्जतच्या नगराध्यक्षा पुष्पा दगडे, माथेरानचे नगराध्यक्ष चंद्रकांत चौधरी, नेरळ ग्रामपंचायतीचे प्रशासक सुजित धनगर आणि नेरळचे प्रभारी पोलीस अधिकारी राहुल वरोटे हे उपस्थित राहणार आहेत. या कार्यक्रमापूर्वी नेरळ परिसरातील शाळांचे विद्यार्थी समूह गीते आणि समरगीते सादर करणार आहेत. तरी सर्व देशप्रेमी नागरिकांनी या सोहळ्याला उपस्थित राहावे, असे आवाहन हुतात्मा स्मारक समितीच्यावतीने करण्यात आले आहे.

# श्रीधर मोकल यांची सामाजिक बांधिलकी



**| चिरनेर | प्रतिनिधी |**

शालेय विद्यार्थ्यांमध्ये निसर्गाविषयी प्रेम, जिव्हाळा व आपलेपणाचे नाते निर्माण व्हावे. त्याचबरोबर त्यांना विविध फळ झाडांची माहिति व त्या झाडांच्या उपयुक्ततेचे महत्व कळावे. यासाठी चिरनेर येथील राजिप प्राथमिक केंद्र शाळेच्या प्रांगणात निवृत्त जिल्हा नियोजन अधिकारी श्रीधर मोकल यांच्या संकल्पनेतून विविध प्रकारच्या ५० फळझाडांची लागवड दि.२६ ते २८ डिसेंबर या कालावधी दरम्यान करण्यात आली. या झाडांच्या लागवडीबरोबर संवर्धनाची जबाबदारी श्रीधर मोकल यांनी घेतली आहे. तर, उपक्रमाला उरण वनपरिक्षेत्राकडून विशेष मार्गदर्शन व सहकार्य लाभले.

यावेळी प्राथमिक शाळा व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष सचिन म्हात्रे, सरपंच भास्कर मोकल, माजी अध्यक्ष प्रविण म्हात्रे, महिला व बाल विकास अधिकारी साधना मोकल, मुख्याध्यापक बळीराम पाटील, ग्रामपंचायत सदस्य समाधान ठाकूर, भारती ठाकूर, समिर डुंगीकर, संदिप चिर्लेकर, मनोज नारंगीकर, हिमंत केणी, पुनम गोंधळी, सुनिता पिचड, विणा साळुंके, कृष्णा व्यापारी, अशोक कांबळे, रामचंद्र म्हात्रे, निलेश ठाकूर, जयेश खारपाटील आदींसह इतर मान्यवर, ग्रामस्थ, शाळेचे शिक्षक व विद्यार्थी उपस्थित होते. यादरम्यान, त्यांच्या या कार्याचे कौतुक चिरनेर परिसरातील नागरिक करत आहेत.

## कल्याणी हॉस्पिटलचे महत्त्वाचे पाऊल

**| आगरदांडा | प्रतिनिधी |**

मुरूड शहरातील कल्याणी रूग्णालयाचे डॉ. राज कल्याणी यांनी रुग्णांकरिता अनेक आरोग्य सेवा उपलब्ध करून दिल्या आहेत. परंतु, अत्याधुनिक सोनोग्राफी सुविधा नसल्याने येथील रुग्णांना बाहे जावे लागत असे. त्यामुळे कल्याणी रूग्णालयात अत्याधुनिक सोनोग्राफी मशीन आणण्यात आले. डॉ. राज कल्याणी व लक्ष्मी कल्याणी यांच्या हस्ते सोनोग्राफी सेंटरचे उद्घाटन करण्यात आले. यावेळी जंजिरा मेडिकलचे अध्यक्ष डॉ. संजय पाटील, डॉ. राज कल्याणी, लक्ष्मी कल्याणी, डॉ. मकबुल कोकाटे, डॉ. मंगेश पाटील, डॉ. मयुर कल्याणी, डॉ. भाविका कल्याणी, भुमीत कल्याणी, डॉ. हितेश जैन, डॉ. वासिम पेशइमाम, सुनील पटेल, डॉ. रविंद्र नामजोशी, डॉ. अमित बेनकर व डॉ. शकील परदेशी उपस्थित होते.

## माथेरानमध्ये महिलांसाठी आरोग्य शिबीर



**| नेरळ | प्रतिनिधी |**

नेरळ आणि परिसरात नेत्र चिकित्सा क्षेत्रात कार्य करणाऱ्या हार्मोनी फाऊंडेशनकडून माथेरानमध्ये महिलांसाठी आरोग्य तपासणी शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. भारताचे माजी प्रधानमंत्री अटलबिहारी वाजपेयी यांच्या जयंतीचे निमित्ताने या शिबिराचे आयोजन केले होते. दरम्यान, माथेरानचे नवनिर्वाचित नगराध्यक्ष चंद्रकांत चौधरी यांनी शिबिराला भेट देऊन शुभेच्छा दिल्या.

या शिबिरात महिलांची स्त्रीरोग तपासणी, हिमोग्लोबिन तपासणी, रक्तदाब आणि रक्तातील साखर तपासणी तसेच आरोग्यविषयक सल्ला देण्यात आला. डॉ. रोजीना काझी यांनी महिलांना आहार, स्वच्छता, मानसिक आरोग्य व नियमित तपासणीचे महत्त्व याबाबत मार्गदर्शन केले. तसेच, महिलांच्या आरोग्याबाबत जागरूकता निर्माण होणे अत्यंत गरजेचे असल्याचे मत त्यांनी व्यक्त केले. हे शिबिर यशस्वी करण्यासाठी सुभाष भोसले, सर्वेश भोसले, डॉ. मोहसीन काझी, डॉ. प्रशांत यादव, व योगेश जाधव यांचे हार्मोनी फाऊंडेशनला सहकार्य लाभले. कार्यक्रमादरम्यान, माथेरानचे नवनिर्वाचित नगराध्यक्ष चंद्रकांत चौधरी यांनी शिबिरास विशेष भेट दिली. त्यांच्यासोबत नगरसेविका रिजवाना अनिस शेख व सुनील शिंदे हे होते.

# हंगामी भाज्यांची आवक वाढली

**| पनवेल | प्रतिनिधी |**

थंडीचे दिवस सुरू होताच पनवेल शहरातील भाजी मार्केटमध्ये हंगामी भाज्यांची चांगलीच आवक वाढली आहे. दरम्यान, गावठाण आणि ग्रामीण भागातून पोपटीसाठीच्या वालाच्या शेंगा मोठ्या प्रमाणात पनवेल बाजारात दाखल झाल्या आहेत. सकाळी लवकरच शेतकरी आपला ताजा भाजीपाला थेट बाजारात आणत असल्याने वालाच्या शेंगा ताज्या व दर्जेदार मिळत आहेत. थंड हवामान या शेंगांच्या पिकासाठी पोषक ठरत असून यंदा उत्पादनात वाढ झाली आहे.

पनवेल बाजारात वालाच्या शेंगांसोबतच घेवडा, गवार, चवळी अशा इतर हंगामी शेंगांचीही आवक वाढली आहे. बाजारात विविध प्रकारच्या शेंगा उपलब्ध झाल्याने गृहिणींमध्ये



### वालाच्या शेंगांना मागणी

रायगड जिल्हा पर्यटनासह येथील पोपटीसाठी देखील प्रसिद्ध आहे. या पोपटीत चिकनसह वालाच्या शेंगा देखील लावल्या जातात. या पोपटीतील वालाच्या शेंगांची चव जिभेवर कायमची राहते. तसेच, वालाच्या शेंगांमुळे पोपटी अधुरीच आहे. त्यामुळे थंडीच्या हंगामात मोठ्या प्रमाणात वालाच्या शेंगांना मागणी असल्याचे विक्रेत्यांकडून सांगण्यात येते.

खरेदीची चांगलीच लगबग दिसून येत आहे. सध्या वालाच्या शेंगांना मागणी जास्त असून दरही स्थिर असल्याची माहिती विक्रेत्यांनी दिली. स्थानिक उत्पादनाला चांगला भाव मिळत असल्याने शेतकरी वर्गही समाधान व्यक्त करत आहे. हिवाळी भाज्यांमुळे पनवेलच्या भाजी बाजारात पुन्हा एकदा गजबजलेपणाचे चित्र पाहायला मिळत आहे.

## दोन अंकी नाट्यप्रयोग संपन्न



**| चिरनेर | प्रतिनिधी |**

गावो-गावच्या नाट्य मंडळांना, ग्रामीण कलाकारांना प्रोत्साहन देण्यात मला आनंद वाटतो. क्रीडा क्षेत्राबरोबरच गावोगावी नाट्य चळवळ उभी करण्यासाठी मी प्रयत्न करीत राहीन. नाट्य प्रेम हे घरातील तसेच नाट्य रसिकांच्या प्रेमामुळे वाढते. नाटककार हसूराम पाटील, अशोक म्हात्रे, धनेश्वर म्हात्रे या कलाकारांनी ग्रामीण कलाकारांना सोबत घेऊन नाट्यकलेचा जागर मांडला आहे. ही मंडळी करत असलेले काम अत्यंत स्तुत्य असे आहे. ग्रामीण नाट्य संस्कृती पूर्वीप्रमाणे प्रत्येक गावागावात अभंग रहावी यासाठी मी प्रयत्न करत राहीन, असे प्रतिपादन आंतरराष्ट्रीय कामगार नेते महेंद्र घरत यांनी केले.

उरण तालुक्यातील वेश्वी येथील मुंबईकर परिवाराच्यावतीने आणि अष्टगंध कला मंचाचे अध्यक्ष अशोक म्हात्रे यांच्या संकल्पनेतून 'पैशाने तुटली नाती' या दोन अंकी नाट्यप्रयोगाचे आयोजन गुरूवारी (दि.२५) करण्यात आले होते. त्यावेळी ते बोलत होते. यावेळी सरपंच अजित पाटील, विलास पाटील, मुरलीधर ठाकूर, राजेश ठाकूर, संदीप पाटील, चंद्रकांत मुंबईकर, कृष्णा पाटील, महेंद्र मुंबईकर, सुहास मुंबईकर, विनायक मुंबईकर, विद्याधर मुंबईकर, अरविंद पाटील, विद्याधर म्हात्रे, प्रमोद पाटील, कैलासराजे घरत, दत्तात्रेय म्हात्रे आदी मान्यवर उपस्थित होते.

# कोतवाल नगरमध्ये सांस्कृतिक कार्यक्रम

- मुलांसाठी विविध स्पर्धेंचे आयोजन
- कार्यक्रमादरम्यान नवनिर्वाचित नगराध्यक्षा, नगरसेवकांचा सत्कार

**| कर्जत | प्रतिनिधी |**

दरवर्षी प्रमाणे यंदाही हुतात्मा कोतवाल नगरमध्ये सांस्कृतिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी विविध स्पर्धा देखील घेण्यात आल्या. तसेच, नगरपरिषदेच्या निवडणुकीत विजयी उमेदवारांचा सत्कार सोहळा पार पडला.

कर्जत तालुक्यातील कोतवाल नगरमध्ये सकाळी लहान मुलांची क्रीडा स्पर्धा घेण्यात आली. तर, दुपारनंतर महिलांच्या स्पर्धा घेण्यात आल्या. त्यात २ ते १२ वर्षांच्या मुलांसाठी धावणे, चमचा लिंबू, स्लो सायकलींग, तीन पाय शर्यत अशा स्पर्धा घेण्यात




आल्या. विजेत्यांना बक्षीस देण्यात आले. तसेच, महिलांसाठी स्लो सायकलिंग, धावणे, चमचा लिंबू, नेमबाजी, बादलीत चेंडू टाकने, फूगा फुगवून ग्लास उचलून पिरॅमिड तयार करणे, संगीत खुर्ची अश्या स्पर्धा घेण्यात आल्या. यावेळी नवनिर्वाचित कमिटीने योग्य प्रकारे कार्यक्रमाची रूपरेषा आखली होती. यादरम्यान, कर्जतच्या नवनिर्वाचित नगरसेवकांचा देखील सत्कार करण्यात आला. यावेळी नगराध्यक्षा पुष्पा दगडे, नगरसेवक संकेत भासे, वैभव सुरावकर, संतोष पाटील, नेहा शिंदे, अतुल कडू, मधुकर घारे, नितीन सावंत, भालचंद्र जोशी, स्वामिनी मांजरे आदींसह अध्यक्ष सतिश जाधव, उपाध्यक्ष अविनाश निगुडकर, सचिव विशाल बदडे, सहसचिव अनिल जाधव, खजिनदार आकशदीप शिवदे, संतोष भासे उपस्थित होते.

## माणगावात महा पोलीस डेमो भरती

**| माणगाव | प्रतिनिधी |**

जिजाऊ शैक्षणिक व सामाजिक संस्था महाराष्ट्र राज्य यांच्या विद्यमाने रायगड व सातारा जिल्हा यांच्या तर्फे माणगाव येथील अल्ताफ धनसे यांच्या मैदानावर रविवारी (दि.२८) मोफत महा पोलीस डेमो भरतीचे आयोजन करण्यात आले होते. या पोलीस डेमो भरतीत रायगड व सातारा जिल्ह्यातील विविध तालुक्यांतील, गावांतील सुमारे ३,२०० विध्यार्थ्यांनी उत्स्फूर्तपणे सहभाग घेतला होता. या डेमो भरतीत उंच उडी, लांब उडी, धावणे यांसारख्या स्पर्धा घेण्यात येऊन विद्यार्थ्यांना पोलीस भरतीसाठी उत्कृष्ठ असे प्रशिक्षण देण्यात येणार आहे. जिजाऊ संस्थेच्यावतीने घेण्यात आलेल्या या मोफत महा पोलीस डेमो भरतीचे उद्घाटन मंत्री भरत गोगावले व जिजाऊ संस्थेचे संस्थापक निलेश सांबरे यांच्याहस्ते करण्यात आले. या कार्यक्रमाला जिजाऊ संस्थेचे पदाधिकारी, कार्यकर्ते तसेच विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

पाच दिवस विविध कार्यक्रमांची मेजवानी | लहानांपासून थोरांपर्यंत मनोरंजनाची पर्वणी

# कनकेश्वर येथे लायन्स फेस्टिव्हलचे आयोजन

**| अलिबाग | प्रतिनिधी |**

अलिबाग-मांडवा मार्गावरील कनकेश्वर फाटा येथे लायन्स क्लब ऑफ अलिबाग-मांडवा यांच्यावतीने लायन्स फेस्टिव्हलचे आयोजन करण्यात आले आहे. हा महोत्सव ८ ते १२ जानेवारी या कालावधीत दररोज सायंकाळी ४ ते रात्री १० वाजेपर्यंत रंगणार असून, स्थानिकांसह पर्यटकांसाठी हे आकर्षणाचे केंद्र ठरणार आहे.

पाच दिवस चालणाऱ्या या महोत्सवात लहानांपासून थोरांपर्यंत सर्वांसाठी मनोरंजनाची पर्वणी असणार आहे. यामध्ये विविध खाद्यपदार्थांचे स्टॉल्स, गृहोपयोगी वस्तू, सौंदर्य प्रसाधने



आणि मुलांसाठी खास अम्युझमेंट पार्कचा समावेश आहे. विशेष म्हणजे आर. डी. सागवेकर ज्वेलर्स यांच्या सौजन्याने महोत्सवात दररोज लकी ड्रॉचे आयोजनही करण्यात आले आहे. महोत्सवाचा शुभारंभ ८ जानेवारी रोजी सायंकाळी ६ वाजता उद्घाटन सोहळ्याने होणार आहे. त्यानंतर रात्री साडेसात वाजता शालेय नृत्य स्पर्धा पार पडणार आहेत. ९ जानेवारी रोजी सायंकाळी ६ वाजता मराठमोळी झेड-फ्युजन आणि रात्री साडेसात वाजता दर्याभवानी हे ऐतिहासिक नाट्य सादर केले जाणार आहे. १० जानेवारी रोजी रात्री साडेसात वाजता शिवकालीन परंपरा हा आधुनिक फॅशनच्या जगातील मराठी संस्कृती जपणारा सोहळा रंगणार असून, याचे कोरिओग्राफर अशमीक कामठे आहेत. ११ जानेवारी रोजी रात्री साडेसात वाजता 'लायन्स मांडवा श्री २०२६' ही भव्य शरीरसौष्ठव स्पर्धा रंगणार आहे. महोत्सवाचा समारोप १२ जानेवारी रोजी रात्री साडेसात वाजता 'हेअर अँड ब्युटी ईल्युजन २०२६' या सौंदर्य स्पर्धेने होणार आहे. या संपूर्ण उपक्रमाला ग्रुप ग्रामपंचायत बोरीस-गुंजीस आणि अनुप मेहता अँड ग्रुप यांचे विशेष सहकार्य लाभले असून, जास्तीत जास्त नागरिकांनी या महोत्सवाचा आनंद घ्यावा, असे आवाहन आयोजकांनी केले आहे.

या महोत्सवाचे नेटके नियोजन फेस्टिवल अध्यक्ष नितीन अधिकारी आणि समन्वयक एमजेएफ अमिष शिरगावकर यांच्या मार्गदर्शनाखाली फेस्टिवल कमिटीद्वारे करण्यात येत आहे. या कमिटीमध्ये समन्वयक म्हणून प्रथम उप जिल्हा प्रांतपाल पीएमजेएफ प्रवीण सरनाईक, मुख्य समन्वयक माजी जिल्हा प्रांतपाल पीएमजेएफ अनिल जाधव, उपाध्यक्ष अभिजीत गुरव, सचिव धवल राऊत, खजिनदार सुधीर पुरो, क्लबचे अध्यक्ष ऋग्वेद ठाकूर, प्रथम उपाध्यक्ष हर्षद पाटील, रिजन चेअरपर्सन गिरीश म्हात्रे, झोन चेअरपर्सन डॉ. रेखा म्हात्रे आणि एलसीआयएफ समन्वयक एमजेएफ अरविंद घरत या अनुभवी टीमचा समावेश असून त्यांच्या देखरेखीखाली महोत्सवाची तयारी सुरू आहे.

# ग्रामीण कलाकारांना सदैव प्रोत्साहन

## महेंद्र घरत यांचे प्रतिपादन

**। चिरनेर । प्रतिनिधी ।**

गावोगावच्या नाट्य मंडळांना, ग्रामीण कलाकारांना प्रोत्साहन देण्यात मला आनंद वाटतो. क्रीडा क्षेत्राबरोबरच गावोगावी नाट्य चळवळ उभी करण्यासाठी मी प्रयत्न करीत राहीन. नाट्य प्रेम हे घरातील तसेच नाट्य रसिकांच्या प्रेमामुळे वाढते. नाटककार हसूराम पाटील, अशोक म्हात्रे, धनेश्वर म्हात्रे या कलाकारांनी ग्रामीण कलाकारांना सोबत घेऊन नाट्यकलेचा जागर मांडला आहे. ही मंडळी करत असलेले काम अत्यंत स्तुत्य असे आहे. ग्रामीण नाट्य संस्कृती पूर्वीप्रमाणे प्रत्येक गावागावात अभंग राहावी यासाठी मी प्रयत्नरत राहीन, असे प्रतिपादन आंतरराष्ट्रीय कामगार नेते महेंद्र घरत यांनी केले.



उरण तालुक्यातील वेशवे येथील रामनाथ मुंबईकर, जयश्री मुंबईकर, मनीष मुंबईकर, प्रज्ञा मुंबईकर,राज्वी मुंबईकर मुंबईकर या परिवाराच्या वतीने आणि अष्टगंध कला मंचाचे अध्यक्ष अशोक म्हात्रे यांच्या संकल्पनेतून व उद्योजक रमेश चिंतामण कोळी यांच्या निर्मितीतून, सत्यनारायणाच्या महापूजेनिमित्त हसूराम पाटील लिखित व धनेश्वर म्हात्रे, प्रसाद कडू दिग्दर्शित पैशाने तुटली नाती हा दोन अंकी नाट्यप्रयोग अष्टगंध कला मंचाच्या सादरीकरणातून गुरुवारी (दि.२५) सादर करण्यात आला. त्यावेळी महेंद्र घरत हे आपल्या मार्गदर्शनपर भाषणात बोलत होते.

याप्रसंगी सरपंच अजित पाटील, माजी सरपंच विलास पाटील, संदीप पाटील, चंद्रकांत मुंबईकर, कृष्णा पाटील, महेंद्र मुंबईकर, सुहास मुंबईकर, विनायक मुंबईकर, विद्याधर मुंबईकर, अरविंद पाटील, विद्याधर म्हात्रे, प्रमोद पाटील, दत्तात्रेय म्हात्रे, आदी मान्यवर उपस्थित होते. आनंद कुबल (मुंबई) यांचे संगीत तर राजा जोशी यांचे नेपथ्य, अमृत म्हात्रे यांची रंगभूषा होती. नाटकात हसूराम पाटील, कृष्णानाथ म्हात्रे, सुमित कुंभार, चेतन पाटील, रोशन घरत, अशोक म्हात्रे, दिगंबर कोळी, नवनीत माळी, जयकिशन मोकल, अलंकार कडू, वैशाली मोहिते, परेशा सरोदे, निकिता पाटील, शिल्पा काकडे आदी कलाकारांनी आपल्या अभिनयातून भूमिका बजावल्या. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन जयदास ठाकूर यांनी केले.

## वाचकांसाठी निवेदन

कृषीवल वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींची शहानिशा करुनच वाचकांनी संबंधितांशी व्यवहार करावेत. वर्तमानपत्रातून प्रसिद्ध जाहिरातीतील उत्पादने, सेवा किंवा त्यासंदर्भातील दावे यांची नागेश पब्लिशर्स प्रा. लि. कोणतीही हमी घेत नाही. त्या मजकुराच्या अथवा दाव्याच्या पूर्ततेसंदर्भातील कोणतीही जबाबदारी नागेश पब्लिशर्स प्रा.लि.चे मुद्रक, प्रकाशक, संपादक किंवा मालक यांच्यावर राहणार नाही, याची कृपया वाचकांनी नोंद घ्यावी.

- मुख्य संपादक

# हिंदूंवरील अत्याचाराविरुद्ध सकल हिंदू समाज आक्रमक

## कोलाड पोलिसांना निवेदन



**। कोलाड । प्रतिनिधी ।**

बांगलादेशात हिंदू समाजावर होणारे अत्याचार, हिंदूंची घरे-दुकाने जालने दिपु चंद्रदास या हिंदू तरुणाची कट्टर नक्षलवाद्यांनी केलेली निर्घृण हत्या या घटनेच्या निषेधार्थ सकल हिंदू समाज कोलाडमार्फत कोलाड पोलीस ठाण्याचे सपोनि नितीन मोहिते यांना या घटना रोखण्यासाठी राजकीय हस्तक्षेप व आंतरराष्ट्रीय दबाव टाकण्यात यावा, अशी मागणी करण्यासाठी निवेदन देण्यात आले.

बांगलादेशात सातत्याने होणारा हिंदूविरोधी हिंसाचार थांबविण्यासाठी भारत सरकारने आता ठोस पावले उचलणे गरजेचे असून, सरकाने त्वरित अंमलबजावणी करावी. बांगलादेशावर तात्काळ आर्थिक, व्यापारीक व राजनैतिक निर्बंध घालावे. बांगलादेशामधील कट्टरतावादी गटांविरुद्ध कठोर आंतरराष्ट्रीय कार्यवाई करण्यात यावी अशी आग्रहाची मागणी सकल हिंद समाजाची आहे. भारताने जागतिक स्तरावर दबाव आणून बांगलादेशातील हिंदूंचे रक्षण करावे. बांगलादेशात सातत्याने होणारा हिंदूविरोधी हिंसाचार थांबविण्यासाठी भारत सरकारने आता ठोस पावले उचलणे गरजेचे आहे, असे आंबेवाडी नाका येथे कोलाड पोलिस ठाण्याचे सपोनि नितीन मोहिते यांना दिलेल्या निवेदनात सांगण्यात आले आहे.

यावेळी आंबेवाडी नाका येथे रायगड भुषण हभप मारुती महाराज यांनी आपली प्रतिक्रिया व्यक्त करताना सांगितले की, कळत न कळत का होईना, आपल्या दृष्टीने अतिशय भयंकर गोष्ट आहे. वास्तविक पाहता, या हिंदुत्वावर आघात होणे म्हणजे आपल्या हिंदू देशावर संकट म्हणावे लागेल, यासाठी आपण सर्वांनी सक्षम होणे गरजेचे आहे.

# शरद बुलगे यांचे निधन



**। जालना । प्रतिनिधी ।**

येथील पत्रकार महेश बुलगे यांचे वडील शरद त्रिंबक बुलगे (८०) यांचे शुक्रवारी (दि. २६) सायंकाळी निधन झाले. त्यांची अंत्ययात्रा शनिवार (दि. २७) रोजी सकाळी १० वाजता त्यांच्या शिवनगर येथील निवासस्थानापासून निघाली. रामतीर्थ स्मशानभूमीत त्यांच्या पार्थिवावर अंत्यसंस्कार करण्यात आले. त्यांच्या पश्चात पत्नी, दोन मुले, दोन मुली, सुना, जावई आणि नातवंडे असा मोठा परिवार आहे.

# शहरात स्थिर सर्वेक्षण पथक तैनात



## वाहनांची कसून तपासणी

**। पनवेल । प्रतिनिधी ।**

पनवेल महानगरपालिका सार्वत्रिकनिवडणुकीच्यापार्श्वभूमीवर निवडणूक आयोगाच्या निर्देशानुसार स्थिर सर्वेक्षण पथके पनवेल शहर व परिसरातील विविध भागांत तैनात करण्यात आली आहेत. निवडणूक प्रक्रियेत पारदर्शकता राखण्यासाठी ये-जा करणाऱ्या वाहनांची कसून तपासणी करण्यात येत असून, कोणाकडून बेकायदेशीररित्या रोख रक्कम, मौल्यवान वस्तू अथवा प्रचार साहित्य वाहून नेले जात आहे का, यावर विशेष लक्ष ठेवले जात आहे.

कर्नाळा स्पोर्ट्स अकॅडमीसमोर, जेएनपीटीएनएच-४ महामार्गावर स्थिर तपासणीसाठी तात्पुरता मंडप उभारण्यात आला असून, या ठिकाणी निवडणूक अधिकारी, कर्मचारी व पोलीस दलाचा कडक बंदोबस्त तैनात करण्यात आला आहे. प्रत्येक वाहनाची सखोल तपासणी केली जात असून संशयास्पद बाबी आढळल्यास तात्काळ कारवाई करण्यात येत आहे.

दरम्यान, महामार्गावरील वाहतूक आणि सुरू असलेल्या कामांमुळे उडणाऱ्या धुळीचा त्रास तपासणी पथकातील अधिकारी व कर्मचाऱ्यांना सहन करावा लागत आहे. तरीही निवडणूक कर्तव्य पार पाडण्यासाठी अधिकारी आपले काम जबाबदारीने बजावत असल्याचे चित्र आहे. निवडणूक प्रक्रिया शांततेत, निर्भय आणि निष्पक्ष पार पडावी यासाठी प्रशासन सज्ज आहे.


# ऐश्वर्य ज्वेल कलेक्शन

१ ग्रॅम सोन्याचे प्लेटींग
दागिने नविन डिझाइन्स



मोत्याचे दागिने- तन्मणी, चींचपेटी, बांगड्या, बाजुबंद. गॅरंटीचे दागिने- मंगळसूत्र, बांगड्या, पाटल्या, हार, माळ. डायमंड- कुंदन- पोलकी-सेट- मॅचिंग बांगड्या- कानातले. सर्व नामांकित कंपन्यांची कॉस्मेटीक्स, परफ्यूम, डीओ. वाजवी भाव आणि भरपूर व्हरायटीसाठी प्रसिद्ध दुकान.

**२/१२ पी.एन.पी. नगर, अलिबाग.**
**मोबाईल : ९८६०६५८५६५**


## कोकण रेल्वे कॉर्पोरेशन लिमिटेड
**(भारत सरकारचा उपक्रम)**

सादर सेवा

### निविदा अधिसूचना

उप मुख्य अभियंता (कार्य), कोकण रेल्वे कॉर्पोरेशन लिमिटेड, रत्नागिरी, पात्र कंत्राटदारांकडून खालील कामासाठी आयआरईपीएस पोर्टलवर ई-निविदा प्रणालीद्वारे एकल लिफाफा बोली पद्धतीने खुल्या निविदा मागवित आहे: **कामाचे नाव:** महाराष्ट्र राज्यातील कोकण रेल्वेच्या रत्नागिरी विभागात सावर्डा–आरवली रोड स्थानकांदरम्यान किमी. 148/600 ते 149/100 दरम्यान आगवे कटिंगमध्ये कॅच वॉटर व बर्म ड्रेन्सचे बांधकाम करणे. **निविदा अधिसूचना क्रमांक: केआर-आरएन-डिव्हायसीईडब्ल्यू-एजीएवीईसीडी-13ए-25 दिनांक: 29/12/2025**, **एकूण अंदाजित खर्च:** ₹ 47,82,900.82/- (जीएसटी वगळून) **निविदा सुरू होण्याची तारीख:** 05/01/2026, **निविदा बंद होण्याची तारीख व वेळ:** 19/01/2026 रोजी दुपारी 15:00 वाजेपर्यंत ऑनलाईन बोली/ऑफर सादर करता येतील. **काम पूर्ण करण्याची मुदत:** 12 महिने. हस्तलिखित प्रस्ताव स्वीकारले जाणार नाहीत. तपशील व सहभागासाठी कृपया https://www.ireps.gov.in या संकेतस्थळास भेट द्या. सर्व सुधारणा/परिशिष्टे याच संकेतस्थळावर प्रसिद्ध केली जातील.

## HIGH-POWERED SALE COMMITTEE
**(CONSTITUTED BY THE HON'BLE SUPREME COURT OF INDIA)**
**Office Address: 4th Floor, Plot No. 226, A-2, Sector-17, Dwarka, New Delhi - 110075**
**Telephone - 011-40073576**

### PUBLIC NOTICE

NOTICE OF SALE FOR E-AUCTION OF IMMOVABLE PROPERTIES OF SAI PRASAD GROUP OF COMPANIES

1. The High-Powered Sale Committee has been constituted by the Hon'ble Supreme Court of India vide order dated 15 July 2024 passed in Writ Petition (Crl) No.546 of 2023 in the matter of Balasaheb Keshavrao Bhapkar & Ors. Vs Securities and Exchange Board of India.

The Committee has been constituted to liquidate the assets of Sai Prasad Group of companies in line with directions of the Supreme Court vide order dated 19.02.2025 (para 5 (iii)) by way of e-auction of 9 properties located in Maharashtra (8 properties in Solapur, 1 in Raigarh) and consequently issued Request for Proposals (RFP) which can be accessed along with property documents at:

www.bankauctionwizard.com

www.hpsc-saiprasad.com

2. Details for participation in e-auction are available in RFP. Key dates of RFP are as follows:

- Date of Publication of RFP – 24th December, 2025
- Bid Due Date and Time for RFP – 14th January, 2026 till 4.00 PM
- Start Date/Time of e-Auction – 23rd January, 2026 at 11.00 AM

**APPLICABLE CONDITIONS:**

3. All properties will be sold on an "as is, where is, whatever there is" basis and the purchaser will be responsible for all claims, liabilities and / or encumbrances relating thereto.

4. The details of the Properties as stated in this Notice and the RFP under this Tender Document are as per the details made available to the Seller and neither the Seller nor the Agency shall, in any way, be responsible for any variation in the extent of the Properties due to any reason.

5. The committee will in no manner be responsible for any discrepancy in the properties / their title deeds and bidders are requested to submit their bids only after conducting their own independent due diligence exercise with respect to the title to the properties.

6. The interested bidders who require assistance may contact on email id: hpsc.saiprasad@stockholdingdms.com or Ms. Snehal Patil, Deputy Manager, Stock Holding DMS 022-61778742

**CBC 15204/11/0214/2526**

## जाहीर सूचना

ह्याद्वारे नोटीस देण्यात येते की, आमच्या अशिलाने आम्हाला खालील **पहिल्या परिशिष्टात** नमूद केलेल्या व्यक्तींचे (येथून पुढे ज्यांचा उल्लेख **"मालक"**असा केला आहे) सदर पहिल्या परिशिष्टात त्यांच्या नावासमोर नमूद केलेल्या जमिनींचे मालकी हक्क, अधिकार आणि हितसंबंध तपासण्याचे निर्देश दिले आहेत. सदर जमिनीचे एकूण क्षेत्रफळ १७४.२९ एकर म्हणजेच सुमारे ७,०५,३३० चौरस मीटर किंवा त्यासुमारास असून, त्यामध्ये तालुका पनवेल, जिल्हा रायगड येथील गावे शेडुंग, कसळखंड, आष्टे आणि खानवळे येथील ६९ गट क्रमांकांचा समावेश आहे (**"सदर जमीन"**).

मालकांनी आमच्या अशिलाला असे कळविले आहे/निवेदन केले आहे की, सदर जमिनीशी/त्याच्या भागाशी संबंधित, जशी परिस्थिती असेल तसे, काही मूळ हक्क दस्तऐवज, जे खालील **दुसऱ्या परिशिष्टात** नमूद केले आहेत (**"गहाळ झालेली मूळ हक्क कागदपत्रे/दस्तऐवज"**), ते गहाळ झाले आहेत / हरवले आहेत आणि मालकांकडे उपलब्ध नाहीत. मालकांनी आमच्या अशिलाला असेही कळविले आहे की, सदर गहाळ झालेली मूळ हक्क कागदपत्रे मालकांनी कोणत्याही व्यक्ती किंवा व्यक्तींकडे, सदर जमिनीवर किंवा तिच्या कोणत्याही भागावर बोजा / गहाण / सुरक्षा निर्माण करण्याच्या उद्देशाने किंवा सुरक्षिततेसाठी किंवा अन्य कोणत्याही प्रकारे जमा केलेली नाहीत.

सर्व व्यक्ती ज्यांचा मालकांवर किंवा त्यांच्यापैकी कोणावरही, किंवा सदर जमिनीवर किंवा तिच्या कोणत्याही भागावर किंवा त्यावरील कोणत्याही एफएसआय किंवा विकास क्षमतेवर किंवा त्यावरील कोणत्याही बांधकामावर, विक्री, हस्तांतरण, वाटप, अदलाबदल, असाइनमेंट (हक्क सोपवणे), भाडेपट्टा, पोट-भाडेपट्टा, कुळवहिवाट, पोट-कुळवहिवाट, लिव्ह अँड लायसन्स, परवाना, गहाण, वारसाहक्क, हिस्सा, बक्षीस, धारणाधिकार, बोजा, निर्वाह, सुखभोग, न्यास, मृत्युपत्र, मृत्यूपत्राद्वारे देणगी, लाभार्थी/यांचे, ताबा, हक्कसोड, त्यागपत्राद्वारे किंवा इतर कोणत्याही पद्धतीद्वारे किंवा कोणताही करार, कंत्राट, दस्तऐवज, दस्तावेज, लेख, खरेदीखत, विकास करार, हेतू पत्र, इच्छापत्र, मृत्युपत्र व्यवस्था, उत्तराधिकार, कौटुंबिक व्यवस्था / समझोता, दावा, हुकूमनामा किंवा कोणत्याही न्यायालयाचा आदेश, किंवा बोजा किंवा अन्यथा कोणत्याही प्रकारे कोणताही हिस्सा, हक्क, अधिकार, मालमत्ता, दावा, हरकत, मागणी आणि/किंवा हितसंबंध असेल किंवा तसा दावा करत असतील, त्यांनी सदर बाबी लेखी स्वरूपात आणि कागदोपत्री पुराव्यासह खाली सही करणाऱ्यांना त्यांच्या कार्यालयात **वाडिया घांदी अँड कंपनी, ॲडव्होकेट्स अँड सॉलिसिटर्स, २ रा मजला, एन. एम. वाडिया बिल्डिंग, १२३ एम. जी. रोड, फोर्ट, मुंबई – ४००००१** येथे आणि denzil.arambhan@wadiaghandy.com आणि keyuri.gandhi@wadiaghandy.com या ईमेलवर, ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १४ दिवसांच्या आत कळविणे आवश्यक आहे. तसे न केल्यास, असा कोणताही कथित दावा, हक्क, अधिकार, मालमत्ता किंवा हितसंबंध आमच्या अशिलाद्वारे विचारात घेतला जाणार नाही आणि तो सोडून दिला आहे किंवा त्याचा त्याग केला आहे असे मानले जाईल.

सदर गहाळ झालेली मूळ हक्क कागदपत्रे / दस्तऐजांपैकी कोणत्याही कागदपत्रांबद्दल माहिती असलेल्या कोणत्याही व्यक्तीने किंवा सदर गहाळ झालेल्या मूळ हक्क कागदपत्रांपैकी कोणत्याही कागदपत्राचा ताबा किंवा ताबा असल्याचे सांगणाऱ्या कोणत्याही व्यक्तीने, त्याबाबतची नोटीस लेखी स्वरूपात कागदोपत्री पुराव्यासह आम्हाला denzil.arambhan@wadiaghandy.com आणि keyuri.gandhi@wadiaghandy.com या ईमेलवर पाठवणे आवश्यक आहे, तसेच सदर गहाळ झालेले मूळ हक्क दस्तऐवज अशा व्यक्तींच्या ताब्यात किंवा नियंत्रणात का आहेत याचे कारण (जशी परिस्थिती असेल तसे) नमूद करणे आवश्यक आहे.

### पहिले परिशिष्ट
*(सदर जमिनीचा तपशील)*

जमिनीचे सर्व तुकडे आणि भाग ज्यांचे एकूण मोजमाप १७४.२९ एकर म्हणजेच सुमारे ७,०५,३३० चौरस मीटर, जी गावे शेडुंग, कसळखंड, आष्टे आणि खानवळे, तालुका पनवेल, जिल्हा रायगड, महाराष्ट्र येथे स्थित आहेत, ज्याचा अधिक तपशील खालीलप्रमाणे आहे:

| अनु. क्र. | गट क्र. | क्षेत्रफळ (चौरस मीटर) | मालक |
|---|---|---|---|
| | | **गाव शेडुंग** | |
| १. | ६९/१ | ९,११० | मिथुल सुधीर शेट्टी |
| २. | ७२/१ | २,४४० | |
| ३. | ७२/२ | २,२५० | |
| ४. | ७३ | १,११० | |
| ५. | ७४ | ३,८७० | |
| ६. | ७५ | २,४३० | |
| ७. | ७७ | २५० | |
| ८. | ७८ | ४,१०० | |
| ९. | ७९/१ | १,२०० | |
| १०. | ७९/२ | १,००० | |
| ११. | ८० | ४,४५० | |
| १२. | ८१ | ३,९०० | |
| १३. | ९२अ/२ | ९,७०० | |
| १४. | ९२अ/४ | ५३,६७० | |
| १५. | ८३/१ | ३,४३० | (i) लता सुधीर शेट्टी, (ii) पवन सुधीर शेट्टी, (iii) मिथुल सुधीर शेट्टी, (iv) श्रद्धा सुधीर शेट्टी आणि (v) श्रुती सुधीर शेट्टी. |
| १६. | ८३/२ | ४०० | |
| १७. | ८४/५/१ | २,००० | |
| १८. | ८४/५/२/१ | ७०० | |
| १९. | ८४/६ | ६०० | |
| २०. | ८५ | ५८० | |
| २१. | ९२/२/३ | ४४,७०० | |
| २२. | ९२अ/३ | ३,७०० | सुधीर वासू शेट्टी |
| २३. | ९५ | २,४१,८०० | (i) सुधीर वासू शेट्टी आणि (ii) लता सुधीर शेट्टी |
| | | **गाव कसळखंड,** | |
| २४. | ७६ | ४,२०० | पवन सुधीर शेट्टी |
| २५. | ७७ | १४,३०० | |
| २६. | ७८ | ९,६०० | |
| २७. | ८० | १३,६०० | |
| २८. | ८१ | ४,८०० | |
| २९. | ८२ | ५,५०० | |
| ३०. | ८३ | ४,९०० | |
| ३१. | ८४/१ | ४,००० | |
| ३२. | ८४/२ | १२,३९० | |
| ३३. | ८४/३ | २,०५० | |
| ३४. | ८५ | २,७०० | |
| ३५. | ८६ | १,५०० | |
| ३६. | ८७/१ | ५,६०० | |
| ३७. | ८८ | १,९०० | |
| ३८. | ८९ | ८,८५० | |
| ३९. | ९० | ६,००० | |
| ४०. | ९१ | ५,६०० | |
| ४१. | ९२ | ७,४०० | |
| ४२. | ९३ | ७,००० | |
| ४३. | ९४ | १२,१०० | |
| ४४. | ९८ | ६,८०० | |
| ४५. | ९९ | ४,००० | |
| ४६. | १०१ | २,२०० | |
| ४७. | १०२ | ११,१०० | |
| ४८. | १०३ | २,५०० | |
| ४९. | १०५/१ | ४,३८० | |
| ५०. | १०५/२ | ४,७०० | |
| ५१. | १०६ | ३,४०० | |
| ५२. | १०७ | ९,७०० | |
| ५३. | १०८ | ९,३०० | |
| ५४. | १०९/१ | ५,३०० | |
| ५५. | १०९/३ | ३,५०० | |
| ५६. | १०४ | २,८०० | मिथुल सुधीर शेट्टी |
| | | **गाव आष्टे** | |
| ५७. | १३/१ | १,७०० | श्रुती सुधीर शेट्टी आणि श्रद्धा सुधीर शेट्टी |
| ५८. | १३/२ | २,३०० | |
| ५९. | १४ | ५,३०० | |
| ६०. | १५ (भाग) | ३,१०० | |
| ६१. | १६ | ९,७०० | |
| ६२. | १७ | ७,७०० | |
| ६३. | १९ | ६,४०० | |
| ६४. | २० | १०,४०० | |
| ६५. | २१ | ९,१०० | |
| ६६. | २२ | १८,७०० | |
| ६७. | २३ | ३,३०० | |
| ६८. | २४ | २०,९०० | |
| | | **गाव खानवळे** | |
| ६९. | ११६/१/ब | ५,६७० | मिथुल सुधीर शेट्टी |
| | **एकूण क्षेत्रफळ:** | **७,०५,३३० चौरस मीटर** | |

### दुसरे परिशिष्ट
*(गहाळ झालेल्या मूळ हक्क कागदपत्रांचा/दस्तऐवजांचा तपशील)*

**अ. गाव शेडुंगच्या संदर्भात:**

१. गट क्र. ७९/१ च्या संदर्भात ज्ञानेश्वर सखाराम लहाने यांनी निष्पादित केलेले दिनांक २१ मार्च २०१८ रोजीचे विक्री प्रमाणपत्र (Sale Certificate), ज्याचा नोंदणी क्रमांक पनवेल – १ / २९६७ सन २०१८ असा आहे;

२. गट क्र. ८० च्या संदर्भात राधाबाई केरू गावडे, मुक्ताबाई कुंडलिक म्हात्रे आणि यमुना लक्ष्मण घरत यांनी जगन्नाथ मुल्या लहाने आणि धनाजी मुल्या लहाने यांच्या लाभात निष्पादित केलेले दिनांक ६ जानेवारी २००५ रोजीचे हक्कसोड पत्र, जे दुय्यम निबंधक कार्यालय, पनवेल येथे अनुक्रमांक २६१ अन्वये नोंदणीकृत आहे;

३. गट क्र. ८० च्या संदर्भात शेवंताबाई नामदेव भोईर यांनी जगन्नाथ मुल्या लहाने आणि धनाजी मुल्या लहाने यांच्या लाभात निष्पादित केलेले दिनांक ११ जानेवारी २००५ रोजीचे हक्कसोड पत्र, जे दुय्यम निबंधक कार्यालय, पनवेल येथे अनुक्रमांक २६२ अन्वये नोंदणीकृत आहे;

४. गट क्र. ८३/१ च्या संदर्भात मुल्या नाना लहाने यांनी सुधीर वासू शेट्टी यांच्या लाभात निष्पादित केलेला दिनांक २४ डिसेंबर १९८७ रोजीचा साठेखत, जो दुय्यम निबंधक कार्यालय, पनवेल येथे अनुक्रमांक १३७१ अन्वये नोंदणीकृत आहे;

५. गट क्र. ८३/१ च्या संदर्भात मुल्या नाना लहाने यांनी सुधीर व्ही. शेट्टी फॅमिली ट्रस्टच्या लाभात निष्पादित केलेले दिनांक ३१ जानेवारी १९९१ रोजीचे खरेदीखत जे दुय्यम निबंधक कार्यालय, पनवेल – १ येथे सन १९९१ च्या अनुक्रमांक ३७८ अन्वये नोंदणीकृत आहे;

६. गट क्र. ८३/२ आणि ८५ च्या संदर्भात बाबुराव पांडुरंग लहाने आणि जानकू पांडू लहाने यांनी सुधीर वासू शेट्टी यांच्या लाभात निष्पादित केलेला दिनांक ४ जानेवारी १९८८ रोजीचा साठेखत, जो दुय्यम निबंधक कार्यालय, पनवेल येथे सन १९८८ च्या अनुक्रमांक ९१८८ अन्वये नोंदणीकृत आहे;

७. गट क्र. ८३/२ आणि ८५ च्या संदर्भात बाबुराव पांडुरंग लहाने आणि जानकूबाई पांडू लहाने यांनी सुधीर व्ही. शेट्टी फॅमिली ट्रस्टच्या लाभात निष्पादित केलेले दिनांक ३१ जानेवारी १९९१ रोजीचे खरेदीखत जे दुय्यम निबंधक कार्यालय, पनवेल – १ येथे सन १९९१ च्या अनुक्रमांक ३७७ अन्वये नोंदणीकृत आहे;

८. गट क्र. ८४/५/१ च्या संदर्भात धर्मा नारायण राणे यांनी सुधीर वासू शेट्टी यांच्या लाभात निष्पादित केलेला दिनांक २४ डिसेंबर १९८७ रोजीचा साठेखत, जो दुय्यम निबंधक कार्यालय, पनवेल येथे अनुक्रमांक १३७३ अन्वये नोंदणीकृत आहे;

९. गट क्र. ८४/५/१ च्या संदर्भात धर्मा नारायण राणे यांनी सुधीर व्ही. शेट्टी फॅमिली ट्रस्टच्या लाभात निष्पादित केलेले दिनांक ३१ जानेवारी १९९१ रोजीचे खरेदीखत जे दुय्यम निबंधक कार्यालय येथे अनुक्रमांक ३७९ अन्वये नोंदणीकृत आहे;

१०. गट क्र. ८४/५/पार्ट/२ च्या संदर्भात मारुती पांडू पाटील आणि बळीराम पांडू पाटील यांनी सुधीर व्ही. शेट्टी फॅमिली ट्रस्टच्या लाभात निष्पादित केलेले दिनांक ३१ जानेवारी १९९१ रोजीचे खरेदीखत जे दुय्यम निबंधक कार्यालय येथे सन १९९१ च्या अनुक्रमांक ३८६ अन्वये नोंदणीकृत आहे;

११. गट क्र. ८४/६ च्या संदर्भात नामदेव रामा लहाने यांनी सुधीर व्ही. शेट्टी यांच्या लाभात निष्पादित केलेला दिनांक २४ डिसेंबर १९८७ रोजीचा साठेखत, जो दुय्यम निबंधक कार्यालय येथे सन १९८७ च्या अनुक्रमांक १३७२ अन्वये नोंदणीकृत आहे;

१२. जमीन गट क्र. ८४/६ च्या संदर्भात नामदेव रामा लहाने यांनी सुधीर व्ही. शेट्टी फॅमिली ट्रस्टच्या लाभात निष्पादित केलेले दिनांक २५ मार्च १९९१ रोजीचे खरेदीखत जे दुय्यम निबंधक कार्यालय येथे अनुक्रमांक १०९२ अन्वये नोंदणीकृत आहे;

१३. गट क्र. ८३/२ आणि गट क्र. ८५ च्या संदर्भात बाबुराव पांडुरंग लहाने आणि जानकूबाई पांडू लहाने यांनी सुधीर व्ही. शेट्टी फॅमिली ट्रस्टच्या लाभात निष्पादित केलेले दिनांक ३१ जानेवारी १९९१ रोजीचे खरेदीखत जे दुय्यम निबंधक कार्यालय, पनवेल–१ येथे सन १९९१ च्या अनुक्रमांक ३८३ अन्वये नोंदणीकृत आहे;

१४. गट क्र. ९२/२(२) च्या संदर्भात वसंत लक्ष्मीनारायण भट्ट यांनी सुधीर शेट्टी फॅमिली ट्रस्टच्या लाभात निष्पादित केलेले दिनांक २१ जुलै १९८३ रोजीचे फरोक्तखत जे दुय्यम निबंधक कार्यालय, पनवेल येथे सन १९८३ च्या अनुक्रमांक ४४० अन्वये नोंदणीकृत आहे; आणि

१५. गट क्र. ९५ च्या संदर्भात जानकूबाई धोंडू दुर्गे आणि इतर यांनी सुधीर वासू शेट्टी यांच्या लाभात निष्पादित केलेले दिनांक ९ एप्रिल १९९२ रोजीचे खरेदीखत जे दुय्यम निबंधक कार्यालय, पनवेल येथे सन १९९२ च्या अनुक्रमांक १०५० अन्वये नोंदणीकृत आहे.

**ब. मौजे कसलखंडच्या संदर्भात:**

१. गट क्र. ७७ च्या संदर्भात (अ) नामदेव कोंडू पाटील आणि (ब) तुकाराम कोंडू पाटील यांनी पवन सुधीर शेट्टी यांच्या लाभात निष्पादित केलेले दिनांक १९ जानेवारी १९९५ रोजीचे खरेदीखत जे दुय्यम निबंधक कार्यालय, पनवेल येथे सन १९९५ च्या अनुक्रमांक २६० अन्वये नोंदणीकृत आहे;

२. गट क्र. ७८ च्या संदर्भात गणपत भिवा पाटील आणि इतर यांनी पवन सुधीर शेट्टी यांच्या लाभात निष्पादित केलेले दिनांक २८ फेब्रुवारी १९९५ रोजीचे खरेदीखत जे दुय्यम निबंधक कार्यालय, पनवेल येथे सन १९९५ च्या अनुक्रमांक ७५६ अन्वये नोंदणीकृत आहे;

३. गट क्र. ८० च्या संदर्भात पंढरीनाथ पांडुरंग पाटील यांनी पवन सुधीर शेट्टी यांच्या लाभात निष्पादित केलेले दिनांक १ जून १९९५ रोजीचे खरेदीखत जे दुय्यम निबंधक कार्यालय, पनवेल येथे सन १९९५ च्या अनुक्रमांक २१४२ अन्वये नोंदणीकृत आहे;

४. गट क्र. ८१ आणि १०६ च्या संदर्भात चंदर रामा पाटील आणि इतर यांनी पवन सुधीर शेट्टी यांच्या लाभात निष्पादित केलेले दिनांक २५ जानेवारी १९९५ रोजीचे खरेदीखत जे दुय्यम निबंधक कार्यालय, पनवेल येथे सन १९९५ च्या अनुक्रमांक ३५१ अन्वये नोंदणीकृत आहे;

५. गट क्र. ८२ च्या संदर्भात अनंता बाळकृष्ण पाटील आणि इतर यांनी पवन सुधीर शेट्टी यांच्या लाभात निष्पादित केलेले दिनांक १४ मार्च १९९५ / १६ मार्च १९९५ रोजीचे खरेदीखत जे दुय्यम निबंधक कार्यालय, पनवेल येथे सन १९९५ च्या अनुक्रमांक ९९९ अन्वये नोंदणीकृत आहे;

६. गट क्र. ८४ (भाग) च्या संदर्भात वामन जगन्नाथ पाटील आणि इतर यांनी पवन सुधीर शेट्टी यांच्या लाभात निष्पादित केलेले दिनांक १५ / १६ मार्च १९९५ रोजीचे खरेदीखत जे दुय्यम निबंधक कार्यालय, पनवेल येथे सन १९९५ च्या अनुक्रमांक ९९८ अन्वये नोंदणीकृत आहे;

७. गट क्र. ८४ (भाग) च्या संदर्भात वामन जगन्नाथ पाटील आणि इतर यांनी पवन सुधीर शेट्टी यांच्या लाभात निष्पादित केलेले दिनांक १५ / १६ मार्च १९९५ रोजीचे खरेदीखत जे दुय्यम निबंधक कार्यालय, पनवेल येथे सन १९९५ च्या अनुक्रमांक ९९७ अन्वये नोंदणीकृत आहे;

८. गट क्र. ८६ च्या संदर्भात चंद्रभागा हरिभाऊ नाईक आणि अन्य एक यांनी पवन सुधीर शेट्टी यांच्या लाभात निष्पादित केलेले दिनांक १९ जानेवारी १९९५ रोजीचे खरेदीखत जे दुय्यम निबंधक कार्यालय, पनवेल येथे सन १९९५ च्या अनुक्रमांक २६२ अन्वये नोंदणीकृत आहे;

९. गट क्र. ८८ च्या संदर्भात तुळशीराम वेटू पाटील यांनी पवन सुधीर शेट्टी यांच्या लाभात निष्पादित केलेले दिनांक १४ / २२ मार्च १९९५ रोजीचे खरेदीखत जे दुय्यम निबंधक कार्यालय, पनवेल येथे सन १९९५ च्या अनुक्रमांक १०८६ अन्वये नोंदणीकृत आहे;

१०. गट क्र. ८९ च्या संदर्भात प्रल्हाद रघुनाथ पाटील आणि इतर यांनी पवन सुधीर शेट्टी यांच्या लाभात निष्पादित केलेले दिनांक ३० जानेवारी १९९५ रोजीचे खरेदीखत जे दुय्यम निबंधक कार्यालय, पनवेल येथे सन १९९५ च्या अनुक्रमांक ४१८ अन्वये नोंदणीकृत आहे;

११. गट क्र. ९० च्या संदर्भात तुकाराम पांडुरंग पाटील आणि इतर यांनी पवन सुधीर शेट्टी यांच्या लाभात निष्पादित केलेले दिनांक ४ जानेवारी १९९५ रोजीचे खरेदीखत जे दुय्यम निबंधक कार्यालय, पनवेल येथे सन १९९५ च्या अनुक्रमांक ४८३ अन्वये नोंदणीकृत आहे;

१२. गट क्र. ९२ आणि १०१ च्या संदर्भात बाळाराम गोपाळ पाटील आणि इतर यांनी पवन सुधीर शेट्टी यांच्या लाभात निष्पादित केलेले दिनांक ८ जानेवारी १९९५ रोजीचे खरेदीखत जे दुय्यम निबंधक कार्यालय, पनवेल येथे सन १९९५ च्या अनुक्रमांक ५५७ अन्वये नोंदणीकृत आहे;

१३. गट क्र. ९४ च्या संदर्भात बाळकृष्ण अमृता पाटील आणि इतर यांनी पवन सुधीर शेट्टी यांच्या लाभात निष्पादित केलेले दिनांक १९ जानेवारी १९९५ रोजीचे खरेदीखत जे दुय्यम निबंधक कार्यालय, पनवेल येथे सन १९९५ च्या अनुक्रमांक २६१ अन्वये नोंदणीकृत आहे; आणि

१४. गट क्र. १०२ च्या संदर्भात (i) नामदेव कोंडू पाटील आणि (ii) तुकाराम कोंडू पाटील यांनी पवन सुधीर शेट्टी यांच्या लाभात निष्पादित केलेले दिनांक १९ जानेवारी १९९५ रोजीचे खरेदीखत जे दुय्यम निबंधक कार्यालय, पनवेल येथे सन १९९५ च्या अनुक्रमांक २५९ अन्वये नोंदणीकृत आहे.

**क. मौजे आष्टेच्या संदर्भात:**

१. इतर बाबींसह (inter-alia) गट क्र. १३/१ च्या संदर्भात शांताबाई शंकर पवार, सुंदराबाई हिरू ससे आणि इंदूबाई नथू गोजे यांनी सीताराम नथू गोजे यांच्या लाभात निष्पादित केलेले दिनांक १९ जुलै २००६ रोजीचे हक्कसोड पत्र, जे दुय्यम निबंधक कार्यालय, पनवेल-३ येथे सन २००६ च्या अनुक्रमांक ५२४९ अन्वये नोंदणीकृत आहे;

२. गट क्र. १४ च्या संदर्भात दत्तात्रय पंढरीनाथ पाटील आणि इतर यांनी (अ) शब्बीर गुलाम हुसैन मोरीबीवाला आणि (ब) अशोक रामनाथ सरना यांच्या लाभात निष्पादित केलेले दिनांक २२ सप्टेंबर १९८८ रोजीचे खरेदीखत जे दुय्यम निबंधक कार्यालय, पनवेल येथे सन १९८८ च्या अनुक्रमांक १२७८ अन्वये नोंदणीकृत आहे;

३. गट क्र. १४, १६, १७ आणि १९ च्या संदर्भात (अ) शब्बीर गुलाम हुसैन मोरीबीवाला आणि (ब) अशोक रामनाथ सरना यांनी प्रकाश विनायक देसाई आणि इतर यांच्या लाभात निष्पादित केलेले दिनांक ३० नोव्हेंबर १९९९ रोजीचे फरोक्तखत जे दुय्यम निबंधक कार्यालय, पनवेल येथे सन १९९९ च्या अनुक्रमांक ३८९४ अन्वये नोंदणीकृत आहे;

४. दिनांक २३ जून २०२२ रोजीचे वाटप पत्र जे दुय्यम निबंधक कार्यालय, पनवेल येथे सन २०२२ च्या अनुक्रमांक ८०६४ अन्वये नोंदणीकृत आहे;

५. गट क्र. १६ च्या संदर्भात हिरू कानू पाटील यांनी (अ) शब्बीर गुलाम हुसैन मोरीबीवाला आणि (ब) अशोक रामनाथ सरना यांच्या लाभात निष्पादित केलेले दिनांक २२ सप्टेंबर १९८८ रोजीचे खरेदीखत जे दुय्यम निबंधक कार्यालय, पनवेल येथे सन १९८८ च्या अनुक्रमांक १२७२ अन्वये नोंदणीकृत आहे;

६. गट क्र. १७ च्या संदर्भात पांडू गोविंद पाटील यांनी (अ) शब्बीर गुलाम हुसैन मोरीबीवाला आणि (ब) अशोक रामनाथ सरना यांच्या लाभात निष्पादित केलेले दिनांक २२ सप्टेंबर १९८८ रोजीचे खरेदीखत जे दुय्यम निबंधक कार्यालय, पनवेल येथे सन १९८८ च्या अनुक्रमांक १२७३ अन्वये नोंदणीकृत आहे;

७. गट क्र. १९ च्या संदर्भात रामचंद्र दुंदा पाटील आणि इतर यांनी (अ) शब्बीर गुलाम हुसैन मोरीबीवाला आणि (ब) अशोक रामनाथ सरना यांच्या लाभात निष्पादित केलेले दिनांक २२ सप्टेंबर १९८८ रोजीचे खरेदीखत जे दुय्यम निबंधक कार्यालय, पनवेल येथे सन १९८८ च्या अनुक्रमांक १२९८ अन्वये नोंदणीकृत आहे;

८. गट क्र. २० च्या संदर्भात रामचंद्र दुंदा पाटील आणि इतर यांनी (अ) शब्बीर गुलाम हुसैन मोरीबीवाला आणि (ब) अशोक रामनाथ सरना यांच्या लाभात निष्पादित केलेले दिनांक २२ सप्टेंबर १९८८ रोजीचे खरेदीखत जे दुय्यम निबंधक कार्यालय, पनवेल येथे सन १९८८ च्या अनुक्रमांक १२९९ अन्वये नोंदणीकृत आहे;

९. गट क्र. २०, २१ आणि २२ च्या संदर्भात (अ) शब्बीर गुलाम हुसैन मोरीबीवाला आणि (ब) अशोक रामनाथ सरना यांनी प्रकाश विनायक देसाई आणि इतर यांच्या लाभात निष्पादित केलेले दिनांक २४ फेब्रुवारी २००० रोजीचे फरोक्तखत जे दुय्यम निबंधक कार्यालय, पनवेल येथे सन २००० च्या अनुक्रमांक ८२२ अन्वये नोंदणीकृत आहे;

१०. गट क्र. २१ च्या संदर्भात तुकाराम हरी पाटील यांनी (अ) शब्बीर गुलाम हुसैन मोरीबीवाला आणि (ब) अशोक रामनाथ सरना यांच्या लाभात निष्पादित केलेले दिनांक ७ नोव्हेंबर १९८८ रोजीचे खरेदीखत जे दुय्यम निबंधक कार्यालय, पनवेल येथे सन १९८८ च्या अनुक्रमांक १४९३ अन्वये नोंदणीकृत आहे;

११. गट क्र. २२ च्या संदर्भात शिवाजी संभाजी सावंत आणि इतर यांनी (अ) शब्बीर गुलाम हुसैन मोरीबीवाला आणि (ब) अशोक रामनाथ सरना यांच्या लाभात निष्पादित केलेले दिनांक १ डिसेंबर १९८८ रोजीचे खरेदीखत जे दुय्यम निबंधक कार्यालय, पनवेल येथे सन १९८८ च्या अनुक्रमांक १६०२ अन्वये नोंदणीकृत आहे;

१२. गट क्र. २३ च्या संदर्भात भिवा रामजी पाटील यांनी (अ) शब्बीर गुलाम हुसैन मोरीबीवाला आणि (ब) अशोक रामनाथ सरना यांच्या लाभात निष्पादित केलेले दिनांक ७ नोव्हेंबर १९८८ रोजीचे खरेदीखत जे दुय्यम निबंधक कार्यालय येथे सन १९८८ च्या अनुक्रमांक १४९२ अन्वये नोंदणीकृत आहे;

१३. गट क्र. २३ आणि २४ च्या संदर्भात (अ) शब्बीर गुलाम हुसैन मोरीबीवाला आणि (ब) अशोक रामनाथ सरना यांनी प्रकाश विनायक देसाई आणि इतर यांच्या लाभात निष्पादित केलेले दिनांक २३ ऑक्टोबर २००० रोजीचे खरेदीखत जे दुय्यम निबंधक कार्यालय येथे सन २००० च्या अनुक्रमांक ४३४० अन्वये नोंदणीकृत आहे; आणि

१४. गट क्र. २४ च्या संदर्भात मनोहर जगन्नाथ पाटील यांनी (अ) शब्बीर गुलाम हुसैन मोरीबीवाला आणि (ब) अशोक रामनाथ सरना यांच्या लाभात निष्पादित केलेले दिनांक १० जानेवारी १९८९ रोजीचे खरेदीखत जे दुय्यम निबंधक कार्यालय येथे सन १९८९ च्या अनुक्रमांक ६३ अन्वये नोंदणीकृत आहे.

**आज दिनांक २९ डिसेंबर २०२५ रोजी.**

**वाडिया घांदी अँड कंपनी करिता**
**डेन्झिल आरंभन**
**भागीदार**

# भारताची क्रीडा क्षेत्रात महासत्तेकडे वाटचाल

■ २०२५ सालात खेळाडूंचा बोलबाला
■ महिलांनी पहिला वर्ल्ड कप जिंकून इतिहास रचला



**। नवी दिल्ली । वृत्तसंस्था ।**

२०२५ हे वर्ष भारताच्या क्रीडा इतिहासात फक्त यशाचा हिशेब म्हणून नव्हे तर महासत्तेकडे वाटचाल करणारा टप्पा म्हणून नोंदला जाईल. क्रिकेटमध्ये पुरुष संघाने चॅम्पियन्स ट्रॉफी उचलली, महिलांनी पहिला वर्ल्ड कप जिंकून इतिहास रचला, बुद्धिबळात नवी पिढी चमकली, भालाफेकीत नीरजने पुन्हा आकाश चिरले, ‘खो-खो’त पुरुष-महिला संघांनी आपल्या ‘खो-खो’ची ओळख करून दिली आणि पॅरा-स्पोर्टसने इच्छा शक्तीची उंची दाखवली आहे.

आशियाई यूथ गेम्समध्ये ४८ पदकांसह (१३) सुवर्ण, १८ रौप्य, १७ कांस्य) भारताची आतापर्यंतची सर्वोत्तम कामगिरी ठरली. कुस्ती, बॉक्सिंग, अथलेटिक्स, कबड्डी, वेटलिफ्टिंग, जिथे नजर जाईल तिथे भविष्य दिसले.

जागतिक तिरंदाजी अजिंक्यपदात पुरुष कंपाऊंड संघाने वाने सुवर्ण जिंकत इतिहास घडवला ऋषभ यादव, प्रभात साळुंखे, पृथ्वमेश फुगे ही नाव लक्षात ठिवा, ही आपली पुढची पिढी आहे.

### कबड्डीच्या महिलांनीही जग जिंकले

कबड्डीत भारताची ताकद अभेद्य आहे. महिला संघाने महिलांचा दुसरा वर्ल्ड कपही आपल्याकडेच राखला. चिनी तैपेई संघाने दिलेली लढत जबरदस्त होती, पण हिंदुस्थानच्या महिलांनीही आम्हीही कमी नसल्याचे दाखवून दिले.

### वर्ल्ड कपचा सुवर्ण अध्याय

नवी मुंबईत पहिला महिला वर्ल्ड कप-हरमनप्रीत कौरच्या नेतृत्वात आत्मविश्वास, संयम आणि आक्रमकतेचे परिपूर्ण मिश्रण असलेल्या रणरागिणींनी प्रथमच जग जिंकण्याचा इतिहास रचला. हा विजय म्हणजे ट्रॉफीपेक्षा मोठा संदेश होता.

आशियाई अथलेटिक्समध्ये २४ पदकांसह दुसरे स्थान पटकावले. गुलवीर सिंग (५००० व १०,००० मी.), अविनाश साबळे, ज्योती याराजी यांनी वेग, शिस्त आणि सातत्याचं दर्शन घडवले. २० वर्षीय सम्राट राणाने १० मीटर एअर पिस्टलमध्ये जागतिक सुवर्ण जिंकत नवं पर्व सुरू केले. नेमबाजीत भारताचा आत्मविश्वास दुणावला. वर्ल्ड कपच्या इतिहासात भारताने पहिल्यांदाच सोनेरी नेम साधला, हे विशेष. महिला आणि पुरुष ‘खो-खो’ संघाने वर्ल्ड कप जिंकत पारंपरिक खेळालाही जागतिक व्यासपीठ दिले. २० संघांचा सहभाग असलेल्या पहिल्या खो-खो वर्ल्ड कपमध्ये भारतानी आपल्या ‘खो-खो’ चे दर्शन अवघ्या जगाला करुन दिले. डी. गुकेशने दिग्गजांवर मात करत जागतिक सन्मान मिळवले; दिव्या देशमुखने फिडे महिला वर्ल्ड कप जिंकत भविष्याची झलक दाखवली. नीरज चोप्राने भालाफेकीत ९० मीटरचा टप्पा पार केला, तैवान अथलेटिक्स ओपनमध्ये टेबल टॉप; वर्ल्ड पैरा अथलेटिक्समध्ये २२ पदकं, स्पेशल ऑलिम्पिक्समध्ये ३३ पदकं; पिकलबॉलमध्ये डबल गोल्ड; महिला आइस हॉकीत आशियाई कांस्य, क्रीडा विश्वात यत्रतत्र सर्वत्र भारतच दिसला, यंदा कामगिरी मोठीही होती आणि उत्साहवर्धकही होती.

पहिल्यांदाच झालेल्या टी-२० विश्वचषकात भारतानी दृष्टिबाधित महिलांचा विश्वविजयी कामगिरी करत प्रेरणेचा नवा अध्याय लिहिला. जागतिक बॉक्सिंग फायनल्समध्ये २० पदके (९ सुवर्ण), जास्मिन लांबोरिया सुवर्णासह चमकली; या स्पर्धेत भारतानी बॉक्सिंगची ताकद स्पष्टपणे दिसली. शीतल देवीने जागतिक किताब जिंकत सिद्ध केले की, सीमा शरीरात नाहीत, विचारांमध्ये असतात. सक्षम स्पर्धामध्येही तिची वाटचाल सुरू झाली आहे.

नाईट बॉक्स अंडरआर्म क्रिकेट स्पर्धा

# स्वराज जोगेश्वरी नगर विजयी



● (छायाचित्र : महेश पवार)

**। नागोठणे । प्रतिनिधी ।**

नागोठण्यातील आंगर आळी येथील जय हनुमान क्रिकेट क्लब यांच्यावतीने नागोठणे क्रिकेट असोसिएशन मर्यादित नाईट बॉक्स अंडर आर्म क्रिकेट स्पर्धेत स्वराज जोगेश्वरी नगर या संघाने विजेतेपदाची रोख रक्कम व आकर्षक चषक पटकाविला. तर, आर जे स्टार या संघाला उपविजेतेपदावर समाधान मानावे लागले.

या स्पर्धेत देवलाई चिकणी व ओमसाई खडक आळी या संघांनी अनुक्रमे तृतीय व चतुर्थ क्रमांक पटकाविला. या स्पर्धेतील मालिकावीर व अंतिम सामन्यातील सामनावीर अतुल बामणे, उत्कृष्ट फलंदाज वेदांत देवरे, उत्कृष्ट गोलंदाज प्रवीण पवार, उत्कृष्ट क्षेत्ररक्षक अमेय जोशी यांनाही आकर्षक चषक देऊन गौरविण्यात आले. स्पर्धेत १६ संघ सहभागी झाले होते. संपूर्ण स्पर्धेचे समालोचन राहुल ताडकर यांनी केले.

येथील कापुर तळा मैदानावर शनिवारी (दि.२७) रात्री घेण्यात आलेल्या या स्पर्धेचे उद्घाटन शनिवारी सायंकाळी शिवसेना उबाठा नेते किशोर जैन यांच्या हस्ते झाले. यावेळी नागोठणे ग्रामपंचायतीचे माजी सरपंच व विद्यमान सदस्य डॉ. मिलिंद धात्रक, माजी उपसरपंच सुरेश कामथे, संजय पिंपळे, सदस्य ज्ञानेश्वर साळुंखे, सचिन ठोंबरे, संतोष नागोठणेकर, भाविका गिजे, अमृता महाडिक, ज्योती राऊत, शाखाप्रमुख धनंजय जगताप, चंद्रकांत कामथे, अशोक गोरे, अनिल चांदविणकर, चेतन कामथे, कैलास गोरे, मनोज भोसले, अनिल महाडिक, शेखर गोळे, किसन शिर्के, किरण पवार आदींसह अनेक मान्यवर व क्रिकेटप्रेमी बहुसंख्येने उपस्थित होते. या स्पर्धेचे बक्षीस वितरण सुरेश कामथे, मंदार चितळे, असोसिएशनचे अध्यक्ष विश्वास गायकर, अल्विन नाकते, भरत गिजे, चेतन कामथे, नरेश भंडारी, सचिन लाड व इतर मान्यवरांच्या हस्ते झाले.

ही स्पर्धा यशस्वी होण्यासाठी जय हनुमान क्रिकेट क्लबचे भरत गीजे, अल्विन नाकते, मयूर शिर्के, ओंकार पिंपळे, अभिजीत मालुसरे, कल्पेश चांदविणकर, रोहन भोसले, मनोज गोरे, मंदार शिर्के, शुभम जाधव, वैभव जाधव आदींसह जय हनुमान क्रिकेट क्लबच्या सर्व पदाधिकाऱ्यांनी व सदस्यांनी मेहनत घेतली.

## निवडक



### करंजाडे येथील शाळेचे मैदान नागरिकांसाठी खुले

**नवीन पनवेल :** करंजाडे येथील सेकटर ३, कोठारी इंटरनॅशनल स्कूलच्या पाठीमागे असलेले खेळाचे मैदान शिवसेनेच्या माध्यमातून नागरिकांसाठी खुले करण्यात आले. मुलांना खेळण्यासाठी मैदान उपलब्ध झाल्याने नागरिकांनी जिल्हाप्रमुख विनोद साबळे यांच्यासह पदाधिकाऱ्यांचे धन्यवाद मानले. शाळेचे मैदान शाळा संपल्यानंतर आणि सुट्टीच्या दिवशी तेथील स्थानिकांना, मुलांना खेळण्यास मिळावे असा सिडकोचा नियम आहे. मात्र बऱ्याच ठिकाणी त्या ठिकाणी सिडकोच्या या नियमाला बगल दिली जात आहे. कोठारी इंटरनॅशनल स्कूल, करंजाडे या शाळेच्या मागील खेळाचे मैदानदेखील शाळेच्या वेळेव्यतिरिक्त इतर मुलांना खेळण्यासाठी दिले जात नसल्याच्या तक्रारी शिवसेनेचे विनोद साबळे यांच्याकडे आल्या होत्या. त्यानुसार त्यांनी शाळेशी संपर्क साधला आणि शाळेच्या वेळेनंतर हे मैदान येथील स्थानिकांना, मुलांना खेळण्यासाठी मिळावे अशी मागणी केली. अखेर रविवार, दि. २८ डिसेंबर रोजी हे मैदान येथील स्थानिकांना, मुलांना खेळण्यासाठी खुले करण्यात आले.यावेळी मुलांच्या पालकांनी तसेच मुलांनी शिवसेनेचे आभार मानले. यावेळी शिवसेना जिल्हाप्रमुख विनोद साबळे, शहरप्रमुख मिरेंद्र शहारे, महिला शहरप्रमुख अंजु सिंह, महिला शहर संपर्कप्रमुख अर्चना शिद्रुक, सेक्टर-४ शाखाप्रमुख राजाभाऊ नलावडे, उप शाखाप्रमुख राहुल सुखसे, उपशाखाप्रमुख दत्ता आतकरे, वैद्यकीय शहरप्रमुख गोरखनाथ नागरगोजे यांच्यासह अनेकजण उपस्थित होते.

### पुण्यात मुष्टीयुद्ध संघटनेची कार्यशाळा



**पुणे :** पुणे जिल्हा हौशी मुष्टीयुद्ध संघटनेचे संस्थापक सदस्य कै. मदन माधव पुरंदरे यांच्या द्वितीय स्मृतीदिनानिमित संघटनेच्यावतीने शनिवार (दि.२७) डिसेंबर रोजी पंडीत नेहरू स्टेडियम, पुणे येथे मुष्टियुद्ध पंचांची कार्यशाळा आयोजित केली होती. या कार्यशाळेत राष्ट्रीय मुष्टियुद्ध पंच सुनिल नेवरेकर यांनी मार्गदर्शन केले.आज तांत्रिक प्रगतीमुळे पंचाचे कामगिरीवर मीडियाचे बारीक लक्ष असते, त्यामुळे मुष्टियुद्ध पंचांना खेळाचे नियम आणि त्यात झालेले बदल याचे अद्ययावत ज्ञान असणे आवश्यक आहे. असे निर्णय घेताना आपली भूमिका व निर्णय या वर ठाम असले पाहिजे. सगळ्यात महत्त्वाचे म्हणजे, खेळाडू आणि पंचांनी स्वतःच्या फिटनेसकडे खूप लक्ष देणे आवश्यक आहे, असे प्रतिपादन नेवरेकर यांनी केले.

### नातू महाविद्यालयात रंगणार तायक्वांदो

**चिपळूण :** डॉ. तात्यासाहेब नातू कला आणि वरिष्ठ वाणिज्य महाविद्यालयामध्ये ३ ते ५ जानेवारीदरम्यान मुंबई विद्यापीठ आंतरमहाविद्यालयीन तायक्वांदो स्पर्धेचे आयोजन करण्यात आले आहे.ही स्पर्धा पुरुष व महिला गटात विभागली असून, ३ व ४ जानेवारी रोजी पुरुष गट व ४ व ५ जानेवारी रोजी महिला या गटात स्पर्धा होणार आहेत. पुरुष व महिला यांच्या वजनानुसार त्यांचे विभाजन करण्यात आले असून, पुरुष गटामध्ये ५४ किलो वजनाखालील, ५४ ते ५८, ५८ ते ६३, ६३ ते ६८, ७४ ते ८०, ८० ते ८७, ८७ किलोपेक्षा जास्त या वजनप्रकारानुसार ३ व ४ जानेवारी रोजी स्पर्धा होतील तसेच महिला गटात ४६ किलो वजनाखालील, ४६ ते ४९, ४९ ते ५३, ५३ ते ५७ किलो, ५७ ते ६२ किलो, ६२ ते ६७ किलो, ६७ ते ७३ किलो, ७३ किलोपेक्षा जास्त वजन असणाऱ्या मुलींच्या स्पर्धा ४ ते ५ जानेवारी रोजी होणार आहेत. पुरुष गटातील मुलांची सकाळी ८ वा. डॉ. तात्यासाहेब नातू महाविद्यालयाच्या मैदानामध्ये कागदपत्रांची तपासणी होईल व ११ वा. स्पर्धा सुरू होईल. तसेच महिला गटातील खेळाडूंची ४ जानेवारी रोजी दुपारी १२ वा. कागदपत्रांची तपासणी होईल. ३ वा. स्पर्धा सुरू होईल तसेच ५ जानेवारी रोजी महिला गटातील शिल्लक खेळाडूंची सकाळी ८ वा. स्पर्धा सुरू होणार आहे.

# रोशन क्रिकेट क्लबने मारली बाजी

**अलिबाग संघाचा सात गडी राखून पराभव**



**। रायगड । क्रीडा प्रतिनिधी ।**

रायगड जिल्हा क्रिकेट असोसिएशनच्या वतीने आयोजित करण्यात आलेल्या चौदा वर्षाखालील मुलांच्या एकदिवसीय ४० षटकांच्या निवड चाचणी क्रिकेट स्पर्धेत रोशन क्रिकेट क्लब कामोठे संघानी अंतिम विजय होण्याचा मान मिळवला आहे.

शनिवारी पेण येथील छत्रपती शिवाजी महाराज मैदानावर झालेल्या अंतिम सामन्यात रोशन क्रिकेट क्लब संघानी जगदीश क्रिकेट अकॅडमी अलिबाग संघावर ७ गडी राखून विजय मिळवला आहे तर जगदीश क्रिकेट अकॅडमी अलिबाग संघ उपविजेतेपदावर समाधान मानावे लागले. या स्पर्धेत रायगड जिल्ह्यातील विविध तालुक्यातील ३२ अकॅडमी व क्लबच्या संघानी सहभाग घेतला होता. सदरची स्पर्धा प्रथम साखळी व नंतर बाद फेरी नुसार खेळविण्यात आली. संपूर्ण स्पर्धेत एकूण ५५ एकदिवसीय सामने यशस्वीरित्या खेळले गेले. अंतिम सामन्यात जगदीश क्रिकेट अकॅडमी अलिबाग संघाने प्रथम फलंदाजी करतांना ४० षटकांच्या समाप्तीनंतर ९ गडी बाद १७८ धावसंख्या उभारली. त्यामध्ये सलामीवीर फलंदाज अर्णव पाटील यांनी सर्वाधिक ६५ स्वरूप कदम यांनी ३४ धावांचे योगदान संघाला दिले, आरसीसी कामोठे संघाकडून आर्यमिक ढेंबरे यांनी ३ तर निखिल अहिरवाल यांनी २ गडी बाद केले.

प्रत्युत्तर देताना आरसीसी कामोठे संघाने ३२.५ षटकांत १७९ धावांचे लक्ष पूर्ण करत सामन्यावर पकड घेतली. त्यामध्ये मीत पाटील यांनी ४४ भव्यम झा यांनी ३८ धावा काढून संघाला विजय मिळवून दिला. जगदीश क्रिकेट अकॅडमी अलिबागकडून कर्णधार ओम कवळे व राध्ये वालेकर यांनी प्रत्येकी २ फलंदाज बाद केले. संपूर्ण स्पर्धेतील अंतिम विजयी संघ ठरला रोशन क्रिकेट क्लब कामोठे, उपविजयी संघ जगदीश क्रिकेट अकॅडमी अलिबाग. स्पर्धेतील सर्वोत्कृष्ट खेळाडू म्हणून प्रतिक क्रिकेट अकॅडमी पनवेल संघाचा खेळाडू अंश माळी, उत्कृष्ट फलंदाज ओम कवळे जगदीश क्रिकेट अकॅडमी अलिबाग, उत्कृष्ट गोलंदाज वीर भोईर चॅम्पियन्स क्रिकेट अकॅडमी खारघर, उत्कृष्ट क्षेत्ररक्षक यजुर्व घरत, प्रतिक क्रिकेट अकॅडमी पनवेल यांना रायगड जिल्हा क्रिकेट असोसिएशनचे सहसचिव जयंत नाईक, मुख्य प्रशिक्षक शंकर दळवी, शेखर भगत, अभिषेक खातू, रोशन अडे, जगदीश ढगे, पंच रमेश ढाकोळ, वरुण म्हात्रे, आदेश नाईक यांच्या हस्ते चषक व सन्मानचिन्ह देऊन गौरविण्यात आले.

# डॉ.पारनेरकर विद्यालयात क्रीडा स्पर्धा उत्साहात



**। रसायनी । प्रतिनिधी ।**

वाशिवली येथील डॉ. पारनेरकर महाराज विद्यालय व कनिष्ठ महाविद्यालयात इयत्ता ५ वी ते १२ वीच्या विद्यार्थ्यांचे हिवाळी क्रीडा स्पर्धांचे आयोजन करण्यात आले होते. प्रल्हाद माळी यांच्या हस्ते क्रीडा स्पर्धांचे उद्घाटन करण्यात आले. यावर्षी खो-खो, कबड्डी, गोळा फेक, १०० व २०० मीटर धावणे व क्रिकेट अशा विविध स्पर्धांमध्ये मुलांनी व मुलींनी हिरीरीने सहभाग घेतला. या विविध स्पर्धांमध्ये विजयी विद्यार्थी होते त्या संघाला हायटेक कार्बन बिर्ला कंपनीचे एच.आर.अधिकारी हरीष रावत, माजगाव केंद्रप्रमुख जय परदेशी व प्रशांत गायकवाड, शिक्षकेतर प्रतिनिधी अनिल पगारे यांच्याहस्ते ट्रॉफी देऊन सन्मानित करण्यात आले.

याप्रसंगी तुलसीदास पाटील, अनंता दळवी, एकनाथ पाटील, प्राचार्य डॉ. अनिल पाटील व शिक्षक प्रतिनिधी उपस्थित होते. स्पर्धेचे सूत्रसंचलन प्रल्हाद माळी यांनी केले. स्पर्धांचे यशस्वी आयोजन व नियोजन करण्यामध्ये प्रामुख्याने सर्व शिक्षक शिक्षकेतर कर्मचारी यांनी योगदान दिल्याबद्दल प्राचार्य डॉ. ए. आर. पाटील यांनी सर्वांचे आभार व्यक्त केले.

# अल्काइल क्रीडा महोत्सवाची यशस्वी सांगता



**। आपटा । प्रतिनिधी ।**

अल्काईल अमाइन्स केमिकल्स लिमिटेड यांच्या सौजन्याने विद्यार्थ्यांच्या क्रीडा गुणांना प्रोत्साहन मिळण्याच्या उद्देशाने दरवर्षी अल्काईल क्रीडा महोत्सवाचे आयोजन केले जाते. यंदाही हा क्रीडा महोत्सव दि. २६ आणि २७ डिसेंबर ला चावणे येथील माध्यमिक आणि उच्च माध्यमिक शाळेत उत्साहात पार पडला.

स्पर्धेच्या उद्घाटनप्रसंगी अल्काईल अमाइन्सचे वरीष्ठ अधिकारी तुषार शिंदे, युनिट एचआर अर्चना माने, सिनियर सी. एस. आर. ऑफिसर निकिता म्हात्रे, सी.एस. आर कन्सल्टंट रवी ओंकार, तसेच चावणे शाळेचे प्राचार्य पद्माकर झिंगे, सहभागी शाळांचे प्राचार्य आणि क्रीडा शिक्षक, कैलास सोनार आदी मान्यवर उपस्थित होते. अल्काईल अमाइन्सतर्फे शुभम वेताळ, संदीप पाटील आणि ओमकार पिंगळे यांनी तसेच चावणे शाळेचे विद्यार्थी आणि शिक्षक यांचे अमोल सहकार्य लाभले. प्रथमोपचाराची जबाबदारी मनीष बेहरा यांनी सांभाळली होती.

विद्यार्थ्यांनी क्रीडा भावनेने स्पर्धेचा आनंद घेतला. कबड्डी, खो खो, लंगडी, डॉज बॉल, रस्सी खेच, गोळा फेक, थाळी फेक, १०० आणि २०० मीटर धावणे अशा विविध मैदानी खेळांनी ही स्पर्धा गाजली. याप्रसंगी चावणे शाळेचे सह शिक्षक श्री वाघ यांचा महाराष्ट्र राज्य खो खो टीमचे कॅप्टन झाल्याबद्दल अल्काईल अमाइन्सतर्फे सत्कार करण्यात आला. जिद्द, चिकाटी, एकी यांच्या बळावर विद्यार्थ्यांनी आपले कसब पणाला लाऊन अल्काईल अमाइन्सने आयोजित केलेल्या स्पर्धांना उचित न्याय दिला. परिसरातील आठ शाळांनी जवळजवळ एक हजार विद्यार्थ्यांनी या स्पर्धा गाजवल्या आणि सर्व स्पर्धात मिळून १२० बक्षिसं पटकावली.

भरघोस बक्षिसं असलेला पारितोषिक वितरण समारंभ अल्काईलच्या युनिट एचआर अर्चना माने, चावणे शाळेचे प्राचार्य पद्माकर झिंगे, एस आर कन्सल्टंट रवी ओंकार, सचिन आंब्रे, तुषार शिंदे, शुभम वेताळ, ओमकार पिंगळे, निलेश बेहरा यांच्या हस्ते पार पडला. चावणे शाळेतील खरे, कैलास सोनार आणि त्यांचे सहकारी यांनी या स्पर्धा यशस्वी होण्यासाठी योग्य मार्गदर्शन केले.

# राष्ट्रीय कुस्ती स्पर्धेसाठी पोलीस कुस्तीपटूंची निवड



**। पनवेल । प्रतिनिधी ।**

क्रीडा व युवक सेवा संचालनालय, महाराष्ट्र राज्य पुणे तसेच जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालय सिंधुदुर्ग यांच्या संयुक्त विद्यमाने दि. ८ ते ११ डिसेंबरदरम्यान सिंधुदुर्गनगरी येथे राज्यस्तरीय शालेय कुस्ती स्पर्धा यशस्वीरित्या पार पडल्या. या स्पर्धेत संपूर्ण महाराष्ट्रातून सुमारे ४०० खेळाडूंनी सहभाग घेतला होता. मुंबई विभागातून पुरुष व महिला मिळून १० खेळाडूंनी प्रतिनिधित्व केले, यामध्ये पोलीस मुख्यालय कुस्ती संकुलातील सहा कुस्तीगीरांचा समावेश होता.

या स्पर्धेत पोलीस मुख्यालयाच्या कुस्तीगीरांनी उत्कृष्ट कामगिरी करत एकूण ६ पदकांची कमाई केली. यामध्ये सोहम ढगे (३८ किलो) व वेदांत येळकर (६८ किलो) तसेच स्वप्निल लावंड (७५ किलो) यांनी सुवर्णपदक पटकावून थेट दिल्ली येथे होणाऱ्या राष्ट्रीय कुस्ती अजिंक्यपद स्पर्धेसाठी आपले नाव निश्चित केले. यश घुगे (६२ किलो), हृषिराज पाटील (५२ किलो) आणि संशिखा शर्मा (३३ किलो) यांनी कांस्यपदक मिळवून संघाच्या यशात मोलाची भर घातली.

या यशाबद्दल सर्वत्र त्यांचे कौतुक होत आहे. पोलीस आयुक्त मिलिंद भारंबे, सह पोलीस आयुक्त संजय येनपुरे, पोलीस उपआयुक्त संजयकुमार पाटील तसेच सहाय्यक पोलीस आयुक्त विजय चौधर यांचे मार्गदर्शन खेळाडूंना लाभले. पोलीस मुख्यालय कुस्ती संकुलाचे प्रशिक्षक संपत्ती येळकर यांच्यासह समाधान अडके वस्ताद, संजय चव्हाण, प्रदीप जाधव, दीपक वरखडे व सर्व पालकांनी खेळाडूंना मोलाचे सहकार्य केले. दिल्ली येथे होणाऱ्या राष्ट्रीय स्पर्धेसाठी खेळाडूंना शुभेच्छांचा वर्षाव होत आहे.

एमसीएमचा आयोजनासाठी पुढाकार | रायगड जिल्ह्यातील मैदानं सज्ज

# आजपासून मुलींच्या क्रिकेटचा थरार



**। रायगड । क्रीडा प्रतिनिधी ।**

महाराष्ट्र क्रिकेट असोसिएशनच्या वतीने आयोजित करण्यात आलेल्या एकोणीस वर्षाखालील मुलींच्या एकदिवसीय ५० षटकांच्या क्रिकेट स्पर्धेतील १५ सामन्यांचे आयोजन रायगड जिल्हा क्रिकेट असोसिएशनच्या वतीने जिल्ह्यातील विविध मैदानांवर दि. २९ डिसेंबर ते ०४ जानेवारीदरम्यान होणार आहेत.

रायगड जिल्ह्यातील छत्रपती शिवाजी महाराज मैदान पेण, छत्रपती शिवाजी महाराज क्रीडांगण गव्हाण, उलवे व नॅशनल इन्स्टिट्यूट ऑफ सिक्युरिटी मार्केट्स ग्राऊंड रसायनी पाताळगंगा अशा तीन मैदानावर हे सामना खेळवले जाणार असून एमसीएच्या ग्रुप ‘जी’मध्ये सहा संघांचा समावेश असणार आहे, त्यात रायगड जिल्हा क्रिकेट असोसिएशनच्या मुलींच्या संघासह,सातारा जिल्हा क्रिकेट असोसिएशन, सिंधुदुर्ग जिल्हा क्रिकेट असोसिएशन, चंद्रोस क्रिकेट क्लब पुणे, बास क्रिकेट क्लब पुणे, ज्यूडिशियल क्रिकेट अकॅडमी पुणे संघांचा समावेश असणार आहे. स्पर्धेच्या पहिला दोन सामन्यांसाठी रायगड जिल्हा क्रिकेट असोसिएशनच्या मुलींचा संघ जाहीर करण्यात आला आहे. निवड झालेल्या संघाला आरडीसीएचे अध्यक्ष अनिरुद्ध पाटील, सचिव प्रदीप नाईक यांच्यासह सर्व पदाधिकारी व सदस्यांनी शुभेच्छा दिल्या आहेत.

रायगडचा मुलींचा संघ पुढील प्रमाणे स्वरा खेडेकर कर्णधार, गार्गी साळुंके, भ्रताती राय, काव्या धावडे, स्वरा बामुगडे, तनश्री सावंत, वेदिका तेटगुडे, संस्कृती पालकर, कनक यादव, दिव्यांका धनावडे, प्रचिती जाधव, किमया कदम,समिधा तांडेल,स्वरा भगत, निशिता विठ्ठलानी, राखीव खेळाडू- तनिष्का वार्गे, रशिता डे, आरुषी जाधव, अनिषा वर्मा, मधुरा बाबर, श्रुती अग्री, वेदश्री शेळके, शुभांगिनी दास यांचा समावेश आहे.

### जिल्हास्तरीय पॉवरलिफ्टिंगचे आयोजन

**अलिबाग :** क्रीडा व युवक सेवा संचालनालय पुणे अंतर्गत जिल्हा क्रीडा परिषद रायगड व जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालय रायगड, यांच्या मान्यतेने जिल्हास्तरीय शालेय पॉवरलिफ्टिंग स्पर्धा १७ व १९ वर्षातील मुले/मुली यांच्यासाठी अभिनव ज्ञान मंदिर कॉलेज कर्जत येथे जिल्हास्तरीय शालेय पॉवरलिफ्टिंगची स्पर्धा पार पडली. पॉवरलिफ्टिंग स्पोर्ट्स असोसिएशन रायगडने आयोजित केलेल्या या स्पर्धेला जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालय रायगड, अभिनव ज्ञानमंदिर यांचे सहकार्य झाले. या स्पर्धेत एकूण २० खेळाडू सहभागी झाले होते. स्पर्धा १७ व १९ वर्षातील मुला मुलींसाठी घेण्यात आली. या स्पर्धे चे पंच म्हणून गोपीनाथ पवार, सुरेश धुळप राजेश शिर्के यांनी काम केले.

कृषीवल हे पत्र नागेश पब्लिशर्स प्रा. लि.साठी मुद्रक, प्रकाशक सौ.सुप्रिया पाटील यांनी नागेश पब्लिशर्स, वेश्वी, अलिबाग, जि. रायगड ४०२ २०९ येथे छापून येथेच प्रसिद्ध केले. आर. एन. आय. रजि. क्र. ४९९६३/७७ | MH-MR-RGD-RNP/16/2022-23 (31-12-2025)
दूरध्वनी : ०२१४१-२२२२९०/२२२७६१, संपादकीय विभाग-email : krushivalnews@gmail.com / जाहिरात विभाग- email : raigadkrushival@gmail.com मुंबई कार्यालय : ए-५ आयओनिक १८, ऑर्थर बंदर रोड, कुलाबा, मुंबई ४०० ००५. दूरध्वनी : ०२२-२२८८४५३८.
■ संस्थापक-संपादक : स्व. प्रभाकर पाटील ■ व्यवस्थापकीय संचालक : मीरा घाडीगावकर ■ कार्यकारी संपादक : माधवी माणिक सावंत* ■ सल्लागार संपादक : प्रसाद वासुदेव केरकर
(* या पत्रातील मजकुराच्या निवडीसाठी पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची आहे.)